मराठी अस्मितेचा बुलंद आवाज.

https://www.vruttamanas.in/

# वृत्तमानस

Email : vrittamanas1@gmail. com

मुंबई/ पालघर | शनिवार, २६ ऑक्टोबर २०२४ | वर्ष- २९ | अंक - १२६ | पाने- ८

आर. एन. आय क्र. - ६५६०९/९६ | किंमत : ३ रुपये

## कॅनडात वॉलमार्टमध्ये आढळला शीख तरुणीचा मृतदेह

**ओटावा :** कॅनडातील हॅलिफॅक्स येथे भारतीय वंशाच्या शीख तरुणीचा मृतदेह वॉलमार्टमधील वॉक इन ओव्हनमध्ये आढळल्याची घटना घडली आहे. या घटनेचे तीव्र पडसाद कॅनडा तसेच भारतातील सोशल मीडियावर उमटले आहेत. गुरसिमरन कौर असे मृत्यू झालेल्या १९ वर्षीय तरुणीचे नाव आहे. गुरसिमरन व तिची आई वॉलमार्टमध्ये मागील दोन वर्षांपासून काम करत होत्या. संध्याकाळी वॉलमार्टमधील काम संपल्यानंतर घरी जाण्यासाठी गुरसिमरनची आई तिचा शोध घेत होती. त्यावेळी ही धक्कादायक घटना निदर्शनास आली. तीन वर्षांपूर्वी गुरसिमरन ही तिच्या आईसह युकेमधून कॅनडात स्थलांतरित झाली होती.



कर्नाटकात 101 दोषींना जन्मठेपेची शिक्षा

पान 8


## म ह त्त्वा चे

### 'आधार'वरची तारीख वयनिश्चितीचा पुरावा नाही



**नवी दिल्ली :** सर्वोच्च न्यायालयाने आधार कार्ड हे जन्माचा पुरावा म्हणून मान्य नाही असं म्हटलं आहे. जस्टिस संजय करोल आणि जस्टिस उज्जल भुइयां यांच्या खंडपीठाने या संबंधीचा निकाल दिला आहे. सर्वोच्च न्यायालयाने हे म्हटलं आहे की मृत व्यक्तीचं वय ठरवण्यासाठी आधार कार्डवर उल्लेख करण्यात आलेल्या जन्म तारखेऐवजी शाळा सोडल्याचा दाखला हा ग्राह्य धरावा. मोटार अपघात संबंधीचा दावा होता. ज्यामध्ये नुकसान भरपाई म्हणून १९ लाख ३५ हजार ४०० रुपये भरपाई देण्याचा निर्णय दिला गेला. उच्च न्यायालयाने ही रक्कम कमी करुन ९ लाख २२ हजार ३३६ रुपये केली. अपघातात ज्या व्यक्तीचा मृत्यू झाला त्या व्यक्तीचं मृत्यूच्या वेळी असलेलं वय ठरवण्यासाठी आधार कार्डवर असलेल्या जन्म तारखेचा उल्लेख ग्राह्य धरला होता. त्यानुसार मृत व्यक्तीचं वय ४७ धरलं होतं आणि उच्च न्यायालयाने भरपाईची रक्कम निम्मी केली होती.

### चेन्नईच्या शाळेत गॅस गळती, 3 विद्यार्थी गंभीर



**चेन्नई :** तामिळनाडूची राजधानी चैन्नईच्या एका शाळेत संशयास्पद गॅस गळतीमुळे अनेक विद्यार्थी आजारी पडले आहेत. त्यामुळे श्वास घ्यायला त्रास, डोळयांची जळजळ आणि चक्कर येण्याच्या तक्रारी वाढल्याने 30 हून अधिक विद्यार्थ्यांना तत्काळ जवळच्या रुग्णालयात दाखल केले. यापैकी तीन मुलांची अवस्था गंभीर असून त्यांना खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. सध्या या प्रकरणाचा तपास सुरु आहे. एनडीआरएफचे कमांडर ए.के. चौहान यांनी याप्रकरणी सांगितले की, सध्या, या घटनेचे नेमके कारण सांगू शकत नाही. कारण नेमका त्रास त्यांना कशाने झाला याचे कारण कळत नाहीय. आमच्या पथकाने येऊन परिस्थितीचा आढावा घेतला सर्व काही सामान्य आहे, आम्हाला कोणत्या गॅसचा गंधही आला नाही अशी प्रतिक्रिया दिलेली आहे

# मविआचा नवा फॉर्म्युला 90-90-90

## तिन्ही पक्ष प्रत्येकी 90 जागा लढणार, उर्वरित 18 जागा मित्रपक्षांना



### बाळासाहेब थोरातांनी दिली माहिती

प्रतिनिधी
नवी दिल्ली/मुंबई

महाविकास आघाडीच्या (मविआ) जागावाटपाचा एक नवा फॉर्म्युला आज पुढे आला आहे. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी शुक्रवारी माध्यमांशी बोलताना महाविकास आघाडीतील तिन्ही प्रमुख पक्ष प्रत्येकी 90 जागांवर लढणार असल्याचे स्पष्ट केले. काँग्रेस, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष व राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष हे तिन्ही पक्ष प्रत्येकी 90 जागांवर लढतील, तर उर्वरित 18 जागा मित्रपक्षांना सोडल्या जातील, असे ते म्हणाले.

महाविकास आघाडीच्या नेत्यांनी बुधवारी सायंकाळी घेतलेल्या एका पत्रकार परिषदेत आघाडीच्या जागावाटपाचा फॉर्म्युला जाहीर केला होता. मविआतील तिन्ही पक्ष प्रत्येकी 85 जागांवर लढणार असल्याचे ते म्हणाले होते. पण काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांनी शुक्रवारी दिल्लीत बोलताना त्यांनी हा फॉर्म्युला आता 90 वर पोहोचल्याचे सांगितले. ते म्हणाले, आमचा 85-85-85 चा फॉर्म्युला आता 90-90-90 वर पोहोचला आहे. उर्वरित 18 जागा आम्ही आमच्या मित्रपक्षांना सोडल्या आहेत. त्यातून किती सुटतील ते पाहिले जाईल. पण काँग्रेस 100 च्या वर जाईल का? याची बेरीज अजून करण्यात आली नाही.

आमची चर्चा अजूनही सुरू आहे. आमचे उमेदवार सक्षम आहेत. त्यांच्यावरही चर्चा झाली आहे. आम्ही सीईसीपुढे ही नावे ठेवणार आहोत. पण महाविकास आघाडीत कुठेही मैत्रीपूर्ण लढत होणार नाही. ही राज्याची निवडणूक आहे. त्यामुळे काही अडचणी असतात. पण त्यावरही तोडगा काढला जात आहे, असे थोरात म्हणाले,

### *सीईसीमध्येच सर्व जागांवर शिक्कामोर्तब होईल - पटोले*

*काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनीही यावेळी सर्वच जागांवर सीईसीमध्ये शिक्कामोर्तब होईल असे सांगितले. आज आमची 55 जागांवर चर्चा झाली. त्यात मैत्रीपूर्ण लढतींचा कोणताही निर्णय घेण्यात आला नाही. सीईसीमध्ये सर्व जागांवर शिक्कामोर्तब होईल. हा निर्णय पक्षश्रेष्ठीच घेतील, असे ते म्हणाले.विशेष बाब म्हणजे महाविकास आघाडीने आतापर्यंत 158 जागांवरील उमेदवार जाहीर केलेत. यात राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाच्या 45, ठाकरे गटाच्या 65 व काँग्रेसच्या 48 उमेदवारांचा समावेश आहे. विरोधी पक्षांच्या उर्वरित उमेदवारांच्या नावांची घोषणा आज किंवा उद्या होण्याची शक्यता आहे. विधानसभा निवडणुकीसाठी 29 ऑक्टोबर हा अर्ज भरण्याचा शेवटचा दिवस आहे.*

## राहुल गांधी महाराष्ट्रातील काँग्रेस नेत्यांवर नाराज...



### जागावाटपाच्या वाटाघाटीत कमी पडल्याची खंत

वृत्तसंस्था
नवी दिल्ली

काँग्रेसच्या स्क्रिनिंग कमिटीची बैठक दिल्लीत राहुल गांधी, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष मल्लिकार्जून खर्गे यांच्या उपस्थितीमध्ये झाली. या बैठकीत महाराष्ट्रात वाटाघाटी करताना काँग्रेस नेत्यांनी योग्य भूमिका पार न पाडली नसल्याचे मत राहुल गांधी आहे. त्यांनी याबाबत नाराजी देखील व्यक्त केली.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षासोबत वाटाघाटीत काँग्रेस कमी पडली. तसेच मुंबई आणि विदर्भातील काही जागा मित्रपक्षांना सोडल्याने देखील राहुल गांधी यांनी नाराजी बोलून दाखवली.

### विश्वगुरुंच्या पक्षातही जागावाटपात आलबेल नाही - नाना पटोले

बाहेरुन काँग्रेसला टार्गेट केले जात आहे. विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्रात, मुंबईत मेरीटवर काँग्रेसला जास्त जागा मिळायला हव्या होत्या. मात्र, मित्रपक्षांशी वाटाघाटी करताना घोळ झाला. त्याबाबत राहुल गांधींना सांगितले. त्यावर त्यांचे समाधान झाले. काँग्रेसची दुसरी उमेदवार यादी आजच जाहीर करणार आहेत तर शेवटची तिसरी उमेदवार यादी उद्या जाहीर करणार आहोत. जागावाटप हा सगळ्यांसाठी पेच असणारा विषय असतो. कार्यकर्त्यांचा दबाव असतो. सगळ्यांना सोबत घेऊन आम्ही जात आहोत, असे नाना पटोले म्हणाले.विश्वगुरुंच्या पक्षात देखील जागावाटपात आलबेल नाही मात्र त्याविषयी कोणी बोलत नाही, असा टोलाही पटोले यांनी लगावला.

### *ओबीसींना जागा देण्याचा आग्रह*

ओबीसीतील दुर्लक्षित जातींना उमेदवारांच्या यादीत स्थान द्या, ओबीसींच्या जागांवर विशेष लक्ष द्या. आपण जातीय जनगणना आणि ओबीसी मुद्यावर आक्रमक आहोत त्यामुळे त्यांना प्रतिनिधित्व मिळालं पाहिजे,अशा सूचना राहुल गांधी यांनी दिल्या आहेत. बाळासाहेब थोरात उद्या (शनिवारी) शरद पवार यांना भेटणार आहेत. उद्या पुन्हा राहिलेल्या जागांवर चर्चा होईल. तसेच सीईसीची बैठक आता दिल्लीला होणार नाही. उद्या बैठक ऑनलाईन बैठक होईल असे नाना पटोले यांनी सांगितले.

## 5 जागा द्या नाहीतर 25 जागा लढवू!

### अबू आझमींचा मविआला अल्टिमेटम

**मुंबई ।** महाविकास आघाडीचे जागावाटपाचे घोडे अजूनही अडले असून आता समाजवादी पक्षानेही निर्वाणीचा इशारा दिला आहे. पक्षाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष अबू आझमी यांनी शुक्रवारी आघाडीला एक दिवसाचा अल्टिमेटम दिला आहे. आम्हाला पाच जागा द्या, आम्ही 25 मतदारसंघात उमेदवार उभे करू, असे आझमी यांनी म्हटले आहे. आघाडीचा जागावाटपाचा फॉर्म्यूला अद्याप ठरलेला नाही. त्यामुळे छोट्या मित्रपक्षांची धाकधूक वाढली आहे. त्यापैकी समाजवादी पक्ष महत्वाचा मानला जात आहे. या पक्षाने आघाडीकडे पाच जागांची मागणी केली आहे. त्यासाठी अबू आझमी यांनी शुक्रवारी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांची भेट घेतली.

पवारांच्या भेटीनंतर आझमी यांनी मीडियाशी बोलताना आघाडीला अल्टिमेटम दिला. आम्ही आघाडीकडे पाच जागा मागितल्या आहेत. त्याचे उत्तर देण्यासाठी शनिवारपर्यंत वेळ दिला आहे. पाच जागांमध्ये भिंवडी पूर्व मानखूर्द, भिवंडी पश्चिम, मालेगांव आणि धुळे शहर हे मतदारसंघ आहेत. या जागांवर आम्ही जिंकून येऊ शकतो. शनिवारी दुपारपर्यंत आम्ही वाट पाहू. त्यानंतर मात्र आम्ही निर्णय घेऊ. मी 25 उमेदवारांची घोषणा करेन. महाराष्ट्रात मला निर्णय घेण्याचे अधिकार अखिलेश यादव यांनी दिले आहे. तुम्ही अल्पसंख्यांकांना प्रतिनिधित्व दिले नाही तर तुमच्याजवळ आणखी एक हरियाणा असेल, असा इशारा आझमींना दिला.

## लढा थांबता कामा नये, जरांगेंच्या डोळ्यात अश्रू

### इच्छुकांच्या मुलाखती दरम्यान भावुक

प्रतिनिधी
जालना

मराठा आरक्षणावरुन जरांगे आणि सरकारमध्ये संघर्ष आणखी तीव्र झालाय. आचारसंहिता लागायच्या आत आरक्षण देण्याची मागणी जरांगेनी सरकारकडे केली होती. मात्र सरकारनं जरांगेंच्या इशाऱ्याची सरकार दखल घेतली नाही. आता उमेदवार उभे करुन भाजपचा सुपडा साफ करणार असा इशारा जरांगेंनी दिलाय. वर्षभरापासून उपोषण, रॅली, गावबंदी अशा माध्यमातून लढा देणारे जरांगे आता थेट निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत.



आंतरवाली सराटीमध्ये मनोज जरांगेंनी तब्बल 25 तास इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या. यावेळी ते भावूक झाले होते. लढा थांबता कामा नये म्हणत जरांगे पाटलांनी आपल्या अश्रूंना वाट मोकळी करून दिली. यामुळे काहीकाळ वातावरण गंभीर झालं होतं.

राज्यभरातून हजारो इच्छुक उमेदवारांनी गुरुवारी सकाळपासून अंतरवाली सराटी येथे मुलाखतीसाठी गर्दी केली. गुरुवारी सकाळी 8 वाजता सुरू झालेल्या जिल्हानिहाय इच्छुकांच्या मुलाखती आज सकाळी 9 वाजता संपल्या. लढायचे अन् पाडायचे अशी भूमिका घेत मनोज जरांगे यांनी विधानसभा निवडणुकीची तयारी सुरू केली आहे.


## वाशी खाडी पुलावर भीषण अपघात

# एका महिलेसह तिघांचा मृत्यू

प्रतिनिधी
नवी मुंबई

नवी मुंबईत आज (२५ ऑक्टोबर २०२४) पहाटे कार आणि डंपर यांच्यात झालेल्या भीषण अपघातात एका महिलेसह तिघांचा मृत्यू झाला आहे. पुण्याहून मुंबईकडे जात असताना वाशी खाडी पुलावर पहाटे सव्वाचारच्या सुमारास त्यांच्या कारला अपघात झाला. हा अपघात कसा झाला? हे अद्याप पोलिसांना कळू शकलेले नाही. सर्वांचे मृतदेह शवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात पाठविण्यात आले असून या घटनेने परिसरात एकच खळबळ माजली.

मिळालेल्या माहितीनुसार, आज पहाटे चार वाजताच्या सुमारास हा अपघात घडला. या अपघाताची माहिती मिळताच स्थानिक पोलीस



घटनास्थळी दाखल झाले. एका अधिकऱ्याने सांगितले की, काही लोक पुण्याहून मुंबईच्या दिशेने येत असताना वाशी खाडी पुलाजवळ त्यांच्या कारची डंपरला धडक बसली. हा अपघात इतका भीषण होता की, कारमधील तिघांचा जागीच मृत्यू झाला. मृतांमध्ये दोन पुरूष आणि एका महिलेचा समावेश आहे. सर्व मृतदेह शवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात पाठवण्यात आले आहेत. याप्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून अपघाताचे कारण शोधण्याचा प्रयत्न केला जात आहे.

समृद्धी महामार्गावर आज पहाटे चार वाजताच्या सुमारास वाशिमच्या कारंजा टोल प्लाझाजवळ दोन ट्रकमध्ये अपघात घडला. रस्त्यावर उभ्या असलेल्या ट्रकला पाठीमागून आलेल्या ट्रकने जोरदार धडक दिली. रस्त्यात उभ्या असलेल्या ट्रकमध्ये केमिकलच्या कॅन होत्या. त्यामुळे लगेच आग लागली. या घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या तीन गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या आणि आग आटोक्यात आणली.

## राज्यात पोलीस अलर्ट 24 तासांत 52 कोटींची रोकड जप्त

### निवडणुक काळात कारवाई जोरात

मुंबई

राज्यात विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर 15 ऑक्टोबरपासून महाराष्ट्रात आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. राज्य शासनाच्या व केंद्र शासनाच्या विविध अंमलबजावणी यंत्रणांद्वारे करण्यात आलेल्या कारवाईत बेकायदा पैसे, दारू, ड्रग्ज व मौल्यवान धातू इत्यादी बाबतीत 15 ते 24 ऑक्टोबरपर्यंत या 10 दिवसांत एकूण 90 कोटी 74 लाख रुपयांची मालमत्ता जप्त करण्यात आली आहे. त्यापैकी, गेल्या 24 तासात 52 कोटी रुपयांची मालमत्ता जप्त करण्यात आली असल्याची माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने दिली आहे. दरम्यान, आज पुण्यात सोन्याची वाहतूक करणाऱ्या टेम्पोचीही पोलिसांनी तपासणी केली होती. तर, दोन दिवसांपूर्वी खेड-शिवापूर येथे एका कारमधून 5 कोटींपेक्षा जास्त रोकड जप्त करण्यात आली होती. त्यानंतर, आज जळगाव आणि बीडमध्येही रोकड जप्त करण्यात आली आहे.

## दिल्लीतल्या पदयात्रेत अरविंद केजरीवाल यांच्यावर हल्ला

### आपचा भाजपावर गंभीर आरोप

प्रतिनिधी
नवी दिल्ली

दिल्लीतल्या पदयात्रेत दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्यावर हल्ला करण्यात आला आहे. भाजपाने गुंड पाठवून हा हल्ला घडवून आणल्याचा आरोप आपने केला आहे. आम आदमी पक्षाचे नेते मनिष सिसोदिया यांनी एक्स या सोशल मीडिया साईटवर पोस्ट लिहून ही माहिती दिली आहे.

दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्यावर झालेला हल्ला निंदनीय आहे. भाजपाच्या गुंडांनी हा हल्ला घडवून आणला. जर अरविंद केजरीवाल यांना काही झालं तर त्याची संपूर्ण जबाबदारी भाजपाची असेल. आम्ही घाबरणारे लोक नाहीत. आम आदमी पक्षाची जी मोहीम सुरु आहे ती बंद होणार नाही.



भाजपाने आज विकासपुरी या ठिकाणी सुरु असलेल्या पदयात्रेत अरविंद केजरीवाल यांच्यावर हल्ला घडवून आणला. आधी अरविंद केजरीवाल यांना खोट्या गुन्ह्यांत अडकवण्यात आलं. त्यानंतर त्यांना अटक करण्यात आली. तुरुंगात असताना त्यांचं इन्शुलिनचं इंजेक्शन थांबवून त्यांना मारण्याचा कट रचला. आता न्यायालयाने त्यांना जामीन मंजूर केल्यानंतर भाजपाने गुंडांतर्फे अरविंद केजरीवाल यांच्यावर हल्ला केला आहे. अशी पोस्ट दिल्लीच्या मुख्यमंत्री आतिशी यांनी केली.

## कॅनडाने भारताच्या पाठीत खंजीर खुपसला

### भारताचे उच्चायुक्त संजय वर्मा यांचा आरोप

प्रतिनिधी
नवी दिल्ली

एक मैत्रीपूर्ण लोकशाही असलेल्या देशाने पाठीत खंजीर खुपसल्याचा गंभीर आरोप भारताचे उच्चायुक्त संजय वर्मा यांनी कॅनडाच्या वागणुकीवर आक्षेप घेताना केला. कॅनडाने अत्यंत अव्यावसायिक पद्धतीने वागवल्याचेही त्यांनी म्हटले आहे. वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत ते बोलत होते.

भारतात परतल्यानंतर बुधवारी 'पीटीआय'शी विविध मुद्द्यांवर बोलताना वर्मा यांनी कॅनडातील खलिस्तानी चळवळीची उत्पत्ती, स्थानिक राजकारण्यांकडून निवडणुकीतील फायद्यासाठी मिळत असलेला पाठिंबा आदींविषयी सांगितले. खलिस्तानी आपली संख्या वाढवण्यासाठी गुन्हेगारी कारवाया करतात, असा आरोपही त्यांनी केला.

भारतीय तंत्रज्ञान संस्थेचे पदवीधर आणि अणुशास्त्रज्ञ असलेले वर्मा यांनी यापूर्वी जपान आणि सुदानमध्ये भारताचे राजदूत म्हणून काम केले आहे. दोन देशांमधील संबंध बिघडल्यानंतर कॅनडाने १३ ऑक्टोबर रोजी वर्मा यांना भारताने खलिस्तानी दहशतवादी म्हणून घोषित केलेल्या हरदीप सिंग निज्जर



या कॅनेडियन नागरिकाच्या हत्येत स्वारस्य असल्याचा आरोप केला होता. कॅनडाने पुढील कारवाई करण्यापूर्वी भारताने वर्मा आणि इतर पाच मुत्सद्दींना परत बोलावले.

दरम्यान, खलिस्तानच्या मूठभर समर्थकांनी कॅनडातील विचारधारेला गुन्हेगारीत रूपांतरित केले आहे. तेथे बंदुक चालवणे आणि मानवी तस्करीचे प्रकार सर्रास होतात. तरीही कॅनडातील अधिकारी त्याकडे डोळेझाक करतात. 'मतपेढी' हे त्यामागे एकमेव कारण असल्याचे वर्मा यांनी मुलाखतीत म्हटले आहे.

द्विपक्षीय संबंधांसाठी कॅनडाचा हा सर्वांत अव्यावसायिक दृष्टीकोन आहे. दोन्ही देशांमधील संबंध मोठे आहेत, असे त्यांना वाटत असेल, तर हा मुद्दा हाताळण्यासाठी त्यांच्याकडे इतर राजनैतिक साधने उपलब्ध आहेत आणि त्या साधनांचा वापर हे संबंध कायम ठेवण्यासाठी केला जाऊ शकतो, असे वर्मा यांनी सांगितले.

## धारावीच्या कुंभारवाड्यातील दिवाळीचा आनंद द्विगुणित

# धारावी सोशल मिशनच्या साहाय्याने सुमारे 10 लाख दिव्यांची विक्री

### अनोख्या उपक्रमातून 'मेड इन इंडिया, मेड इन धारावी'चा संदेश





प्रतिनिधी
मुंबई

अनेक दशकांची व्यावसायिक आणि सांस्कृतिक परंपरा लाभलेल्या धारावीच्या कुंभारवाड्यातील दिवाळीचा आनंद यंदा द्विगुणित होणार आहे. धारावी रिडेव्हलपमेंट प्रोजेक्ट प्रायव्हेट लिमिटेडच्या (डीआरपीपीएल) 'धारावी सोशल मिशन' उपक्रमाच्या माध्यमातून यंदा कुंभरवाड्यातून तब्बल 10 लाख मातीच्या दिव्यांची खरेदी करण्यात आली असून आजवर कुंभारवड्याला मिळालेली ही सर्वात मोठी व्यावसायिक संधी म्हणता येईल. हे दिवे छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ प्राधिकरणाच्या वतीने पॅसेंजर एंगेजमेंट उपक्रमात तर अदानी फाउंडेशनच्यावतीने दिवाळीच्या विविध कार्यक्रमांमध्ये वापरले जाणार आहेत.



या अनोख्या उपक्रमात कुंभारवाड्यातील सुमारे 500 कुशल आणि अकुशल कामगारांचा सहभाग असून पारंपरिक पद्धतीने तयार केल्या जाणाऱ्या या दिव्यांसाठी कुटुंबातील सर्वच लहानमोठ्यांनी हातभार लावला आहे. गेल्या काही वर्षांपासून सणासुदीच्या दिवसांत केवळ दिवेच नव्हे तर इतर बाबींसाठी देखील ग्राहक रेडिमेड परदेशी वस्तूंना पसंती देताना दिसतात. मात्र, अनेक वर्षांची समृद्ध परंपरा लाभलेल्या दिव्यांच्या बाजारपेठेत मातीतील कुशल कामगारांना न्याय देतानाच 'मेड इन इंडिया आणि मेड इन धारावी ' चा संदेश देण्यासाठीच धारावी सोशल मिशनने पुढाकार घेतला आहे.

10 लाख दिवे! इतक्या मोठ्या प्रमाणात दिव्यांची निर्मिती करून त्यांच्या विक्रीसाठी आम्हाला सहकार्य केल्याबद्दल मी कुंभारवाड्यातील बांधवांच्या वतीने डीआरपीपीएलचे आभार मानतो! हा उपक्रम केवळ व्यावसायिकदृष्ट्या आम्हाला फायदेशीर ठरला नसून यातून कुंभारवाड्याची समृध्द परंपरा अधोरेखित करत स्वदेशीचा नारा देण्यात आला, ही बाब देखील आमच्यासाठी पान 8 वर

*मुंबई : भारत सरकारच्या जहाज मंत्रालयाने नितीन बोरवणकर यांची मुंबई बंदर प्राधिकरणाचे मुख्य यांत्रिक अभियंता (सी.एम.ई.) म्हणून नियुक्ती केल्याबद्दल त्यांचे काल मुंबई पोर्ट ट्रस्ट डॉक अँड जनरल एम्पलॉईज युनियनच्या वतीने ज्येष्ठ कामगार नेते व युनियनचे अध्यक्ष ॲड. एस. के. शेट्येसाहेब यांनी शाल व पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. त्याप्रसंगी सोबत युनियनचे जनरल सेक्रेटरी सुधाकर अपराज , सेक्रेटरी विजय रणदिवे, दत्ता खेसे, मनीष पाटील, संघटक चिटणीस प्रवीण काळे, आप्पा भोसले, संतोष कदम*



## थोडक्यात

### कॅनन इंडियातर्फे कॅमेरांच्या विस्तृत श्रेणीचे अनावरण

**मुंबई:** डिजिटल इमेजिंग सोल्यूशन्स प्रदान करणाऱ्या कॅनन इंडिया या आघाडीच्या कंपनीने ब्रॉडकास्ट इंडिया शो २०२४ च्या ३३ व्या आवृत्तीत आपल्या सर्वात विस्तृत आणि आकर्षक बूथचे अनावरण केले.. हा शो जिओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटर येथे १७ ते १९ ऑक्टोबर दरम्यान आयोजित करण्यात आला आहे. या संधीचा फायदा घेऊन कॅननने सिनेमा आणि व्यावसायिक व्हिडिओपासून ते मिररलेस आणि पीटीझेड कॅमेरे तसेच आरएफ आणि सिने लेन्सिसच्या व्यापक श्रेणीसह आपल्या इमेजिंग सोल्यूशन्सची संपूर्ण इकोसिस्टम एकाच छताखाली प्रदर्शित केली. या बूथच्या उद्घाटनाच्या प्रसंगी हिंदी आणि बंगाली चित्रपट सिनेमेटोग्राफर सुदीप चटर्जी उपस्थित होते. कॅनन इंडियाच्या सहभागाविषयी टिप्पणी करताना अध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकारी तोशियाकीनोमुरा म्हणाले, "कॅनन इंडिया येथे आम्ही व्हिडिओ-फर्स्ट धोरण पुढे नेत आहोत, ज्याचा फोकस व्हिडिओ उद्योगाच्या गतिशील आणि सतत बदलत्या गरजा पूर्ण करणारी आधुनिक उत्पादने आणि सोल्यूशन्स प्रदान करण्यावर आहे. या क्षेत्रातील व्यावसायिकांकडून मिळालेल्या उदंड प्रतिसादाने आम्ही भारावून गेलो आहोत आणि व्हिडिओ आणि प्रसारण क्षेत्राच्या भविष्याला आकार देण्यात नेतृत्व करण्यास उत्सुक आहोत."

### नाट्यपरागतर्फे दिवाळीनिमित्त 'असेन मी नसेन मी' मैफल

**मुंबई:** नाट्यपराग संस्थेतर्फे यंदा दिवाळीच्या निमित्ताने ज्येष्ठ संगीतकार यशवंत देव यांच्या गीतांचा कार्यक्रम आयोजित केला आहे. २ नोव्हेंबर २०२४ रोजी दादर येथील स्वातंत्र्यवीर सावरकर स्मारक येथे दुपारी तीन वाजता 'असेन मी नसेन मी' ही संगीतमय मैफल रंगणार आहे. प्रसिद्ध गायिका आशा भोसले यावेळी उपस्थित राहणार आहेत.
नाट्यपराग संस्थेतर्फे गेली ४६ वर्षे विविध सामाजिक, सांस्कृतिक, साहित्यिक उपक्रम राबविले जातात. यापूर्वी पु. ल. महोत्सव, प्र. के. अत्रे यांच्या जयंतीनिमित्त अत्रे उत्सव कार्यक्रम संस्थेने केला होता. यावर्षी पंडित यशवंत देव यांच्या सहाव्या स्मृतिदिनानिमित्त त्यांनीच स्वरबद्ध केलेली गीते या कार्यक्रमात सादर केली जाणार आहेत. कार्यक्रमाचे संगीत संयोजन प्रशांत लळीत करणार असून, निवेदन प्रसिद्ध निवेदिका मंगला खाडिलकर करणार आहेत. गायक मंदार आपटे, माधुरी करमरकर, तनुजा जोग आणि सचिन खैरनार विविध गीते सादर करणार आहेत. कार्यक्रम विनामूल्य असून प्रवेशिकांसाठी ८०९७७५३५७८, ८८७९६५५८०२ या क्रमांकावर संपर्क साधावा.

**महत्त्वपूर्ण निवेदन**

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीचा मजकूर स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी आपल्या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तीबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान व हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.ला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्याच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी वाचकांनी आवश्यकती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

# मविआत टेंशन वाढले वसई, नालासोपाऱ्यात बविआ-मविआ युतीची शक्यता?

**प्रतिनिधी**
■ **वसई**

पालघर जिल्ह्यात आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर वसई आणि नालासोपारा मतदारसंघात राजकीय हालचालींना गती आली आहे. बहुजन विकास आघाडी (बविआ) ने पूर्वी घोषणा केली होती की, पालघर जिल्ह्यातील सहाही जागांवर ते स्वतंत्रपणे उमेदवार उभे करतील. मात्र, आता परिस्थिती काहीशी वेगळी दिसू लागली आहे, आणि वसई आणि नालासोपारा या दोन्ही मतदारसंघांमध्ये बविआ महाविकास आघाडीसोबत (मविआ) युती करणार का, हा प्रश्न राजकीय वर्तुळात गाजत आहे.

काँग्रेसकडून त्यांच्या उमेदवारांची यादी नुकतीच प्रसिद्ध करण्यात आली असून त्यात वसई आणि नालासोपारा मतदारसंघ वगळण्यात आले आहेत. त्यामुळे बविआ-मविआ युतीच्या शक्यतेवर अधिक चर्चा सुरु झाली आहे. मविआचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांचीही वसई आणि नालासोपारा मतदारसंघात बविआला पाठिंबा देण्याची इच्छा आहे. ही शक्यता अधिक मजबूत होत असताना मविआच्या इच्छुकांचे मात्र तणाव वाढले आहे, कारण त्यांना आता उमेदवारी मिळण्याबाबतची अनिश्चितता जाणवू लागली आहे.

याचवेळी ठाकरे गटाने बोईसर मतदारसंघासाठी आपला उमेदवार निश्चित केला आहे, परंतु वसई आणि नालासोपारा मतदारसंघात अद्याप उमेदवार निश्चित नाही. मविआ जर बविआला या दोन मतदारसंघांमध्ये पाठिंबा देण्याचे ठरवले तर स्थानिक मविआ नेते याला विरोध करू शकतात. मविआ आणि बविआच्या स्थानिक नेत्यांमध्ये मतभेद असल्याने बविआला पाठिंबा देण्याची जोखीम मविआ पत्करेल का? हा प्रश्नही उपस्थित आहे.

याचबरोबर बोईसरमध्ये मविआचे ठाकरे गटाचे उमेदवार असताना बविआविरोधात सामना करावा लागेल का, हा देखील एक गहन मुद्दा झाला आहे. त्यामुळे वसई आणि नालासोपाऱ्यात संभाव्य युती आणि बोईसरमध्ये टक्कर अशी विचित्र राजकीय परिस्थिती निर्माण झाली आहे. यामुळे मविआ आणि बविआचे नेते सध्याच्या स्थितीचा गंभीर विचार करत आहेत.

# निवडणुका आल्या की पाईपलाईन अंथरण्याचा 'निवडणूक स्टंट'

## काँग्रेसचा बविआवर आरोप

**प्रतिनिधी**
■ **वसई**

विधानसभा निवडणुका जवळ आल्या की नागरिकांना पाण्याचे स्वप्न दाखवत भूमिगत पाईपलाईन अंथरण्याची कामे केली जातात. मात्र त्यानंतर नागरिकांना पाणी मिळत नाही, असे गंभीर आरोप काँग्रेसने बहुजन विकास आघाडीवर (बविआ) केले आहेत. काँग्रेसच्या म्हणण्यानुसार, बविआ दर पाच वर्षांनी निवडणुका तोंडावर आल्या की पाण्याचा मुद्दा उचलून निवडणुकीसाठी कामाला सुरुवात करते, परंतु या योजना फक्त दिखाऊ आणि निवडणूक स्टंट असल्याचा दावा त्यांनी केला आहे.

सध्या वसई स्टेशन पश्चिम परिसरातील 100 फुटी रोड येथे भूमिगत पाईपलाईन अंथरण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. मात्र, हे काम निवडणुकीसाठी वापरले जात असल्याचा आरोप काँग्रेसने लावला आहे.

काँग्रेसचे म्हणणे आहे की, पाच वर्षांपूर्वी देखील अशाच प्रकारे पाईपलाईन अंथरण्याची घोषणा करून नागरिकांना आश्वासित करण्यात आले होते.परंतु प्रत्यक्षात पाण्याची समस्या सुटली नाही.वसई-विरार परिसरातील पाण्याची समस्या गंभीर असून वाढती लोकसंख्या, अनधिकृत बांधकामे आणि नगरपालिकेतील भ्रष्टाचार यामुळे परिस्थिती आणखी बिकट झाली आहे. येत्या प्रचारात या विषयावर जोरदार टीका केली जाईल, आणि बविआला त्यांच्या योजनांची आणि आश्वासनांची उत्तरे द्यावी लागतील, असा काँग्रेसने इशारा दिला आहे.

***राजकीय पक्षांची भूमिका***
*वसई-विरार परिसरात पाण्याची मागणी दिवसेंदिवस वाढत असून नागरिकांची पाणी समस्या गंभीर बनली आहे. काँग्रेससह इतर विरोधी पक्ष या मुद्यांवर बविआला घेरणार असल्याची शक्यता आहे, ज्यात पाणी पुरवठा, अनधिकृत बांधकामे आणि पालिकेतील भ्रष्टाचार हे मुद्दे चर्चेत येतील.*

***नागरिकांच्या अपेक्षा***
*वसईतील नागरिक या पाईपलाईन योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीची प्रतिक्षा करीत आहेत, परंतु निवडणुकीच्या तोंडावर फक्त घोषणा आणि कामे न करता वास्तवात पाणी पुरवठा सुरु करावा अशी त्यांची मागणी आहे.*

# चर्नीरोड ते ऑपेरा हाऊस रस्त्याला हेरिटेज लूक

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

दक्षिण मुंबईतील रस्त्यांना हेरिटेज लुक देण्याचा मुंबई महानगर पालिकेचा प्रकल्प असून या अंतर्गत चर्नीरोड रेल्वे स्टेशन ते ऑपेरा हाऊस दरम्यान असलेल्या रस्त्याला हेरिटेज लूक देण्यात येणार आहे. यात हेरिटेजला साजेसे असे डेकोरेटिव्ह पथदिवे बसवण्यात येणार आहेत. त्यामुळे या भागाचा पूर्ण चेहरा मोहरा बदलून जाणार आहे.

दक्षिण मुंबईत मोठ्या प्रमाणात ब्रिटिशकालीन इमारती असून या इमारतींना साजेसे असे रस्ते, पदपथ, पथदिवे, चौक व आजूबाजूच्या परिसराचा विकास करण्यात येत आहे. या अगोदर छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस व मुंबई महापालिका मुख्यालय समोरील डी. एन. रोड चौकाला हेरिटेज लूक देण्यात आला. येथील पदपथाच्या दगडांसह स्ट्रीट लाईट, सिग्नल व आजूबाजूचा परिसर येथील हेरिटेज इमारतींना साजेसा असा बनवण्यात आला आहे. त्यानंतर चर्चगेट रेल्वे स्टेशन पूर्वेकडून सुरू होऊन आयकर भवन, चंदनवाडी स्मशानभूमी, मरीन लाइन्स रेल्वे स्टेशन, स. का. पाटील उद्यान व चर्नी रोड स्टेशनपर्यंत जाणाऱ्या महर्षी कर्वे रोडवर हाते चौकपासून आनंदीबाई पोद्दार जंक्शनपर्यंत हेरिटेज टाईप डेकोरेटिव्ह स्ट्रीट लाईट पोल बसवण्यात आले आहेत.

### डेकोरेटिव्ह पथ दिवे बसवणार

तिसऱ्या टप्प्यात चर्नीरोड रेल्वे स्टेशन ते ऑपेरा हाऊस पर्यंतच्या महर्षी कर्वे रस्त्यावरील पथदिव्यांचे जुने पोल बदलून त्या ठिकाणी डेकोरेटिव्ह पोल बसवण्यात येणार आहेत. यासाठी मुंबई महापालिका १ कोटी ७६ लाख ८१ हजार रुपये खर्च करणार आहे. यासाठी निविदा प्रक्रिया राबविण्यात आली असून येत्या १५ दिवसात ही प्रक्रिया पूर्ण करून कंत्राटदाराची नियुक्ती करण्यात येणार आहे. त्यामुळे येणाऱ्या वर्षभरात ऑपेरा हाऊस पर्यंतचा महर्षी कर्वे रोडचे बदललेला चेहरा मोहरा मुंबईकरांना बघायला मिळणार आहे. अशाच प्रकारे दक्षिण मुंबईतील अन्य रस्त्यांना हेरिटेज ब्रिटिशकालीन लूक देण्यात येणार आहे. यासाठी २०२५-२६ या अर्थसंकल्पात आर्थिक तरतूदही करण्यात येणार आहे.

# नालासोपाऱ्यात अनैतिक व्यापाराचा पर्दाफाश

**प्रतिनिधी**
■ **वसई**



महिला अटकेत; दोन पीडितांची सुटका

वसई तालुक्यातील नालासोपारा पूर्व भागात एका महिलेने चालवलेला अवैध व्यवसाय उघडकीस आल्याने अनैतिक मानवी वाहतूक शाखेच्या पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी छापा टाकून या धंद्यात अडकलेल्या दोन महिलांची सुटका केली, तसेच मुख्य आरोपी महिलेला अटक करण्यात आली आहे.

अटक झालेल्या महिलेचे नाव नेहा मेराज खान (वय २७ वर्षे) असल्याचे पोलिस सूत्रांनी सांगितले. तिच्यावर अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंधक कायदा (पीटा) २००० अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, खान हिने अनेक भागातील महिलांचा वापर करून हा अवैध व्यवसाय चालवला होता. तपासादरम्यान, त्या महिलांना चांगला मोबदला देण्याचे आमिष दाखवले जात होते, असे उघड झाले आहे.

या प्रकरणात पोलिसांनी अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंधक कायद्याच्या कलम ३७० आणि ३७१ अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. याशिवाय दोन पीडित महिलांची सुरक्षित सुटका करण्यात आली आहे. सध्या नालासोपारा पोलिस पुढील तपास करत असून या अवैध धंद्याच्या मागील अधिक गुंतागुंतीची माहिती काढण्याचे काम सुरू आहे.

सदर छाप्याची कारवाई पोलिस निरीक्षक सौरभी पवार यांच्या नेतृत्वाखाली पार पडली. स्थानिक रहिवाशांच्या मदतीने ही माहिती पोलिसांपर्यंत पोहोचली असल्याचे समजते. पुढील तपासात आणखी काही महिलांची सुटका होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

# बविआला मोठा फटका बसण्याची शक्यता; विलास तरेंच्या संपर्कात अनेक पदाधिकारी?

**प्रतिनिधी**
■ **वसई**

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर विविध पक्षातील उमेदवार तिकीट मिळविण्याच्या तयारीत असतानाच, इतर पक्षातील प्रमुख पदाधिकाऱ्यांना आपल्या गोटात ओढण्याचे प्रयत्नही सुरू आहेत. यात बविआचे सर्वेसर्वा आमदार हितेंद्र ठाकूर यांच्यासाठी हा काळ विशेषतः आव्हानात्मक ठरतोय, कारण शिंदे गटाच्या माध्यमातून भाजपात सामील झालेले माजी आमदार विलास तरे यांनी बविआच्या अनेक प्रमुख नेत्यांना आपल्याकडे आकर्षित केल्याची माहिती मिळत आहे.

वसईतील शिरसाडपासून वालीव, गोखिवरे आणि वसई पश्चिमपर्यंत बविआच्या अनेक पदाधिकाऱ्यांनी विलास तरेंशी संपर्क साधल्याचे समजते. या बदलामुळे बविआला निवडणुकीत मोठा फटका बसण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

याबाबतची माहिती आमदार ठाकूर यांना मिळाल्यानंतर त्यांनी पक्षाच्या बैठकीत पदाधिकाऱ्यांना फैलावर घेतल्याचेही कळते. बविआला आलेल्या या धक्क्यामुळे आगामी निवडणुकीत त्यांचा प्रभाव कमी होण्याची शक्यता आहे. आता या राजकीय संघर्षात कोण बाजी मारतो, हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे.

# एसएससी परीक्षेसाठी प्रविष्ठ विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज भरण्यासाठी मुदतवाढ द्यावी

## महाराष्ट्र पुरोगामी शिक्षक संघटनेची मागणी

■ **मुंबई**




इयत्ता 10 वी परीक्षेसाठी प्रविष्ठ असणाऱ्या विद्यार्थ्यांचे ऑनलाईन अर्ज भरण्याची प्रक्रिया सध्या सुरु आहे. फॉर्म भरण्यासाठी अंतिम मुदत 5 नोव्हेंबर 2024 देण्यात आली आहे. मात्र वेबसाईट वर येणाऱ्या तांत्रिक अडचणी, शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना आलेल्या निवडणुक ड्यूटी आणि प्रशिक्षण तसेच दिवाळी सुट्ट्या लक्षात घेता 5 नोव्हेंबर 2024 ही फॉर्म भरण्याची मुदत पर्याप्त होणार नसल्याने विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज भरण्यासाठी मुदतवाढ द्यावी अशी मागणी संघटनेचे राज्याध्यक्ष तानाजी कांबळे व संघटनेचे सचिव संजय केवटे यांनी महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक मंडळ,पुणे तसेच सर्व. विभागीय मंडळाचे अध्यक्ष व सचिव यांच्याकडे केली आहे

साधारण 26 ऑक्टोबर ते 12 नोव्हेंबर 2024 या कालावधीत सर्व विद्यार्थी आणि शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना दिवाळी सणानिमित्त सुट्टी असणार आहे. काही शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी दिवाळी सणानिमित्त आपल्या मूळगावी जातील. तरी दिवाळीच्या सुट्ट्या संपल्यानंतर म्हणजेच 12 नोव्हेंबर 2024 नंतर पुढील किमान 7 दिवसांपर्यंत ( 20 नोव्हेंबर पर्यंत) इयत्ता 10 वी फॉर्म भरण्यासाठी मुदतवाढ मिळावी अशी मागणी करण्यात आली आहे.

# चरोटी उत्पादन शुल्क विभागाची करडी नजर अवैध वाहतूक व मद्य तस्करावर कारवाई

**प्रतिनिधी**
■ **पालघर**

डहाणू उत्पादन शुल्क विभागाचे निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, डहाणू जि. पालघर यखात्रीलायक बातमी नुसार लगतच्या केंद्र शासित प्रदेशातुन होणा-या मद्य तस्करीवर आळा बसावा उद्देशाने उत्पादन शुल्क विभागातुन दिवसरात्र गस्त व करडी नजर ठेवली जात असते दिनांक २५/१०/२०२४ रोजी विशेष पॅकिंग करुन पुठ्यांच्या खोक्यात लपविलेले अवैध मद्य वाहतुकीवर निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, डहाणू जि. पालघर विभागाचे निरीक्षक श्री. सुनिल देशमुख, निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, भरारी पथक, पालघर जि. पालघर विभागाचे निरीक्षक ए.एस. चव्हाण, दुय्यम निरीक्षक राजेश एस. शिंदे, दुय्यम निरीक्षक विश्वजीत एम. आभाळे, दुय्यम निरीक्षक विकास के. आबनावे, सहाय्यक दुय्यम निरीक्षक ए.एम.शेख, जवान कमलेश पेंदाम, जवान अमोल नलावडे जवान-नि-वाहनचालक श्री. शशिकांत पाटील यांनी विभागात सापळा रचुन मौजे उधवा, उधवा-तलासरी रोड ता. तलासरी जि.पालघर येथे महिंद्रा कंपनीची पांढ-या रंगाची पिकअप गाडी क्र. MH-48/CQ-2716 जप्त केलेली आहे सदर वेळी १ चारचाकी वाहन जप्त करण्यात आलेले आहे.



परराज्यातील मद्य विदेशी मद्याचे एकुण ८० बॉक्स, (सर्व मुददेमाल दादरा नगर हवेली राज्यात विक्री करीता)वाहन मद्य वाहतुकीसाठी वापरलेली महिंद्रा कंपनीची पांढ-या रंगाची पिकअप गाडी क्र. MH-48/CQ-2716 -रु,१०,००,०००/-गुन्हयांत जप्त केलेला सर्व मुददेमाल दादरा नगर हवेली राज्यात विक्री करीता आहे. जप्त मुददेमालाची एकुण किंमत रु.१५,४३,७२० /- इतकी आहे.

राम बहादूर यादव, 25 वर्षीय य इसमास अटक करण्यात यश आले असून सदर आरोपी मु.पो. कृष्णा नगर धनानी नगर बोईसर (पूर्व) ता. जी.पालघर सदरची कारवाई मुंबई तसेच अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, पालघर आणि श राज्य उत्पादन शुल्क, पालघर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यांत आली.

# निवडणुकीच्या धामधूमीत अनधिकृत चाळींचा विळखा

## वसई-विरार महानगरपालिकेसमोर मोठं आव्हान



**प्रतिनिधी**
■ **वसई**

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर वसई-विरार महानगरपालिका क्षेत्रात अनधिकृत बांधकामांचा मुद्दा पुन्हा एकदा उफाळून आला आहे. आचारसंहितेमुळे महानगरपालिका प्रशासन निवडणूक तयारीत व्यस्त असताना, भूमाफियांनी या संधीचा फायदा घेत अनधिकृत चाळींची उभारणी जोरात सुरू केली आहे. वसईतील वालीव, पेल्हार, चंदनसार अशा प्रभागांमध्ये या चाळींचा मोठा सुळसुळाट झाल्याचे निदर्शनास आले आहे.

महानगरपालिकेने आधीच वाढत्या अनधिकृत बांधकामांवर नियंत्रण आणण्यासाठी प्रयत्न सुरू केले होते. मात्र, आचारसंहितेच्या काळात अनेक प्रशासकीय आणि तांत्रिक मर्यादा येत असल्याने कारवाई करणे कठीण झाले आहे. या संधीचा फायदा घेत भूमाफिया अनधिकृत चाळींच्या माध्यमातून सर्वसामान्य नागरिकांची फसवणूक करत आहेत. या चाळी बोगस दस्तावेज आणि बनावट बांधकाम परवानगीच्या आधारावर विकल्या जातात, ज्यामुळे नागरिकांची फसवणूक होण्याची शक्यता अधिक आहे. याशिवाय, अनधिकृत चाळींमुळे नागरीकरणाचा अनियंत्रित वाढ होतो आहे, ज्यामुळे गुन्हेगारीचाही धोकाही वाढला आहे. वसई-विरार महानगरपालिकेसमोर आता या अनधिकृत बांधकामांवर नियंत्रण आणणे हे मोठे आव्हान आहे.

# रविवारी मध्य व हार्बर वर मेगाब्लॉक

■ **मुंबई**

मध्य रेल्वेवर रविवार सकाळी ११.०५ ते दुपारी ३.०५ पर्यंत माटुंगा-मुलुंड अप आणि डाऊन जलद मार्गावर मेगा ब्लॉक आयोजित करण्यात आला आहे. त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई येथून सकाळी १०.२५ ते दुपारी २.४५ पर्यंत सुटणाऱ्या डाऊन जलद मार्गावरील सेवा माटुंगा आणि मुलुंड स्थानकांदरम्यान डाऊन धिम्या मार्गावर वळवण्यात येतील आणि त्यांच्या नियोजित थांब्यांवर थांबून गंतव्यस्थानावर १५ मिनिटे उशिरा पोहोचतील. ठाण्यापुढील जलद गाड्या मुलुंड येथे डाऊन जलद मार्गावर वळवण्यात येणार आहे.

ठाणे येथून सकाळी १०.५० ते दुपारी ३.०० वाजेपर्यंत सुटणाऱ्या अप जलद मार्गावरील सेवा मुलुंड येथे अप धीम्या मार्गावर वळवण्यात येतील आणि मुलुंड आणि माटुंगा दरम्यान त्यांच्या नियोजित थांब्यावर थांबून पुढे माटुंगा स्थानकावर अप जलद मार्गावर पुन्हा वळवण्यात येतील व गंतव्यस्थानावर १५ मिनिटे उशिराने पोहोचतील. तसेच पनवेल- वाशी अप आणि डाऊन हार्बर मार्गावर सकाळी ११.०५ ते सायंकाळी ४.०५ पर्यंत (नेरुळ/बेलापूर-उरण पोर्ट मार्ग वगळून) मेगा ब्लॉक असणार आहे. त्यामुळे

पनवेल येथून सकाळी १०.३३ ते दुपारी ३.४९ वाजेपर्यंत सुटणारी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई येथे जाणारी अप हार्बर मार्गावरील सेवा आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई येथून सकाळी ९.४५ ते दुपारी ३.१२ या वेळेत पनवेल/बेलापूरकडे जाणारी डाउन हार्बर मार्गावरील सेवा बंद राहतील.

पनवेल येथून सकाळी ११.०२ ते दुपारी ३.५३ वाजेपर्यंत ठाण्याकडे जाणाऱ्या अप ट्रान्सहार्बर मार्गावरील सेवा आणि पनवेल येथून सकाळी १०.०१ ते दुपारी ३.२० वाजेपर्यंत ठाणे येथे जाणाऱ्या डाउन ट्रान्सहार्बर मार्गावरील सेवा बंद राहतील.

# उमेदवारी अर्ज भरताना 'लाडक्या बहिणी'ना सोबत न्या !

## अजित पवारांच्या राष्ट्रवादीकडून नेत्यांना सूचना

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**



विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी राज्यभरात सुरु आहे. महायुतीत असलेल्या अजित पवारांच्या राष्ट्रवादीनं उमेदवारांच्या दोन याद्या प्रसिद्ध करत एकूण ४५ जणांची नावे जाहीर केली आहे. पहिल्या यादीत नावं असलेल्या काहींनी उमेदवारी अर्ज दाखल केलेले आहेत. पण अनेकांनी अद्याप उमेदवारी अर्ज भरलेले नाहीत. त्या उमेदवारांसाठी पक्ष नेतृत्वाने नवी सूचना काढली आहे. लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांना उमेदवारी अर्ज भरताना सोबत न्या, अशा सूचना पक्ष नेतृत्त्वाकडून देण्यात आलेल्या आहेत.

उमेदवारी अर्ज दाखल करताना 'लाडकी बहीण योजने'च्या लाभार्थ्यांना सोबत न्या. त्यावेळी त्यांना गुलाबी साडी परिधान करण्यास सांगा, अशा सूचना राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेतृत्त्वाकडून सगळ्या उमेदवारांना देण्यात आल्या आहेत. उमेदवारी अर्ज भरताना आपल्या कुटुंबातील सदस्यांना सोबत नेण्याऐवजी लाडकी बहीण योजनेचा लाभ मिळालेल्या महिलांना न्या. गुलाबी साडी नेसलेल्या महिलांच्या उपस्थितीत अर्ज दाखल करा, अशा सूचना राष्ट्रवादीच्या नेतृत्त्वाकडून करण्यात आलेल्या आहेत. तसे पत्रकच पक्षाकडून काढण्यात आले आहे.

**जाहीर नोटीस**

मी बँक ऑफ बडौदा तर्फे सिनीअर मॅनेजर श्री सागर बाळासाहेव सुभेदार या नोटीसीद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, गाव मौजे खातीवली, तालुका शहापुर, जिल्हा ठाणे येथील फ्लॅट नं. 0BA06021, टॉवर नं. ०बी०६, युनिट नं. १, शुभ गृह, दुसरा मजला, वाशिंद, गाव मौजे खातीवली, तालुका : शहापुर, जिल्हा : ठाणे, ज्याचे क्षेत्र ४८९ चौ. फुट (सेलेबल एरीया) म्हणजेच ३६३.४६ चौ. फुट (कारपेट एरीया), गट नं. २७९, २८१, २८४, २८५, २८६, २८७, २८८, २९६, २९८, ३०१, ३०२, ३०३, ३०४, ३०५, ३०८, ३०९, ३११, ३१४, ३१५, ३१७, ३१८, ३२३, असा आहे. अश्या वर्णनाचा फ्लॅट श्री भावेश किशोरचंद्र रूपारेल, ह्यांनी खरेदी केलेला आहे. त्यांचे कर्ज खाते नं.५१६४०६०४१००००३ असा असुन सदरच्या कर्ज खाते सन २०१९ रोजी बंद झालेले आहे. परंतु विजया बैंक ऑफ बडौदा मध्ये सन २०१९ मध्ये विलीनीकरण झाल्यामुळे त्यावेळेस विजया बँकेत असलेली सर्व कर्ज खात्याचे सर्व कागदपत्रे बैंक ऑफ बडोदा विरार पुर्व या शाखेत हस्तांतरण करत असताना विरार पूर्व येथुन गहाळ झालेले आहे, तरी सदर कर्ज खात्याचे सर्व कागदपत्रे व खरेदीखाताची वाटप पत्राची (Allotment Letter) मुळपत हरवल्याबाबत मी विरार पोलिस स्टेशन, येथे दिनांक २२/१०/२०२४ रोजी नोंद केलेली आहे.

तरी सदर मिळकतीवर कोणीही इसमाचा हक्क अधिकार किंवा हितसंबंध असेल तर त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १४ दिवसाच्या आत सर्व पुराव्यानिशी लेखी खालील पत्यावर कळवावे, अन्यथा तसा कोणाचाही कोणताही काहीही हक्क अधिकार किंवा हितसंबंध नाही व असल्यास तो सोडुन दिला जाईल असे समजण्यात येईल.

**श्री. सागर बाळासाहेब सुभेदार,**
**बैंक ऑफ बडौदा, विरार पुर्व शाखेचे सिनीअर मॅनेजर,**
**पत्ता : बैंक ऑफ बडौदा, विद्या सदन,**
**मनवेलपाडा रोड, विरार पुर्व, तालुका: वसई,**
**जिल्हा : पालघर, पिनकोड ४०१३०५**

Printed and Published by **Bhushan B.Mhatre** for Owner **Marik Media And Communication Pvt .Ltd.** at S.R.Publicatiinns ,Mohan Arjun Compound ,Godown No. 8,9 And 10 , Near Ghartan Pada ,Vaishali Nagar ,Last Bus Stop ,Dahisar (E ) ,Mumbai -400068 and Published From Marik Media And Communication Pvt .Ltd.,102, Shyam Sunder Sadan ,Sitaram Jadhav Marg, Lower Parel ,Mumbai 400013. Editor - **Deepak B. Mhatre**, E-mail vruttmanas1@ gmail.com ,telephone 2498546,24985609. Resident Editor - **Sham Deulkar**

**As per PRB Act Editorial Responsibilities On Deepak B. Mhatre Nespaper Related Desputes Lies Under Jurisdiction of Mumbai Courts**

**Year - Twenty Nine**
**Issu - 126**
**R.N.I. Registration No. - 65609/96**

मुद्रक आणि प्रकाशक **भूषण भा. म्हात्रे** यांनी मालक **मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.** साठी, एस. आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडाऊन नं. ८,९ आणि १०, घारटन पाडाजवळ, वैशालीनगर लास्ट बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई - ४०० ०६८ येथे छापून मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि., १०२, श्याम सुंदर सदन, सीताराम जाधव मार्ग, लोअर परळ (पश्चिम), मुंबई - ४०० ०१३ येथून प्रकाशित केले. संपादक - **दीपक भा. म्हात्रे,** E-mail: vrittamanas1@gmail.com दूरध्वनी क्रमांक - २४९८५४६, २४९८५६०९ निवासी संपादक - **शाम देऊलकर**

**पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी दीपक भा. म्हात्रे यांच्यावर राहील. सदर वृत्तपत्रासंबंधीच्या विवादित बाबी मुंबई न्यायालय क्षेत्रात येतील.**

**वर्ष- एकोणतीसावे**
**अंक - १२६**
**आर.एन.आय. रजिस्ट्रेशन क्र.- ६५६०९/९६**


*मुंबई : अंधेरी पश्चिम येथील कामा रोड इंग्लिश स्कूलच्या पालकांसोबत एक यशस्वी SVEEP जनजागृती कार्यक्रम आयोजित केला. पालकांनी उत्तम प्रतिसाद दिला प्रत्येक पालकांना त्यांचे हक्क आणि राष्ट्राप्रती असलेल्या जबाबदाऱ्यांबद्दल प्रोत्साहित केले. त्यानंतर संकल्प पत्र वाचन करून त्यांना शपथ देण्यात आली. त्यांना त्यांचे हक्क आणि भारतीय नागरिकत्वाबद्दलच्या त्यांच्या जबाबदाऱ्यांची जाणीव करून देण्यात आली आणि बदल घडवून आणण्यासाठी 20 नोव्हेंबर 2024 रोजी मतदान करण्याचे आवाहन केले.म्हणून नियुक्ती केल्याबद्दल त्यांचे काल मुंबई पोर्ट ट्रस्ट डॉक अँड जनरल एम्पलॉईज युनियनच्या वतीने ज्येष्ठ कामगार नेते व युनियनचे अध्यक्ष ॲड. एस. के. शेट्येसाहेब यांनी शाल व पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. त्याप्रसंगी सोबत युनियनचे जनरल सेक्रेटरी सुधाकर अपराज , सेक्रेटरी विजय रणदिवे, दत्ता खेसे, मनीष पाटील, संघटक चिटणीस प्रवीण काळे, आप्पा भोसले, संतोष कदम*



# मुंबई महानगराचे आरोग्य सांभाळणाऱ्या स्वच्छता कर्मचाऱ्यांनी वैयक्तिक आरोग्याबरोबरच कुटुंबियांचे देखील आरोग्य जपावे

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

## पालिका आयुक्त भूषण गगराणी यांचे आवाहन



बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सार्वजनिक स्वच्छता उत्तम राखण्याकामी स्वच्छता कामगार- कर्मचाऱ्यांचे अमूल्य योगदान आहे. मुंबई महानगरी स्वच्छ, आरोग्यदायी, पर्यावरणपूरक ठेवण्याचे कर्तव्य स्वच्छता कर्मचारी निष्ठेने, तळमळीने आणि प्रामाणिकपणे बजावत आहेत. महानगराचे आरोग्य सुदृढ ठेवणाऱ्या स्वच्छता कर्मचाऱ्यांनी व्यक्तिगत आरोग्याबरोबरच आपल्या कुटुंबियांचे देखील आरोग्य जपावे. स्वच्छता करताना मुखपट्टी (फेस मास्क), हातमोजे, रिफलेक्टिव्ह जॅकेट, गम बूट आदी सुरक्षा साधनांचा वापर करावा, असे आवाहन बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी यांनी केले. घनकचरा व्यवस्थापन खात्यातील अधिकारी - कर्मचाऱ्यांसाठी दर्जेदार निवासस्थाने बांधण्याचे कामकाज प्रगतिपथावर आहे. स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या विविध अडीअडचणी सोडविण्यासाठी महानगरपालिका प्रशासन कटिबद्ध आहे, असेही गगराणी यांनी नमूद केले.

महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी यांनी घनकचरा व्यवस्थापन खात्यातील कामगार, कर्मचाऱ्यांसमवेत आज (दिनांक २५ ऑक्टोबर २०२४) संवाद साधला. त्यावेळी ते बोलत होते. दादर येथील शिवाजी नाट्य मंदिर येथे झालेल्या या संवाद बैठकीस अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) डॉ. (श्रीमती) अश्विनी जोशी, उप आयुक्त (परिमंडळ २) प्रशांत सपकाळे, उप आयुक्त (घनकचरा व्यवस्थापन) किरण दिघावकर, उप आयुक्त (पर्यावरण) (प्रभारी) प्रशांत तायशेटे आदींसह घनकचरा व्यवस्थापन खात्यातील अधिकारी उपस्थित होते. महानगरपालिका आयुक्त महोदयांनी कामगार, महिला कामगार, मुकादम, मोटर लोडर, पर्यवेक्षक, प्रशासकीय अधिकारी यांच्याशी संवाद साधत त्यांच्या अडीअडचणी जाणून घेतल्या. तसेच, त्यांचे निराकरण करण्याचे निर्देश सर्व संबंधितांना दिले.

महानगरपालिका आयुक्त गगराणी संवाद साधताना म्हणाले की, मुंबईकरांच्या आरोग्याची, पर्यारणाची दैनंदिन काळजी घेणारे स्वच्छता कर्मचारी दुर्लक्षित, उपेक्षित राहता कामा नये अशी प्रशासनाची भूमिका आहे. महानगरीच्या वाढत्या विस्तार-व्यापामुळे कामाचा ताण वाढत आहे. सार्वजनिक स्वच्छतेविषयक आव्हानांमध्ये वाढ होत आहे. या परिस्थितीत देखील स्वच्छता कर्मचारी न थकता, अविरतपणे स्वच्छतेची कार्यवाही चोखपणे बजावित आहेत. ही अभिमानाची बाब असली तरी स्वच्छता कामांत सुधारणांना संधी आहे. स्वच्छतेची दैनंदिन कार्यवाही दृश्यमान असल्याने मुंबईकर नागरिकांचा दररोज अनुकूल प्रतिसाद मिळतो.

स्वच्छता कर्मचाऱ्यांना महानगरपालिकेमार्फत गणवेश, मुखपट्टी (फेस मास्क) , हातमोजे, रिफलेक्टिव्ह जॅकेट, गम बूट, रेनकोट आदी सुरक्षा साधने पुरविली जातात. मात्र, या सुरक्षा साधनांचा वापर केला जात नाही, अशी खंत व्यक्त करत सुरक्षा साधनांमुळे आरोग्य सुधारते, कार्यक्षमता वाढते त्यामुळे सूच्छता कर्मचाऱ्यांनी सुरक्षा साधनांचा अधिकाधिक वापर करावा. मुकादम, पर्यवेक्षकांनी यासाठी कामगार - कर्मचाऱ्यांचे प्रबोधन करावे, असे आवाहन महानगरपालिका आयुक्त गगराणी यांनी केले. रस्ते, सार्वजनिक जागांवरील बेवारस वाहने, पदपथांवर पादचाऱ्यांना अडथळा ठरणारे साहित्य - सामुग्रीची विल्हेवाट लावण्याकामी महानगरपालिकेने पुढाकार घेतला आहे. त्यासाठी नवीन यंत्रणा कार्यान्वित करण्यात येत आहे. या कार्यवाहीस स्वछता कर्मचाऱ्यांनी सहकार्य करावे, असेदेखील गगराणी यांनी नमूद केले.

उप आयुक्त (घनकचरा व्यवस्थापन) किरण दिघावकर यांनी संगणकीय सादरीकरणाद्वारे घनकचरा व्यवस्थापन खात्याची माहिती, स्वच्छता कर्मचारी - कामगार यांच्यासाठी राबविण्यात येणारे विविध कल्याणकारी उपक्रम याबाबत माहिती दिली.

# वरळीतून मिलिंद देवरा शिंदे गटाचे उमेदवार; आदित्य ठाकरे यांच्यापुढे तगडे आव्हान

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

## देवरा यांनी स्वतः X वर पोस्ट टाकत दिली माहिती



वरळी विधानसभेत शिवसेना शिंदे गटाकडून उमेदवारी जाहीर करण्यात आली असून या मतदारसंघात तिरंगी लढत होणार आहे. शिंदे गटाने राज्यसभा सदस्य मिलिंद देवरा यांना उमेदवारी जाहीर केली आहे. ज्यामुळे या मतदारसंघात आता दोन्ही शिवसेना गट एकमेकांच्या विरोधात लढणार आहेत.

मुंबई : वरळी विधानसभेतून शिवसेना ठाकरे गटाकडून विद्यमान आमदार आदित्य ठाकरे यांना पुन्हा एकदा निवडणुकीच्या रिंगणात उतरविण्यात आले आहे. त्यामुळे आदित्य हे महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार आहेत. मनसेनेही या मतदारसंघातून संदीप देशपांडे यांना उमेदवारी देऊ केली आहे.

महायुतीने आपला उमेदवार जाहीर केला नव्हता. पण ही जागा शिवसेना शिंदे गटाला सुटल्यानंतर या मतदारसंघातून पक्षाकडून कोणाला उमेदवारी देण्यात येते याकडे सर्वांचे लक्ष होते. आता अखेरीस हा तिढा देखील सुटला असून शिंदे गटाने या मतदारसंघात आपला उमेदवार जाहीर केला आहे. मुळात उमेदवाराने आपल्याला पक्षाने उमेदवारी जाहीर केल्याची पोस्ट केली आहे. शिवसेना शिंदे गटाकडून राज्यसभा सदस्य मिलिंद देवरा यांना उमेदवारी देऊ केली आहे. ज्यामुळे वरळी विधानसभेत तिरंगी लढत पाहायला मिळणार आहे.

महायुतीमध्ये वरळी विधानसभेची जागा शिवसेना शिंदे गटाला सुटल्याने या मतदारसंघातून कोणाला उमेदवारी देण्यात येते? याकडे सर्वांचे लक्ष लागलेले होते. त्यानंतर आता स्वतः उमदेवारी जाहीर झालेल्या मिलिंद देवरा यांनी X या सोशल मीडिया साइटवर याबाबतची पोस्ट केली आहे. त्यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले आहे की, "वरळीकरांना न्याय देण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मला निवडणुकीला उभे राहण्याची सूचना दिली आहे. आम्ही एकत्रपणे वरळी आणि वरळीकरांना न्याय देऊ. वरळीच्या विकासाचे उद्दिष्ट काही वेळातच जाहीर करू. आता वरळीची वेळ आहे," असे लिहित देवरा यांनी स्वतःच्या उमेदवारीची घोषणा केली आहे.

# उमेदवार व राजकीय पक्षांच्या आर्थिक बाबी आणि खर्चावर असणार करडी नजर

■ **मुंबई**

विधानसभा निवडणुकीत संबंधित उमेदवार अथवा राजकीय पक्ष करीत असलेल्या खर्चावर जिल्हास्तरीय खर्च संनियंत्रण कक्षामार्फत करडी नजर ठेवण्याचे निर्देश केंद्रीय निवडणूक खर्च निरीक्षकांनी दिले आहेत.मुंबई उपनगर जिल्ह्यातील विधानसभा मतदारसंघासाठी सौरभकुमार शर्मा, नागेंद्र यादव, मीतू अग्रवाल, विनोद कुमार, राजेशकुमार मीना व चंचल मीना हे केंद्रीय निवडणूक खर्च निरीक्षक दाखल झाले असून ते मतदारसंघनिहाय आर्थिक बाबी आणि खर्चविषयक कामकाजाचा आढावा घेत आहेत. जिल्हाधिकारी कार्यालयात नोडल अधिका-यांची खर्च संनियंत्रण विषयक बैठक झाली.

यावेळी अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी तथा अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पश्चिम उपनगरे) डॉ. विपिन शर्मा, अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी तथा अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पूर्व उपनगरे) डॉ. अमित सैनी, अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी तथा अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (प्रकल्प) अभिजित बांगर, जिल्हाधिकारी तथा अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी राजेंद्र क्षीरसागर,अपर जिल्हाधिकारी मनोज गोहाड, उपजिल्हाधिकारी (निवडणूक) तेजस समेळ पोलिस विभागाचे वरिष्ठ अधिकारी व सर्व नोडल अधिकारी उपस्थित होते.

# भ्रष्टाचार रोखण्यासाठी 28 ऑक्टोबर ते 3 नोव्हेंबर दरम्यान 'दक्षता जनजागृती सप्ताह'

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

भ्रष्टाचारामुळे समाजाचे होणारे नुकसान टाळण्यासाठी दक्षता जनजागृती उपक्रम राबविले जातात. भ्रष्टाचारमुक्त समाजनिर्मितीसाठी नागरिकांचा सक्रीय सहभाग असणे गरजेचे आहे. केंद्रीय दक्षता आयोगाने जाहीर केल्यानुसार 28 ऑक्टोंबर ते 3 नोव्हेंबर 2024 या कालावधीत 'दक्षता जनजागृती सप्ताह' साजरा करण्यात येणार आहे. या सप्ताहाकरीता यावर्षी सत्यनिष्ठेच्या संस्कृतीच्या माध्यमातून राष्ट्र समृद्धी ही संकल्पना निश्चित करण्यात आली आहे. सप्ताहाचा प्रारंभ येत्या 28 ऑक्टोंबर रोजी सकाळी 11 वाजता भ्रष्टाचार निर्मुलनाच्या प्रतिज्ञेने होणार आहे.

कुणीही राज्य सरकारी अधिकारी किंवा कर्मचारी भ्रष्टाचार करताना, भ्रष्टाचारात गुंतलेला आढळल्यास त्वरित लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग, 91, सर पोचखानवाला मार्ग, वरळी मुंबई येथे संपर्क करावा. तसेच टोल फ्री क्रमांक 1064, दूरध्वनी क्रमांक 022-24921212, अथवा संकेतस्थळ https://acbmaharashtra.gov.in/, ईमेल acbwebmail@mahapolice.gov.in, addlcpacbmumbai@mahapolice.in, फेसबुक www.facebook.com-maharashtra-ACB, मोबाईल ॲप acbmaharashtra.net, ट्विटर – @ACB_Maharashtra आणि 9930997700 या व्हॉट्सॲप क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन संदीप दिवाण, अपर पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई यांनी केले आहे.

# हुंड्यासाठी पत्नीची गळा दाबून हत्या, पती अटकेत

**मुंबई:** हुंड्यावरून होणाऱ्या वादातून २६ वर्षांच्या महिलेची गळा दाबून हत्या केल्याप्रकरणी पतीला कफ परेड पोलिसांनी अटक केली. याप्रकरणी हत्येचा गुन्हा दाखल होताच पळून गेलेल्या आरोपी पतीला काही तासांत कफ परेड पोलिसांनी अटक केली. आरोपी सध्या पोलीस कोठडीत असल्याची माहिती पोलिसांनी दिली. अंशुकुमारी अरुणकुमार शर्मा (२६) असे मृत महिलेचे नाव असून कफ परेड येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर, शंकर भगवान मंदिराजवळील विठ्ठलवाडीतील दुसऱ्या मजल्यावरील सदनिकेत ती राहत होती.

# निवडणूक कालावधीत ओपिनियन, एक्झिट पोलला प्रतिबंध

**मुंबई:** भारत निवडणूक आयोगामार्फत महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ साठीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर आयोगाने निवडणूक कालावधीत निवडणूक निकालांचे अंदाज (ओपिनियन पोल तसेच एक्झिट पोल) दर्शविण्यावर प्रतिबंध केला आहे.भारत निवडणूक आयोगाने विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने १५ ऑक्टोबर २०२४ पासून आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. मुंबई शहर जिल्ह्यातील दहा विधानसभा मतदारसंघात दि. २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान होणार आहे. या अनुषं गाने निवडणूक निकालांचे अंदाज १३ नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी सात वाजेपासून ते २० नोव्हेंबर २०२४ रोजी सायंकाळी ६.३० वाजेपर्यंतच्या कालावधीत कोणत्याही प्रकारच्या एक्झिट पोलचे आयोजन करणे, कोणत्याही माध्यमांद्वारे प्रकाशन अथवा प्रसारण करण्यास प्रतिबंध लागू राहणार आहे.

# बेस्ट कर्मचाऱ्यांची दिवाळी आचारसंहिता समाप्तीनंतरच

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

मुंबई महानगरपालिकेचे एक अंग असलेला बेस्ट उपक्रम अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत आपली वाटचाल करीत आहे. कर्मचाऱ्यांची तसेच स्वमालकीच्या बसगड्याचीही संख्या कमी कमी होत आहे. भाडेतत्वावरील बसगाड्यांचे ठेकेदारही आपल्या बसेस बंद करीत आहेत. त्यामुळे प्रवाशांचेही हाल होत असताना दुष्काळात तेरावा महिना म्हणतात तसे बेस्ट कामगारांना यंदा सानुग्रह अनुदानही मिळणार नसल्याने त्याची दिवाळीही अंधारात जाणार आहे. मात्र विधानसभा निवडणूकीची आचारसंहिता संपल्यानंतर म्हणजे २५ नोव्हेंबर नंतर या कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान मिळणार असल्यामुळे त्यांची दिवाळी २५ नोव्हेबर नंतरच साजरी होणार आहे.

मुंबई महानगरपालिका व बेस्ट कर्मचाऱ्यांना गेल्या दोन वर्षापासून एकाच वेळी सानुग्रह अनुदान देण्याची घोषणा होत होती. विशेष म्हणजे पालिका कर्मचाऱ्यांना जेव्हढे सानुग्रह अनुदान देण्याचे जाहीर झाले. तेव्हढीच रक्कम बेस्ट कर्मचाऱ्यांनाही देण्यात आली होती. पण यावेळी १५ ऑक्टोंबर रोजी पालिका कर्मचाऱ्यांना पालिका मुख्यालयात प्रशासन व कामगार नेत्यांच्या समन्वय समितीच्या झालेल्या संयुक्त बैठकीत सानुग्रह अनुदान जाहीर झाले तेव्हा बेस्ट कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान देण्याचा विषयच निघाला नाही. आणि बेस्ट महाव्यवस्थापकांनीही बेस्ट कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान देण्याबाबत पालिका आयुक्तांकडे प्रस्ताव दिला नव्हता त्यामुळे बेस्ट कर्मचाऱ्यांना पालिका कर्मचाऱ्यांसोबत समुग्रह अनुदान जाहीर झाले नाही.

पालिका आयुक्तांनी बेस्ट कमचाऱ्यांच्या सानुग्रह अनुदानासाठी ७० कोटीची तरतूद करून ठेवली आहे. सध्या विधानसभा निवडणूकीची आचारसंहिता असल्यामुळे बेस्ट कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान जाहीर करण्यास अडचण निर्माण झाली आहे. त्यामुळे बेस्ट कर्मचाऱ्यांना आचारसंहिता समाप्तीनंतरच संग्रह अनुदानाची रक्कम मिळेल. हे स्पष्ट झाले आहे.

# राऊतांची अटक टळली; अब्रूनुकसानी खटल्यात जामीन मंजूर, कोठडीची शिक्षाही स्थगित

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

भाजप नेते किरीट सोमय्या यांच्या पत्नी मेधा सोमय्या यांनी दाखल केलेल्या मानहानीच्या खटल्यात ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांना १५ दिवसांची कोठडी आणि २५ हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली होती. संजय राऊत यांनी या शिक्षेविरोधात दाखल केलेल्या अपिलावर आज सुनावणी झाली. यानंतर माझगाव सत्र न्यायालयाने



संजय राऊत यांना ५० हजार रुपयांच्या जातमुचल्यावर जामीन मंजूर केला. तसेच १५ दिवसांच्या कोठडीची शिक्षाही न्यायालयाने स्थगित केली आहे.

भाजप नेते किरीट सोमय्या यांच्या पत्नी मेधा सोमय्या यांनी खासदार संजय राऊत यांच्याविरोधात अब्रूनुकसानीचा खटला दाखल केला होता. या प्रकरणी दंडाधिकारी न्यायालयाने संजय राऊतांना दोषी ठरवले होते. त्यांना १५ दिवसांची शिक्षा आणि २५ हजार रुपयांचा दंड देखील ठोठावण्यात आला होता.

या शिक्षेविरोधात अपील करण्यासाठी दंडाधिकारी कोर्टाने दिलेली ३० दिवसांची मुद्दत संपणार होती. त्यामुळे संजय राऊत यांनी दाखल केलेल्या अपीलावर अतिरिक्त सत्र न्यायाधीश एस.पी. पिंगळे यांच्या कोर्टात सुनावणी पार पडली. याप्रकरणी काल सुनावणी होणार होती. पण ती आज झाली. विशेष म्हणजे या सुनावणीला संजय राऊत स्वत: हजर होते. या सुनावणीत संजय राऊत यांना जामीन मंजूर झाला असून १५ दिवसांची कोठडी देखील स्थगित करण्यात आली आहे.


**मध्य रेल्वे**
**मुंबई विभाग**
**विविध स्थानकांच्या ठिकाणी सिग्नलिंग कार्य**
**खुली निविदा सूचना**
विभागिय रेल्वे व्यवस्थापक (एस आणि टी), १ ला मजला, पार्सल कार्यालय इमारत, पी.एफ.क्र. १४ आणि १५ वर, मध्य रेल्वे, मुंबई सीएसटी ४०० ००१ भारताच्या राष्ट्रपतींसाठी आणि त्यांच्या वतीने नामांकित कंत्राटदारांकडून खुली निविदा मागवित आहेत. निविदेच्या सादरीकरणाचा दिनांक आणि वेळ २१/११/२०२४ रोजी सायं. १५.०० वा. पर्यंत आणि त्याच दिवशी १५.१५ वा. उघडण्यात येतील. कामाचे नाव: मुंबई विभागामधील विविध स्थानकांच्या ठिकाणी इंजिनियरिंग डिपॉझिट कामांसंदर्भात संकेत काम. निविदा सूचना क्र. सीआर/बीबी/एस आणि टी/साउथ/२०२४/५८. अंदाजे मूल्य: रु. १.०७ कोटी. उघडण्याचा दिनांक : २१/११/२०२४, इरठे: रु. २०३७००/- वैधता: ६० दिवस. पूर्तता कालावधी: १२ महिने. सदर निविदा सार्वजनिक प्रापण धोरण (मेक इन इंडिया) आदेश २०१७ दिनांकित १५/०६/२०१७ अंतर्गत मान्यताप्राप्त आहे. निविदेचा पूर्ण तपशिल मध्य रेल्वे अधिकृत संकेतस्थळ www.ireps.gov.in वर उपलब्ध आहे. पूर्ण निविदा कागदपत्रे संकेतस्थळावरून डाऊनलोड करता येतील. निविदेचा पूर्ण तपशिल विभागिय रेल्वे व्यवस्थापक (एस आणि टी) ह्यांचे कार्यालय मुंबई सीएसटी ह्यांचे सूचना फलकावर देखील उपलब्ध आहेत.
SUN 499 डीआरएम (एस आणि टी) सीएसटीएम
टिकट के लिए UTS APP डाउनलोड करें



AXIS FINANCE
**ॲक्सिस फायनांस लिमिटेड**
(सीआयएन यू६५९२१एमएच१९९५पीएलसी२१२६७५)
ॲक्सिस हाऊस, सी-२, वाडिया इंटरनॅशनल सेंटर, पांडुरंग बुधकर मार्ग, वरळी, मुंबई – ४०००२५

**स्पीड पोस्ट/ ई-मेल/ आरपीएडी**
**सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) नियमावली, २००२ च्या नियम ८ (६) अंतर्गत सूचना**

दिनांक: २३/१०/२०२४

१. संतोष यादव पाटील (कर्जदार/ गहाणदार)
इमारत क्र. ७, सदनिका क्र. ११०९, हायलँड पार्क सीएचएसएल, कोलशेत रोड, हायलँड हॉस्पिटल स्मार्ट, ढोकाळी, ठाणे ४००६०७
आणि येथे देखील:
कार्यालय पत्ता:
युनायटेड बिझनेस पार्क, २०३, २ रा मजला, रोड क्र. ११, वागळे इस्टेट, ठाणे – ४०० ६०४.
ई-मेल: santkrupaenterprises@gmail.com
२. ज्योती पाटील (सह-कर्जदार – II)
३.इमारत क्र. ७, सदनिका क्र. ११०९, हायलँड पार्क सीएचएसएल, कोलशेत रोड, हायलँड हॉस्पिटल स्मार्ट, ढोकाळी, ठाणे ४००६०७
ई-मेल: santkrupaenterprises@gmail.com
संदर्भ: कर्ज खाते क्र. ०४५६एएचए००००२६४८
विषय: स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) नियमावली, २००२ च्या नियम ८ (६) च्या अनुषंगाने ३० दिवसांची सूचना
ठाणे नोंदणीकरण जिल्हा आणि उप जिल्हा, ठाणे ४००६०२ मधील वंदना टॉकीज जवळ, एल.बी.एस. मार्ग, गाव पाचपाखाडी, तालुका आणि जिल्हा ठाणे (प) येथे असेलल्या आणि वसलेल्या साधारणपणे १६५६.८३ चौ. मी. मोजमाप असलेल्या जमिनीचा धारण केलेला सीटीएस क्र. १०८/२ ए आणि २ बी टिक्का क्र. १२, सुसंगत जुना सर्वे क्र. ३६१ ए, हिस्सा क्र. १, २ आणि ३ (पार्ट) च्या सर्व खंड आणि भूखंडावरील "मोहन महल – कॉ-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड" ह्या इमारतीमधील एक स्टिल्ट कार पार्किंगसह ९ व्या मजल्यावरील ८५० चौ. फू. (चटईक्षेत्र) जे ७८.९७ चौ. मी. चटईक्षेत्र असलेल्या धारण केलेला सदनिका क्र. ९०४ चा सर्व खंड आणि भूखंड.
आणि
ठाणे नोंदणीकरण जिल्हा आणि उप जिल्हा, ठाणे ४००६०२ मधील वंदना टॉकीज जवळ, एल.बी.एस. मार्ग, गाव पाचपाखाडी, तालुका आणि जिल्हा ठाणे (प) येथे असेलल्या आणि वसलेल्या साधारणपणे १६५६.८३ चौ. मी. मोजमाप असलेल्या जमिनीचा धारण केलेला सीटीएस क्र. १०८/२ ए आणि २ बी टिक्का क्र. १२, सुसंगत जुना सर्वे क्र. ३६१ ए, हिस्सा क्र. १, २ आणि ३ (पार्ट) च्या सर्व खंड आणि भूखंडावरील "मोहन महल – कॉ-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड" ह्या इमारतीमधील एक स्टिल्ट कार पार्किंगसह ९ व्या मजल्यावरील ७४० चौ. फू. (चटईक्षेत्र) जे ६८.७५ चौ. मी. चटईक्षेत्र असलेल्या धारण केलेला सदनिका क्र. ९०५ चा सर्व खंड आणि भूखंड.
महोदय,
१. ही सूचना तुम्हाला क्रमांक १ ते २ (यापुढे एकत्रितपणे "तुम्ही" म्हणून संबोधले जाईल), सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) नियमावली, २००२ च्या नियम ८ (६) आणि सिक्युरिटायझेशन अँड रिकंस्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शियल ॲसेटस अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ च्या कलम १३(८) अंतर्गत जारी करण्यात आली आहे.
२. ॲक्सिस फायनांस लिमिटेड (एएफएल /सुरक्षित धनको) कडून उपरोक्त कर्जाचा लाभ घेतल्यानंतर, तुम्ही कर्जाच्या रकमेची परतफेड करण्यात चूक केली होती आणि संबंधित लागू मार्गदर्शक तत्त्वे/परिपत्रकांनुसार निर्धारित केलेल्या कालावधीपेक्षा जास्त कालावधीचे सतत डिफॉल्ट लक्षात घेता. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (आरबीआय) द्वारे जारी केलेल्या मालमत्ता वर्गीकरणासाठी, ०३.०८.२०२३ रोजी रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (आरबीआय) ने जारी केलेल्या संबंधित मार्गदर्शक तत्त्वांनुसार कर्जदाराचे वरील संदर्भित कर्ज खाते नॉन-परफॉर्मिंग ॲसेट (एनपीए) म्हणून वर्गीकृत केले गेले. .
३. त्यानंतर,०७ सप्टेंबर २०२३ ची डिमांड नोटीस फायनान्शियल ॲसेट्स ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (सरफेसी कायदा) च्या १३(२) अन्वये तुम्हाला रीतसर बजावण्यात आली होती परंतु तुम्ही ती करण्यात अयशस्वी झाला. मागणी केलेल्या रकमेचा भरणा म्हणजे रु. २,६०,५८,९६४/- (रु. दोन कोटी साठ लाख पन्नास हजार नऊशे चौसष्ट फक्त) थकबाकीदार मुद्दल, थकबाकी (अर्जित विलंब शुल्कासह) आणि 7 सप्टेंबर 2023 पर्यंत व्याज या नोटीसच्या ६० दिवसांच्या आत आणि अशा सुरक्षित कर्जदाराने ७ मे २०२४ रोजी सरफेसी कायदा, २००२ आणि त्याअंतर्गत तयार केलेल्या नियमांचे पालन करून सुरक्षित मालमत्तेचा प्रतिकात्मक ताबा घेतला आहे
४. ३० दिवसांची ही नोटीस, विक्रीपूर्व टप्प्यावर, तुम्हाला सुरक्षा हित (अंमलबजावणी) नियम, २००२ च्या नियम ८(५) चे पालन करण्यासाठी संबोधित केले जात आहे.
५. आणि तुम्हाला याद्वारे सूचित केले जाते आणि सूचित केले जाते की उपरोक्त सुरक्षित वृत्तपत्रात सार्वजनिक सूचना प्रकाशित झाल्यापासून ३० स्पष्ट दिवसांनंतर, "जसे आहे तसे", "जसे आहे तसे" आणि "जे काही आहे" यावर ई-लिलाव मोडद्वारे सार्वजनिक लिलाव करून मालमत्ता विक्रीसाठी ठेवली जाईल. .
६. सुरक्षित मालमत्तेची पूर्तता करण्यासाठी उपलब्ध वेळेनुसार,सरफेसी कायदा २००२ च्या कलम १३ च्या पोत्क्लाम (८) अनुअर (०१.०९..२०१६ पासून सुधारित) तरतुदींकडे वरील नावाच्या संबोधितांना आपले लक्ष वेधण्यात आले आहे. जर तुम्ही सरफेसी कायदा, २००२ च्या कलम १३ (८) अंतर्गत तुमच्या अधिकारांचा वापर करू इच्छित असाल, तर तुम्हाला याद्वारे रु. २,९२,५९,८४१/- (रुपये दोन कोटी ब्याणव लक्ष नव्याणव हजार एकशे एकचाळीस फक्त) आणि ५ ऑक्टोबर २०२४ पर्यंत सर्व खर्च, शुल्क आणि खर्चासह व्याज अधिनियमांतर्गत विचार केल्याप्रमाणे कोणत्याही एका पद्धतीद्वारे सुरक्षित मालमत्तेचे हस्तांतरण. तुम्ही लक्षात घ्या की सार्वजनिक सूचना प्रकाशित करण्याची तारीख 30 दिवसांची असेल ज्यानंतर या नियमांच्या नियम 9(1) अंतर्गत विक्री नोटीस प्रकाशित झाल्यावर तुमचा सुरक्षित मालमत्तेच्या पूर्ततेचा अधिकार ताबडतोब संपुष्टात येईल.

**ॲक्सिस फायनांस लिमिटेड,**
**करीता प्राधिकृत अधिकारी**



NEXT MEDIAWORKS LIMITED
नोंदणीकृत कार्यालय : युनिट ७०१ए, ७वा मजला, टॉवर-२, इंडियाबुल्स फायनान्स सेंटर, सेनापती बापट मार्ग, एलफिन्स्टन रोड, मुंबई - ४०००१३,
ई-मेल: investor.communication@radioone.in संकेतस्थळ : www.nextmediawoks.com दूरध्वनी: +९१-२२-४४१० ४१०४

**सप्टेंबर ३०, २०२४ रोजी संपलेल्या त्रैमासिक आणि अर्धवर्षासाठी लेखापरीक्षित एकत्रिकृत वित्तीय निष्कर्षांचा अहवाल**

प्रती सम भाग माहिती वगळता आयएनआर लाखांमध्ये)

| तपशिल | संपलेले त्रैमासिक | | | संपलेले सहा महिने | | संपलेले वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| | सप्टेंबर ३०, २०२४ | जून ३०, २०२४ | सप्टेंबर ३०, २०२३ | सप्टेंबर ३०, २०२४ | सप्टेंबर ३०, २०२३ | मार्च ३१, २०२४ |
| | (अलेखापरीक्षित) | (अलेखापरीक्षित) | (अलेखापरीक्षित) | (अलेखापरीक्षित) | (अलेखापरीक्षित) | (लेखापरीक्षित) |
| कार्यामधून महसूल | ८४५ | ९३३ | ८०९ | १,१७८ | १,७०६ | ३,८३७ |
| अपवादात्मक बाबी आणि कर पूर्व तोटा | (७६६) | (७४५) | (७२०) | (१,५११) | (१,४००) | (२,६९५) |
| अपवादात्मक बाबी कर पूर्व तोटा | (७६६) | (७४५) | (१,१५६) | (१,५११) | (१,८३६) | (३,८७२) |
| कालावधीसाठी अनियंत्रित व्याजापश्चात तोटा (अपवादात्मक बाबीनंतर) | (४५७) | (४४७) | (६४७) | (९०४) | (१,०५०) | (२,२१८) |
| भरणा केलेले समभाग भांडवल (दर्शनी मूल्य – आयएनआर १०/- प्रती समभाग) | ६,६८९ | ६,६८९ | ६,६८९ | ६,६८९ | ६,६८९ | ६,६८९ |
| लेखा परीक्षित ताळेबंदानुसार राखीव महसूल वळगता अन्य भाग धारणा | | | | | | (१५,४७७) |
| प्रती समभाग तोटा (आयएनआर १०/- प्रत्येकीचे) | वार्षिकीकरण केलेले नाही | वार्षिकीकरण केलेले नाही | वार्षिकीकरण केलेले नाही | वार्षिकीकरण केलेले नाही | वार्षिकीकरण केलेले नाही | |
| मूळ आणि सौम्यीकृत | (०.६८) | (०.६७) | (०.९७) | (१.३५) | (१.५७) | (३.३२) |

**टिप:** सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिसक्लोझर रिक्वायरमेंटस) नियमावली, २०१५ ("सेबी एलओडीआर") च्या नियम ३३ अंतर्गत स्टॉक एक्सचेंजमध्ये सादर करण्याचा उपरोक्त हा त्रैमासिक वित्तिय निष्कर्षाचा तपशिलवार आराखडा आहे.
● www.nseindia.com ● www.bseindia.com ● www.nextmediaworks.com

**टिपा:**
१. सप्टेंबर ३०, २०२४ रोजी संपलेल्या त्रैमासिक आणि अर्ध वर्षासाठीच्या उपरोक्त एकत्रिकृत वित्तिय निष्कर्षाचे समीक्षण करण्यात आले आहे आणि लेखा परीक्षण समितीद्वारे शिफारस करण्यात आली आहे आणि संचालक मंडळाच्या त्यांच्या संबधित सप्टेंबर २५, २०२४ रोजी झालेल्या सभेमध्ये नोंदपटावर घेण्यात आले. संवैधानिक लेखापरीक्षक समुहाने उपरोक्त निष्कर्षाचे सेबी एलओडीआर च्या नियमावली ३३ अनुषंगाने परीक्षण करण्यात आले आणि कोणताही बदल नसलेला अहवाल जारी केला.
२. कंपनी (भारतीय लेखा मानांकन) नियमावली सह वाचल्या जाणाऱ्या कंपनी कायदा २०१३ च्या कलम १३३ अंतर्गत विहित करण्यात आलेल्या भारतीय लेखां मानांकनाच्या अनुषंगाने एकत्रिकृत वित्तिय निष्कर्ष तयार करण्यात आले आहेत.
**३. एकमेव वित्तिय निष्कर्षावरील अतिरिक्त माहिती:**


(प्रती सम भाग माहिती वगळता आयएनआर लाखांमध्ये)

| तपशिल | संपलेले त्रैमासिक | | | संपलेले सहा महिने | | संपलेले वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| | सप्टेंबर ३०, २०२४ | जून ३०, २०२४ | सप्टेंबर ३०, २०२३ | सप्टेंबर ३०, २०२४ | सप्टेंबर ३०, २०२३ | मार्च ३१, २०२४ |
| | (अलेखापरीक्षित) | (अलेखापरीक्षित) | (अलेखापरीक्षित) | (अलेखापरीक्षित) | (अलेखापरीक्षित) | (लेखापरीक्षित) |
| कार्यामधून महसूल | - | - | - | - | - | - |
| कर पूर्व तोटा | (१३१) | (१३१) | (८८५) | | (९९६) | (१,२४५) |
| कर पश्चात तोटा | (१३१) | (१३१) | (८८५) | | (१३३) | (१,२४५) |
| एकूण व्यापक तोटा | (१३१) | (१३१) | (८८५) | | (१३३) | (१,२४५) |

**संचालक मंडळाच्या करिता आणि वतीने**
**प्रवीण सोमेश्वर**
**अध्यक्ष,**
**डीआयएन: ०१८०२६५६**

**ठिकाण: गुरगाव**
**दिनांक: ऑक्टोबर २५, २०२४**

नेतृत्व म्हणजे जबाबदारी घेणे, बहाणे नाही.



- रतन टाटा
प्रसिध्द उद्योगपती

वृत्तमानस
मुंबई, शनिवार, २६ ऑक्टोबर २०२४

# प्रदुषण घेऊन येतोय हिवाळा

अजूनही वेळी-अवेळी पावसाची हजेरी लागत असली तरी मान्सूनचा कालावधी हा अधिकृतपणे संपला असे सांगण्यात येते. सध्या ठाणेसह राज्यातील अनेक शहरांत सकाळच्या वेळेस धूरमिश्रित धुके किंवा धुरके यांचे साम्राज्य पाहावयास मिळत आहे. ही थंडीची चाहूल मानले गेले असले तरी यात वायू प्रदूषणाचा धोका अधोरेखित होत असतो, हे विसरून चालणार नाही. मुळातच थंडी मध्ये वायू प्रदूषण वाढते असे कायम सांगितले जात असले तरी त्यावर कोणत्याही उपाययोजना होत नाहीत हे वास्तव आहे. पावसाळा संपला की धूळ, मग धूर, हिवाळ्यात धूरमिश्रित धुके किंवा धुरके यांचे साम्राज्य पसरू लागते आणि मग हवा प्रदूषणाबद्दल पुन्हा चर्चा सुरू होते. ती केवळ चर्चेपुरतीच सीमित राहते. प्रदूषण केवळ हिवाळ्यातच का वाढते याचा शास्त्रीय अभ्याससुद्धा तपासणे गरजेचे आहे. साधारणपणे हिवाळ्यात अथवा त्याच्या सुरुवातीला हवेच्या तापमानामध्ये जे बदल होतात, त्यांच्या परिणामी गरम हवेचा एक थर थंड हवेच्या थरावर तयार होतो, जो एखाद्या आवरणासारखा काम करून हवेमधील प्रदूषित घटकांना पृष्ठभागावरच दाबून ठेवतो. असा गरम हवेचा थर का तयार होतो याचे पहिले कारण म्हणजे हिवाळ्यातल्या रात्री तापमान खूप खाली उतरते. त्यामुळे पृथ्वीच्या पृष्ठभागाचे तापमानसुद्धा घटते. पृष्ठभागाच्या निकट असलेली हवा अधिक थंड होते. या थंड हवेच्या थरांमध्येच गरम हवेचा थर जमतो किंवा अडकतो. दुसरं महत्त्वाचं कारण म्हणजे थंड हवा ही मुळातच तुलनेने अधिक घन आणि साहजिकच अधिक जड असते. या हवेचा मोठा असलेला आकार आपल्या वजनामुळे खाली घसरतो आणि पृथ्वीच्या थंड पृष्ठभागाजवळ गेल्यावर अधिकच थंड होतो. त्या थंड हवेच्या थरांमध्ये गरम हवेचा थर अडकतो. विशेषतः डोंगरांच्या मध्ये वसलेल्या शहर- गावांमध्ये असे होते. हवेचा मोठा आकार डोंगरावरून चक्क खाली घरंगळतो आणि डोंगरांच्या मध्ये अडकून पृष्ठभागावर जाऊन विसावतो. सर्वात महत्त्वाचे म्हणजे एकमेकांच्या निकट असलेले शीत व उष्ण प्रदेश हेसुद्धा कारणीभूत ठरतात, असे सिद्ध झाले आहे. अशा ठिकाणी थंड व गरम हवा परस्पर संपर्कात आल्यावर घन व जड असलेली थंड हवा हलक्या असलेल्या गरम हवेला वर ढकलते आणि पुढील प्रक्रिया घडते. यामध्ये गरम हवेचा थर खालच्या थंड हवेला बाहेर निसटू देत नाही आणि त्या पृष्ठभागाजवळील थंड हवेमध्ये तिथे जमलेली वाहने, कारखाने, घरगुती उपकरणे वगैरेंमधून होणाऱ्या घातक वायू उत्सर्जनामधील विविध विषारी घटक तसेच दबून राहतात. एखाद्या मोठ्या आकाराच्या अदृश्य तंबूमध्ये हवा अडकली तर त्यामधील विषारी घटक तिथेच जमून राहतील तसेच इथेसुद्धा होते आणि हवा अधिक प्रदूषित होते. अर्थातच हे अधिक लोकसंख्येच्या, अधिक वाहने असलेल्या शहरांमध्ये अधिक अनुभवास येते. अशा शहरांमधील लोकांनी हिवाळ्यात पहाटे पहाटे फिरायला जाणे आरोग्यास उपकारक तर होणार नाहीच, उलट बाधक होऊ शकेल. वायू प्रदूषणाने मृत्यू होण्याचे प्रमाणसुद्धा वाढीस लागत असून, ही चिंतेची बाब मानावी लागेल. मोठ्या शहरांतील सुमारे सात टक्के मृत्यू हे हवा प्रदूषणामुळे होतात, हे खरे आहे काय? असल्यास हे अपमृत्यू रोखण्यासाठी सरकार कोणते उपाय योजणार आहे, अशा आशयाचा प्रश्न एकदा संसदेत विचारला गेला होता. त्यावर दिलेले उत्तर आणि उपाययोजना करण्याचे आश्वासन अजूनही कागदावरच राहिलेले आहे. वायू प्रदूषणाचा मुद्दा केवळ अधिक लोकसंख्येच्या शहरांनाच लागू होतो, असेही समजू नये. लहान आकाराच्या गावांमध्येसुद्धा हिवाळ्यात हवा अधिक प्रदूषित होते, ज्याचे कारण वेगळे असते. उत्तर महाराष्ट्र, उत्तर भारत व हिमालयनजीकचे प्रदेश जिथे हिवाळ्यात कडाक्याची थंडी पडते अशा प्रदेशांमध्ये थंडीचे निराकरण करण्यासाठी घरांमध्ये, शेतावर किंवा जिथे लोक एकत्र येतात अशा सर्व जागी शेकोटी केली जाते. पाणी तापवण्यासाठी ज्या बंबाचा उपयोग केला जातो त्यासाठी आणि अन्न शिजवण्यासाठी चुलीचा उपयोग होत असल्यास त्यासाठीसुद्धा लाकूडफाटा खूप मोठ्या प्रमाणात जाळला जातो. यामधूनसुद्धा मोठ्या प्रमाणात प्रदूषण होते. लाकूडफाट्याबरोबरच सुके गवत, पालापाचोळा, लाकडाचा भुसा, जुने फर्निचर, टायर वगैरे वेगवेगळे पदार्थ जाळले जातात, जे हवा प्रदूषित करतात. या सर्व पदार्थांच्या ज्वलनामधून तयार होणारे पार्टिक्युलेट मॅटर हे घटक अतिशय सूक्ष्म असतात आणि हवेमधून आपल्या फुप्फुसांमध्ये शिरून शरीरावर घातक परिणाम करतात. हिवाळ्यात हवा प्रदूषित होण्याची ही महत्त्वाची कारणे आहेत. दुर्दैवाने हिवाळ्यात विविध पदार्थांच्या ज्वलनामुळे होणारे हवेचे प्रदूषण आपल्या देशामध्ये अधिक होत असल्याचे स्पष्ट आहे. वाढत्या प्रदूषणामुळे मानवी आरोग्यावर दुष्परिणाम होत असून, त्याला वेळीच आळा न घातल्यास भविष्यात त्याचे घातक परिणाम सहन करावे लागतील. प्रदूषणामुळे आरोग्याच्या अनेक समस्या उद्भवू शकतात. हवेतील वाढत्या प्रदूषणामुळे दरवर्षी लाखो लोक प्रभावित होत असतात. तज्ज्ञांच्या मते दमा, कर्करोग यासारखे जीवघेणे आजारही प्रदूषणामुळे वाढू शकतात. फुप्फुसे हा आपल्या शरीरातील महत्त्वाचा भाग असून हवेच्या प्रदूषणामुळे फुप्फुसांवर गंभीर परिणाम होऊ शकतो. विशेषतः हिवाळ्यात जेव्हा प्रदूषणात वाढ होते तेव्हा फुप्फुसांशी संबंधित आजारात मोठी वाढ दिसून येते. आता दीपावली हा सर्वात मोठा सण अगदी तोंडावर आलेला आहे. दिवाळीच्या काळात वाजवले जाणारे फटाके आणि हवेचे प्रदूषण यांचा अत्यंत निकटचा संबंध आहे. दिवाळीच्या काळात देशातील अनेक शहरांनी हवेच्या प्रदूषणाची धोक्याची पातळी ओलांडलेली दरवर्षी पाहण्यात येते. वायू प्रदूषणात भर घालण्याचे काम या काळात होते. सर्वसाधारणपणे दिल्ली, लखनऊ, पाटणा, चंडीगड या शहरांसह बहुतांश उत्तर भारतात ऑक्टोबर आणि दिवाळीच्या दरम्यान हवेच्या गुणवत्तेचा गंभीर स्तर नोंदवला जातो. देशातील सगळयाच प्रमुख शहरांमध्ये असे चित्र थोड्याफार फरकाने दिसून येते. हवेची गुणवत्ता खालावल्याने होणारे प्रदूषण हे दीर्घकाळ टिकणारे असते. या प्रदूषणाच्या संपर्कात येणाऱ्या सर्वच वयोगटांतील व्यक्तींवर त्याचे परिणाम दिसतात. लहान मुलांच्या आरोग्यावर दिसणारे परिणाम त्यांच्या वाढीच्या वयाच्या दृष्टीने अधिक चिंताजनक असतात. हवेच्या प्रदूषणामुळे मुलांच्या मानसिक आणि शारीरिक वाढीच्या प्रक्रियेत अडथळे येतात. त्याचा थेट परिणाम त्यांच्या आरोग्यावर होतो. त्यांच्या क्षमताही पूर्णपणे विकसित होण्याच्या दृष्टीने प्रदूषण हा एक चिंतेचा घटक म्हणूनच काम करतो. त्यामुळे कार्यक्षमता, जगण्याची गुणवत्ता यांवर परिणाम होतात तसेच आजारांचा धोका वाढीस लागतो. उत्तर भारताच्या मैदानी प्रदेशात जन्माला येणारी नवजात बालके सध्या दररोज २० ते २५ सिगारेट्स ओढल्याच्या प्रमाणात धूर श्वासावाटे शरीरात घेत असतात, असे यापूर्वीच स्पष्ट करण्यात येऊनही त्यावर काहीच उपाययोजना आजपर्यंत झालेल्या नाहीत. सध्या विधानसभा निवडणुकीची हवा गरम होत असली तरी प्रत्यक्षातील हवा मात्र चांगलीच खराब होत असल्याने त्यावर तातडीने उपाययोजना न केल्यास वायू प्रदूषणाने बळी पडणाऱ्यांच्या संख्येत वाढ होण्याचा धोका आहे. येणाऱ्या हिवाळा थंडीसोबतच प्रदुषण घेऊन येतो आहे. त्यामुळे आरोग्याची काळजी घ्यावी लागेल.

# मतदान यंत्राची ( अ ) कार्यप्रणाली आणि सुरक्षा व्यवस्था



**विधानसभा निवडणुकीत वापरण्यात येणार एकूण 1,37,118 व्हीव्हीपॅट**

महाराष्ट्र विधानसभा मतदारसंघांच्या निवडणुकीमध्ये ईव्हीएम व्हीव्हीपॅट EVM-VVPAT चा वापर करण्यात येणार आहे. त्यासाठी राज्यात 2,26,624 बॅलेट युनिट ( Bus), 1,26,911 सीयु (CUs) आणि 1,37,118 व्हीव्हीपॅट (VVPAT) यंत्रणेचा वापर करण्यात येणार आहे. या सर्व यंत्रांची प्रथमस्तरीय तपासणी (First Level Checking) पूर्ण करण्यात आली आहे. यासाठी सर्व राजकीय पक्षाच्या प्रतिनिधींना त्याबाबत अवगत करुन तपासणीसाठी उपस्थित राहण्यासंदर्भात कळवण्यात आले. निवडणूक मतदान यंत्रांच्या संदर्भात मतदारांमध्ये जागृती आणि विश्वासार्हता निर्माण व्हावी, या हेतूने मोठ्या प्रमाणात निवडणूक आयोगामार्फत जनजागृती कार्यक्रम दि. 10 सप्टेंबर 2024 ते दि.9 ऑक्टोबर 2024 या कालावधीत राबविण्यात आला. यामध्ये सर्व जिल्ह्यांमध्ये गाव पातळीवर मोबाईल व्हॅनच्या माध्यमातून प्रत्यक्ष मतदान यंत्रांवर कसे मतदान करता येते तसेच ही प्रक्रिया कशी सुरक्षित आहे, याची जनतेला माहिती देण्यात आली. या जनजागृतीचा कार्यक्रम यशस्वी ठरला असून जनतेने या कार्यक्रमात मोठ्या प्रमाणात सक्रिय सहभाग घेतला.

**ईव्हीएमची निर्मिती आणि रचना**

भारत इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेड (संरक्षण मंत्रालयातंर्गत सार्वजनिक उपक्रम) आणि इलेक्ट्रॉनिक्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड ( संरक्षण विभागांतर्गत सार्वजनिक उपक्रम ) यांनी इलेक्ट्रॉनिक व्होटींग मशीन (ईव्हीएम) आणि व्हीव्हीपॅटची निर्मिती केली आहे. इलेक्ट्रॉनिक व्होटींग मशीन (ईव्हीएम) मध्ये दोन युनिट्स असतात. एक कंट्रोल युनिट (सीयु)आणि दुसरे बॅलेट युनिट(बीयु). एक बॅलेट युनिट सोळा उमेदवारांसाठी वापरता येते. दृष्टीहीन मतदारांसाठी बॅलेट युनिट्सच्या उजव्या बाजूला मतदाराचे मत या बटणाशेजारी 1 ते 16 अंक ब्रेललिपीत कोरलेले असतात. व्होटर व्हेरिफायबेल पेपर ऑडिट ट्रेल(व्हीव्हीपॅट) व्होटर व्हेरिफायेबल पेपर ऑडिट ट्रेल ही इलेक्ट्रॉनिक व्होटींग मशीनला संलग्न पण स्वतंत्र अशी प्रणाली आहे. यामुळे मतदारांना त्यांचे मत त्यांनी दिले त्यानुसारच नोंदले गेले आहे हे पडताळता येते.

**ईव्हीएमची सरमिसळ ( Randomization ) प्रक्रिया**

निवडणूकीत वापरल्या जाणा-या सर्व मतदान यंत्रांची म्हणजे ईव्हीएम यंत्राची सरमिसळ प्रक्रिया दोन वेळा करण्यात येते. भारत निवडणूक आयोगाद्वारे विकसित केलेल्या इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र व्यस्थापन प्रणालीचा (ईएमएस) वापर करुन, इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र व व्हीव्हीपीएटी यांचे सरमिसळ ( यादृच्छिकीकरण ) करण्यात येते. याची पहिली फेरी राष्ट्रीय व राज्य मान्यताप्राप्त राजकीय पक्षांच्या उपस्थितीत करण्यात येते. विधानसभा मतदारसंघनिहाय/ प्रभाग क्षेत्र निहाय इेल्क्ट्रॉनिक मतदान यंत्र व व्हीव्हीपीएटीचे वाटप करण्यासाठी ही प्रक्रिया केली जाते. विधानसभेच्या निवडणूकीसाठी या सरमिसळ प्रक्रियेची पहिली फेरी राज्यातील सर्व जिल्ह्यात पूर्ण करण्यात आली आहे.

प्रथम यादृच्छिकीकरण झालेली इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे व व्हीव्हीपीएटी यांची यादी (विधानसभा मतदारसंघनिहाय/ विधानसभा प्रभाग क्षेत्रनिहाय) राष्ट्रीय व राज्य मान्यताप्राप्त राजकीय पक्षांना देण्यात येते. निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांची यादी अंतिम झाल्यानंतर, यादृच्छिकीकरण झालेली इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे व व्हीव्हीपीएटी यांची यादी (विधानसभा मतदारसंघनिहाय/ विधानसभा प्रभागक्षेत्रनिहाय) निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांना देखील देण्यात येते. इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे व व्हीव्हीपीएटी यांचे दुसरे यादृच्छिकीकरण, इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे व व्हीव्हीपीएटी सुरू करण्यापूर्वी, निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांच्या उपस्थितीत, मतदान केंद्रनिहाय वाटप करण्यासाठी आणि यंत्रे राखीव ठेवण्यासाठी करण्यात येते. दुसरे यादृच्छिकीकरण झालेली इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे व व्हीव्हीपीएटी यांची यादी, निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांना देण्यात येते.

**इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे व व्हीव्हीपीएटी कार्यान्वित करणे (commissioning)**

मतदानात वापरण्यासाठीची इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे व व्हीव्हीपीएटी, निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांच्या उपस्थितीत जिल्हा कर्मचाऱ्यांद्वारे कार्यान्वित करण्यात येतात. कार्यान्वित करण्याच्या दिवशी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे व व्हीव्हीपीएटीचा सुरक्षित कक्ष, ध्वनिचित्रमुद्रणाखाली (व्हिडिओग्राफी) उमेदवारांच्या/त्यांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत उघडण्यात येतो. प्रत्येक व्हीव्हीपीए मध्ये चिन्हांकन भरण युनिटद्वारे (सिम्बॉल लोडींग युनिटद्वारे) (एसएलयु) चिन्हांचा अंतर्भाव करण्यात येईल. व्हीव्हीपीएटीमध्ये अंतर्भूत केलेली चिन्हे, उमेदवारांना/त्यांच्या प्रतिनिधींना मॉनिटर/टी. व्ही. पडद्यावर पहाता यावीत, यासाठी एकाचवेळी प्रदर्शित करण्यात येतील. प्रत्येक इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र आणि व्हीव्हीपीएटी मतदानासाठी वापरताना त्यांची, नोटासह सर्व उमेदवारांना एकेक मत देऊन तपासणी केल्या जाते. त्याबरोबरच, यादृच्छिकपणे निवडलेल्या पाच टक्के इव्हीएम आणि व्हीव्हीपीएटीचे एक हजार मतांचे उच्चस्तरीय अभिरुप मतदान केले जाते ते इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचा इलेक्ट्रॉनिक निकाल व्हीव्हीपीएटीच्या चिठ्ठयांच्या संख्येशी मिळता जुळता आहे ना हे पाहिले जाते. उमेदवारांना त्यांच्या प्रतिनीधींनाही, पाच टक्के ईव्हीएम व व्हीव्हीपीएटी यंत्रे यादृच्छिकपणे निवडण्यास आणि अभिरूप मतदानात मतदान करण्यास परवानी देण्यात येते. ईव्हीएम आणि व्हीव्हीपीएटी मोहोरबंद करण्यासाठी वापरावयाच्या मोहोरांवर स्वाक्षरी करण्यास उमेदवार/त्यांच्या प्रतिनिधींना परवानगी देण्यात येते. ईव्हीएम-व्हीव्हीपीएटी कार्यान्वित केल्यानंतर, उमेदवार त्यांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत दुहेरी कुलुप वापरून ईव्हीएम- व्हीव्हीपीएटी सुरक्षित कक्षात ठेवण्यात येते. मतदान संचलन पथकांना ईव्हीएम आणि व्हीव्हीपीएटी यंत्रांचे वाटपाच्या दिवशी सुरक्षित कक्ष उमेदवारांच्या/ त्यांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत व्हीडीओ चित्रणांतर्गत उघडण्यात येतो. त्यांच्या उपस्थितीत यंत्र वितरीत करण्यात येतात.

**मतदानाच्या दिवशी ईव्हीएम कार्यान्वितता**

मतदानाच्या दिवशी, प्रत्यक्ष मतदान सुरू होण्याच्या वेळेपासून ९० मिनिटे अगोदर, निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी नियुक्त केलेल्या मतदान प्रतिनिधींच्या उपस्थितीत प्रत्येक मतदान केंद्रात किमान ५० मतांचे अभिरूप मतदान (नोटासह, प्रत्येक उमेदवाराला किमान एक मत देऊन) घेण्यात येईल. अभिरूप मतदानाचा इलेक्ट्रॉनिक निकाल व्हीव्हीपीएटी चिठ्यांच्या संख्येशी मिळता-जुळता आहे हे पडताळून बघण्यात येईल. नियंत्रण युनिटमधील अभिरूप मतदानाच्या सर्व माहितीसाठा नष्ट करण्यात येईल आणि अभिरूप मतदानातील व्हीव्हीपीएटी चिठ्ठ्या काळ्या लिफाफ्यामध्ये ठेवण्यात येईल आणि तो गुलाबी कागदी मोहरेने मोहोरबंद करण्यात येईल. मतदान केंद्राध्यक्ष तशा आशयाचे अभिरुप मतदान प्रमाणपत्र तयार करील. प्रत्यक्ष मतदान सुरू होण्यापूर्वी, नियंत्रण युनिट हे हिरवी कागदी मोहोर, विशेष खूणचिठ्ठी आणि निर्देश खूणचिठ्ठी यांच्याद्वारे मोहोरबंद करण्यात येईल. व्हीव्हीपीएटी ड्रॉप बॉक्ससुद्धा (मतदान कक्ष) पत्ता खुणचिठ्ठीने मोहोरबंद करण्यात येईल. मतदान समाप्त झाल्यावर, मतदान केंद्राध्यक्ष मतदान समाप्त करण्यासाठी नियंत्रण युनिटचे" CLOSE " बटन दाबेल. ईव्हीएम / व्हीव्हीपीएटी त्या त्या वहन पेट्यांमध्ये ठेवण्यात येतील, आणि ते निर्देश खूणचिठ्ठीने मोहोरबंद करण्यात येतील. ईव्हीएम आणि व्हीव्हीपीएटी मोहोरबंद करण्यासाठी वापरलेल्या मोहोरांवर (मतदानास प्रारंभ होण्यापूर्वी आणि मतदान समाप्तीच्या वेळी) स्वाक्षरी करण्याची मतदान प्रतिनिधींना परवानगी देण्यात येईल.

निवडणूक लढविण्याऱ्या उमेदवारांनी नियुक्त केलेल्या मतदान प्रतिनिधींना, मतदान प्रक्रियेवर देखरेख करण्यासाठी मतदान केंद्रामध्येच उपस्थित राहण्याची परवानगी दिलेली आहे. मतदारांचा तपशील, ईव्हीएम व्हीव्हीपीएटी आणि वापरलेल्या मोहोरा, ईव्हीएममध्ये नोंदवलेल्या मतांसह, इत्यादींचा तपशील असणाऱ्या नमुना '१७ सी' ची प्रत मतदान प्रतिनिधींना दिल्या जाईल. मतदान नोंदवलेली ईव्हीएम आणि व्हीव्हीपीएटीची मतदान केंद्रापासून ते संकलन केंद्रापर्यंतची वाहतूक मतदान संपल्यानंतर, ईव्हीएम आणि व्हीव्हीपीएटी, सुरक्षा व्यवस्थेत मतदान केंद्रावरून संकलन केंद्रापर्यंत नेले जाते. हे घेऊन जाणाऱ्या वाहनांमागे उमेदवार/मतदान प्रतिनिधींना येण्याची परवानगी देण्यात येते.

**मतदानानंतर ईव्हीएम आणि व्हीव्हीपीएटीची साठवणूक**

मतदान केलेले ईव्हीएम आणि व्हीव्हीपीएटी उमेदवार/ त्यांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत सुरक्षा कक्षामध्ये ठेवले जाते. सुरक्षा कक्षाच्या कुलुपांवर उमेदवार/त्यांच्या प्रतिनिधींना देखील त्यांची मोहोर लावण्याची परवानगी दिली आहे. या ठिकाणी कडक सुरक्षा व्यवस्था तैनात केलेली असते. मतदान नोंदवलेली ईव्हीएम ठेवलेल्या सुरक्षाकक्षाच्या ठिकाणी किमान एक सशस्त्र सुरक्षा तुकडी (केंद्रीय सशस्त्र पोलिस दल तैनात केलेला असतो. तसेच त्या ठिकाणी सीसीटीव्ही चित्रणाची तरतूद केलेली असते. मतदान केलेले ईव्हीएम साठविलेल्या सुरक्षाकक्षाच्या ठिकाणी द्विस्तरीय सुरक्षाकडे उभारलेले असते. पहिल्या कड्यात केंद्रीय सशस्त्र पोलीस दल तैनात असतो आणि बाहेरच्या कड्यात राज्य सशस्त्र पोलीस तैनात असतात. आतील कड्यात कोणालाही प्रवेश दिले जात नाही. सुरक्षा कक्षात पहारा करण्यासाठी तेथे उमेदवारांचा/त्यांच्या प्रतिनिधींना राहण्याची परवानगी दिली आहे. सुरक्षा कक्षाचे प्रवेशद्वार दिसत नसल्यास, सीसीटीव्ही दर्शक पटल सुविधेची तरतूद केली आहे. मतदान न नोंदवलेली कार्यान्वित केलेली आणि न वापरलेली राखीव ईव्हीएम आणि व्हीव्हीपीएटी, स्वतंत्रपणे सुरक्षेत ठेवली जातात.

**मतमोजणीचा दिवस**


मतदाराने नोंदविलेली यंत्रे ठेवलेले सुरक्षित कक्ष हे मतमोजणीच्या दिवशी उमेदवार/त्यांचे प्रतिनिधी, निवडणूक अधिकारी, निवडणूक आयोग निरीक्षक यांच्या उपस्थितीत, व्हिडीओ चित्रणाखाली उघडले जाते. उमेदवार आणि त्यांनी नेमलेले मतमोजणी प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत मतमोजणी केली जाते. अशा पद्धतीने मतदान यंत्रांची सुरक्षितता आणि कार्यप्रणाली यंत्रणेमार्फत कटाक्षाने पाळण्यात येते.

**- वंदना थोरात,**
**विभागीय संपर्क अधिकारी**

# विनोदाचे अचूक टायमिंग साधणारा
# सर्वांचा लाडका 'लक्ष्या'

**जवळपास** दोन अडीच दशके मराठी प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवणारा लक्ष्या अर्थात लक्ष्मीकांत बेर्डे याचा आज जन्मदिन. लक्ष्या म्हणजे मराठी चित्रपट सृष्टीला पडलेले एक विनोदी स्वप्न. लक्ष्या या नावाशिवाय मराठी चित्रपटाचा इतिहास लिहिलाच जाऊ शकत नाही. लक्ष्मीकांत बेर्डे या त्याच्या पडद्यावरील नावापेक्षा लक्ष्या या नावानेच तो अधिक ओळखला जातो कारण हे नाव त्याला प्रेक्षकांनी दिले आहे. लक्ष्या हा मराठी प्रेक्षकांना आपल्यातीलच एक वाटायचा म्हणूनच दहा वर्षाच्या मुलापासून ऐंशी वर्षांच्या आजोबांपर्यंत सर्वांनी लक्ष्यावर अतोनात प्रेम केले. जवळपास दोन अडीच दशके आपल्या सहज - सुंदर, विनोदी अभिनयाने प्रेक्षकांच्या मनात घर करणाऱ्या लक्ष्याचा जन्म सत्तर वर्षापुर्वी आजच्याच दिवशी म्हणजे २६ ऑक्टोबर १९५४ रोजी झाला.

लहानपणापासून अभिनयाची आवड असलेल्या लक्ष्याने आपल्या अभिनय कारकिर्दीची सुरुवात टुरटुर या नाटकाद्वारे केला. टुरटुर हे त्याचे पहिलेच नाटक कमालीचे हिट झाले आणि या नाटकातील त्याची भूमिकाही प्रेक्षकांना आवडली. त्यानंतर शांतेचं कार्ट चालू आहे, बिघडले स्वर्गाचे दार या नाटकातून त्याने केलेल्या विनोदी भूमिका प्रेक्षकांना भावल्या. ही नाटके देखील हिट झाली. लागोपाठच्या नाटकात विनोदी भूमिका करून लक्ष्या नाट्य सृष्टीत आघाडीचा विनोदी अभिनेता म्हणून पुढे येऊ लागला. याच भूमिकांच्या जोरावर त्याला मराठी चित्रपटातही संधी मिळाल्या. अर्थात नाटका प्रमाणे इथेही त्याला विनोदी भूमिकाच मिळाल्या त्यानेही या भूमिकांचे सोने करत त्याला मिळालेल्या विनोदी भूमिकांना न्याय दिला . त्याच्या विनोदी भूमिका प्रेक्षकांना खूप आवडल्या. त्याची लोकप्रियता वाढू लागली. लक्ष्या या नावाने आबालवृद्धांमध्ये त्याची लोकप्रियता पसरली. त्याचे चित्रपट प्रचंड यशस्वी झाले. त्याची जोडी जमली ती महेश कोठारे यांच्यासोबत. महेश कोठारेंचा चित्रपट आणि लक्ष्या नाही असे सहसा घडलेच नाही.



कारण महेश कोठारे आणि लक्ष्या ही जोडी म्हणजे यशाची खात्री अशी ओळखच बनली. या दोघांचा चित्रपट म्हणजे मनोरंजनाची शंभर टक्के हमी. या दोघांनी एकत्रित भूमिका केलेले धूमधडाका, धडाकेबाज, थरथराट, झपाटलेला असे कितीतरी चित्रपट तिकीटबारीवर यशस्वी झाले. यशस्वीच नाही तर या चित्रपटांना प्रेक्षकांनी अक्षरशः डोक्यावर घेतले. लक्ष्याने सचिन पिळगावकर यांच्या सोबत केलेला अशी ही बनवा बनवी हा चित्रपट देखील हिट झाला. लक्ष्या आणि अशोक सराफ या दोघांचीही जोडी जमली. या दोघांनी एकत्रित अनेक चित्रपट केले आणि ते यशस्वीही झाले. ८० आणि ९० च्या दशकात लक्ष्या आणि अशोक सराफ या जोडीने मराठी चित्रपट सृष्टीत अक्षरशः धुमाकूळ घातला. ही जोडी म्हणजे मराठी चित्रपट सृष्टीतील राम लक्ष्मणाची जोडी. या दोन्ही कलाकारांचे ट्युनिंग अतिशय चांगले जमले होते. या दोघानी मराठी मनांचे मनोरंजन करीत अनेकांना आयुष्यातील तणाव, दुःख विसरायला लावून आनंदाचे कारंजे फुलविले. मराठीत लोकप्रियतेच्या शिखरावर असताना लक्ष्याला हिंदी चित्रपट सृष्टीतून चांगल्या ऑफर येऊ लागल्या. त्यातील काही ऑफर त्याने स्वीकारल्या. राजश्री प्रॉडक्शन्सच्या मैने प्यार किया या चित्रपटात त्याला सलमान खानच्या मित्राची भूमिका मिळाली ती त्याने छान निभावली.

याशिवाय अनेक हिंदी चित्रपटात त्याने भूमिका केल्या मात्र त्याच्या अभिनयाचा कस लागेल अशा भूमिका त्याला हिंदीत मिळाल्या नाहीत त्या त्याला मिळाल्या मराठीतच. पु ल देशपांडे यांनी लिहिलेल्या एक होता विदूषक या जब्बार पटेल यांनी दिग्दर्शित केलेल्या चित्रपटात मुख्य भूमिका निभावली ती लक्ष्याने. या चित्रपटात त्याने केलेल्या गंभीर भूमिकेने त्याच्या अभिनय क्षमतेवर शिक्कामोर्तब केले. हा चित्रपट तिकीट बारिवर अपयशी ठरला तरी त्यातील त्याच्या गंभीर भूमिकेने त्याला अनेक पुरस्कार मिळवून दिले. लक्ष्याने विनोदी भूमिका अधिक केल्या आणि त्या यशस्वीही झाल्या म्हणून विनोदी अभिनेता असे त्याचे वर्णन करणे हा त्याच्यावर अन्याय ठरेल. गंभीर भूमिकाही उत्तम प्रकारे करू शकतो हे लक्ष्याने एक होता विदूषक तसेच लेले विरुद्ध लेले आणि सर आले धावून या नाटकातून दाखवून दिले. आयुष्यभर प्रेक्षकांना हसवणारा हा कलाकार १६ डिसेंबर २००४ रोजी प्रेक्षकांना दुःखाच्या सागरात बुडवून काळाच्या पडद्याआड गेला. विनोदाचा अचूक टायमिंग साधणारा, अभिनयाची दैवी देणगी लाभलेल्या सर्वांच्या लाडक्या हरहुन्नरी लक्ष्याला जन्मदिनी विनम्र अभिवादन!

- श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे

## निवडणूकीच्या स्वीप कार्यक्रमांतर्गत मतदार जनजागृती

**नवी मुंबई :** महाराष्ट्र विधानसभा निवडणूकीच्या मतदार जनजागृती स्वीप कार्यक्रमांतर्गत नागरिकांपर्यंत पोहचण्यासाठी विविध माध्यमांचा प्रभावी वापर करण्यात येत असून आज बेलापूर विभागात सेक्टर 11 रेल्वे स्टेशन परिसर आणि बेलापूरगाव व शहाबाजगाव परिसरात स्वयंसेवी संस्था व नागरिकांच्या सहयोगाने जनजागृती रॅली काढून मतदान करणेविषयी आवाहन करण्यात आले. त्याचप्रमाणे ठिकठिकाणी थांबून तेथील नागरिक समुहांसोबत मतदान प्रतिज्ञा घेण्यात आल्या. अशाच प्रकारे वाशी विभाग कार्यक्षेत्रात वाशी रेल्वे स्टेशन तसेच वाशीगाव आणि परिसरात नागरिक समुहांशी संवाद साधून त्यांच्यामध्ये मतदानाविषयी जनजागृती करण्यात आली. तसेच सेक्टर 9 ए येथील भाजी मार्केट व मोतीमाला ज्वेलर्स सेक्टर 9 परिसरातील व्यावसायिक आणि ग्राहकांशी संवाद साधून त्यांनाही 20 नोव्हेंबर रोजी मतदान करण्याविषयी आवाहन करण्यात आले.



## म ह त्त्वा चे

### फटाके विक्रीच्या मंचांनी अडविले वर्दळीचे रस्ते

**कल्याण :** कल्याण-डोंबिवली शहरातील मुख्य वर्दळीचे रस्ते, पदपथांवर बहुतांशी विक्रेत्यांनी कल्याण डोंबिवली पालिकेच्या परवानग्या न घेता फटाके विक्रीचे मंच उभारले आहेत. अनेक मंचांवर राजकीय पदाधिकाऱ्यांच्या प्रतिमा छळकून व्यापारी व्यवसाय करताना दिसत आहेत. परवानी न घेता फटाके विक्रीचे बहुतांशी मंच हे राजकीय मंडळींचे समर्थक असल्याची चर्चा आहे.कल्याण डोंबिवली पालिकेचे कर्मचारी विधानसभा निवडणूक कामात व्यस्त आहेत. या कामामुळे पालिका मुख्यालय, प्रभागातील अधिकारी, कामगारांना प्रभागातील फेरीवाले, फटाके विक्रीचे मंच याकडे लक्ष देण्यास सध्या वेळ नाही. तरीही काही प्रभाग साहाय्यक आयुक्त निवडणूक कामातील वेळात वेळ काढून कल्याण, डोंबिवली रेल्वे स्थानक भागातील फेरीवाले हटविण्याचे काम करत आहेत. कल्याण, डोंबिवली पूर्व रेल्वे स्थानक भागातील रस्ते, पदपथ, शहरांच्या अंतर्गत वर्दळीच्या रस्त्यांवर हे फटाके विक्रीचे मंच थाटण्यात आले आहेत. दिवाळीच्या दहा दिवसाच्या कालावधीत फटाके विक्रीतून चांगली कमाई होऊ शकते, या विचारातून काही तरूण भागीदारी पध्दतीने ही दुकाने चालवित आहेत.

### नायजेरीयन नागरिकाची उडी मारुन आत्महत्या

**डोंबिवली :** शिळफाटा रस्त्यावरील लोढा पलावा गृह प्रकल्पातील ॲड्रीना इमारतीच्या पंधराव्या माळ्यावरून उडी मारून एका ४२ वर्षाच्या नायजेरीयन नागरिकाने आत्महत्या केली आहे. गुरुवारी मध्यरात्रीच्या सुमारास हा प्रकार घडला. या नागरिकाला तातडीने पालिकेच्या डोंबिवलीतील शास्त्रीनगर रुग्णालयात आणण्यात आले. त्याला डॉक्टरांनी मृत्य घोषित केले. अर्नेस्ट ओबीरथ (४२) असे मरण पावलेल्या व्यक्तिचे नाव आहे. त्यांच्या जवळील पारपत्रावर नायजेरीया अनमब्रा असा पत्ता आहे. मानपाडा पोलीस ठाण्यात याप्रकरणी अपघाती मृत्युची नोंद करण्यात आली आहे. या मृत्युप्रकरणी कोणावरही संशय नसल्याचा पोलीस अभिलेखात उल्लेख करण्यात आला आहे. पोलिसांनी सांगितले, लोढा पलावा गृह प्रकल्पातील ॲड्रीना इमारतीच्या डाऊन टाऊन भागात पंधराव्या माळ्यावर मयत अर्नेस्ट ओबीरथ आणि त्याचा मित्र एकेचुव्हू मडक्वे (४०) हे दोघे मित्र काही महिन्यांपासून एकत्र राहत होते. ते काय व्यवसाय, नोकरी करतात याप्रकरणी सोसायटीतील रहिवाशांना माहिती नव्हती. त्यांचे दैनंदिन येणेजाणे सोसायटीत सुरू होते.

# ठाणे जिल्ह्यात 24 उमेदवारांनी भरले अर्ज

## मणेरा, चौगुले यांचे शक्तिप्रदर्शन : कल्याण - ठाण्यात महाविकास आघाडीत बंडखोरी

प्रतिनिधी
■ ठाणे

शिवसेनेचे आमदार प्रताप सरनाईक आणि शिवसेना ठाकरे गटाचे उमेदवार नरेश मणेरा यांनी जोरदार शक्तिप्रदर्शन करीत उमेदवारी अर्ज दाखल केले. तर भिवंडी पश्चिममधील भाजपचे आमदार महेश चौगुले यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले. तर महाविकास आघाडीत बंडखोरी होत ठाण्यातून राष्ट्रवादी शरद पवार गटाचे दीपक क्षत्रिय आणि कल्याण पूर्वेमध्ये काँग्रेसचे जिल्हा अध्यक्ष सचिन पोटे यांनी अपक्ष म्हणून अर्ज दाखल केला. छत्रपती संभाजी महाराज यांच्या स्वराज पक्षातर्फे ऐरोलीतून अंकुश कदम यांच्या उमेदवारीसह ठाणे जिल्ह्यातील १८ विधानसभा मतदारसंघातून विविध पक्षांच्या २४ उमेदवारांनी आज नामनिर्देशन अर्ज सादर केले. तर १८२ नामनिर्देशनपत्रांचे वाटप करण्यात आले.

ओवळा माजिवडा मतदार संघातून विजयाची हॅट्रिक करणाऱ्या आमदार प्रताप सरनाईक यांनी जोरदार शक्तीप्रदर्शन केले त्यांचा अर्ज दाखल करताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, भाजप आमदार संजय केळकर, संजय वाघुले,यांच्यासह महायुतीतील सर्व नेते उपस्थित होते. तर ठाकरे गटाचे उमेदवार नरेश मणेरा यांनी ही शक्तिप्रदर्शन करीत उमेदवारी अर्ज दाखल केला. त्यावेळी माजी खासदार राजन विचारे आणि सेनेचे पदाधिकारी उपस्थित होते. या मतदार संघात आज तीन उमेदवारांनी अर्ज दाखल केले. तर ९ उमेदवारी अर्ज वितरित झाले आहेत.

**भिवंडी येथे मेघना चौघुले यांचे शक्तिप्रदर्शन**

भिवंडी पश्चिम विधानसभा मतदारसंघातून भारतीय जनता पार्टीचे विद्यमान आमदार महेश चौघुले आणि त्यांची पत्नी मेघना चौघुले यांनी शक्तिप्रदर्शन करीत अर्ज दाखल केले. इतर दोन अपक्ष उमेदवार निशाल संतोष भोईर व प्रकाश राजाराम टावरे यांनी आपले उमेदवारी अर्ज सादर केले. तर १८ नामनिर्देशन पत्रांचे वाटप करण्यात आले. तर भिवंडी पूर्व विधानसभा मतदारसंघातून ५ नामनिर्देशनपत्रांचे वाटप करण्यात आले. शहापूर (अ.ज.) विधानसभा मतदारसंघातून पुन्हा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे(अजित पवार गट) उमेदवार दौलत भिका दरोडा यांनी आणि शर्मिला अमोल शेळके यांनी उमेवारी अर्ज दाखल केले. तर एकूण ११ नामनिर्देशन पत्रांचे वाटप करण्यात आले.

**कल्याण पश्चिममधून २६ नामनिर्देशन पत्रे**

कल्याण पश्चिम विधानसभा मतदारसंघातून आज समता पार्टीचे उमेदवार रंजनी अरुण देवळेकर आणि निर्भय महाराष्ट्र पार्टीचे उमेदवार संदीप महादेव नाईक तर अपक्ष दोन उमेदवार मोनिका मोहन पानवे व अश्विनी प्रताप मोकासे यांनी अर्ज दाखल केले. तर एकूण 26 नामनिर्देशन पत्रांचे वाटप करण्यात आले. अद्याप कुणीही मोठ्या पक्षाच्या उमेदवाराने अर्ज दाखल केलेला नाही. मुरबाड विधानसभा मतदारसंघातून अपक्ष उमेदवार शरद लक्ष्मण पाटील यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला असून एकूण १२ नामनिर्देशन अर्जाचे वाटप करण्यात आले. अंबरनाथ विधानसभा मतदारसंघातून अपक्ष उमेदवार देविदास निकम यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आणि एकूण १३ नामनिर्देशन पत्रांचे वाटप करण्यात आले. उल्हासनगर विधानसभा मतदारसंघातून दोन अपक्ष उमेदवार अनिल जयरामदास तोताणी व पुजा वाल्मिकी यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आणि ८ नामनिर्देशन पत्रांचे वाटप करण्यात आले.

## बनावट सिगारेटचा 5 कोटींचा मुद्देमाल जप्त, 15 जणांना अटक



प्रतिनिधी
■ कर्जत

कर्जत तालुक्यातील सांगवी या ठिकाणी बनावट सिगारेट तयार करण्याचा कारखाना सुरु होता. पोलिसांनी या कंपनीवर छापा टाकत पर्दाफाश केला आहे. रायगड पोलिसांनी ही कामगिरी केली असून येथून तब्बल ५ कोटींचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

रायगड पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेने २४ ऑक्टोम्बरला एका फार्म हाऊसवर धाड टाकली. या ठिकाणी गोल्ड फ्लेक या नामांकित ब्रँडचे बनावट सिगारेट बनवण्याचा कारखाना सुरू होता. मागील ६ महिन्यांपासून हा कारखाना सुरू असल्याची माहिती पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी दिली. दरम्यान पोलिसांनी येथे टाकलेल्या कारवाईत २ कोटी ३१ लाख रुपयांचे सिगारेट, तसेच सिगारेट बनवण्यासाठी लागणारे तंबाखू व इतर साहित्य तसेच मशिनरी मिळून ५ कोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

बनावट सिगारेट बनविण्याच्या कारखान्यावर पोलिसांनी छापा टाकत कारवाई केली असून याप्रकरणी कर्जत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच येथील १५ जणांना अटक करण्यात आली आहे. यात आणखी काही जणांना अटक होण्याची शक्यता आहे. या कारखान्याचा मालक दाक्षिणात्य असून त्याचा शोध सुरू आहे.

## पालिकेतर्फे 'डीप क्लिन ड्राईव्ह' अंतर्गत स्वच्छ दिपावली, शुभ दिपावली मोहिमेचे आयोजन

प्रतिनिधी
■ भाईंदर

मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त संजय श्रीपतराव काटकर यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छ भारत अभियान व राष्ट्रीय स्वच्छ हवा कार्यक्रम अंतर्गत महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रात दिपावलीपूर्वडीप क्लिन ड्राईव्ह अर्थात स्वच्छ दिपावली, शुभ दिपावली ही मोहीम राबविण्यात आली. सदर मोहिमेस अतिरिक्त आयुक्त अनिकेत मानोरकर, उपायुक्त डॉ. सचिन बांगर, उपायुक्त प्रसाद शिंगटे, अग्निशमन दल अधिकारी, सर्व सहाय्यक आयुक्त, सर्व स्वच्छता निरीक्षक व सफाई कर्मचारी उपस्थित होते.





आज दिनांक 25 ऑक्टोबर 2024 रोजी प्रभाग समिती क्रमांक 01 व 02 कार्यक्षेत्रातील मॅक्सस मॉल, 60 फूट रोड, महाराणा प्रताप पुतळा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा, उड्डाणपूल, उत्तन चौक, उत्तन नाका, जैन मंदिर, महापालिका मुख्य कार्यालय इत्यादी ठिकाणी स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. यापूर्वी दिनांक 11 ऑक्टोबर 2024 रोजी प्रभाग समिती क्रमांक 04 व 06 अंतर्गत छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारूढ पुतळा, सिल्वर पार्क, बालाजी हॉटेल, शिवार गार्डन,मिरा रोड सेक्टर 5, पूनम सागर ब्रीज, मिरा रोड स्कायवॉक, हैदरी चौक, हनुमान मंदिर नवघर, विमल डेअरी, गोडदेव नाका इत्यादी ठिकाणी दिवाळीपूर्व सखोल स्वच्छता अभियान राबविण्यात आली होती.

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रताप सरनाईकांनी भरला अर्ज

प्रतिनिधी
■ ठाणे

भव्य रॅली काढून १४६ ओवळा-माजिवडा या विधानसभा मतदारसंघातून सलग चौथांदा निवडणुकीच्या रिंगणात उतरलेले शिवसेनेचे अधिकृत उमेदवार प्रताप बाबुराव सरनाईक यांनी मुख्यमंत्री मा. एकनाथ शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत उमेदवारी अर्ज निवडणूक निर्णय अधिकारी इब्राहिम चौधरी यांच्याकडे सुपूर्द केला. यावेळी खासदार नरेश म्हस्के, आमदार संजय केळकर, काँग्रेसचे ठाणे शहराध्यक्ष आनंद परांजपे यावेळी उपस्थित होते



या रॅली मध्ये भा.ज.पा.चे संजय वाघुले, मनोहर डुंबरे, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया एकतावादी पक्षाचे राष्ट्रीय नेते जितेंद्रकुमार इंदिसे, भैय्यासाहेब इंदिसे, आर.पी.आय. आठवले गटाचे भास्कर वाघमारे उपस्थित होते. तसेच रॅली मध्ये माजी महापौर एच.एस. पाटील, संजय भोईर, महिला आघाडीच्या महिला संघटक सौ. मीनाक्षी शिंदे, मुंबई टी २० लीगचे अध्यक्ष विहंग सरनाईक, युवासेना कार्याध्यक्ष पुर्वेश सरनाईक, माजी नगरसेविका सौ. परिषा सरनाईक यांच्यासह सूना सौ. अनाहिता सरनाईक, डॉ. कश्मिरा सरनाईक संपूर्ण सरनाईक परिवारासह शिवसेना व महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ठाणे लोकसभेतील सर्वात मोठा आणि दोन महानगरपालिकांचे कार्यक्षेत्र असलेला १४६ ओवळा-माजिवडा ही विधानसभा ओळखली जाते. चौथ्यांदा महायुतीचे उमेदवार म्हणून आमदार प्रताप सरनाईक यांनी १४६ ओवळा-माजिवाडा मतदारसंघातून उमेदवारी अर्ज दाखल केला. अर्ज भरण्यासाठी वर्तकनगरमधील विहंग पाम क्लब येथून ढोलताशांच्या गजरात रॅली काढण्यात आली. या रॅलीत मोठ्या संख्येने शिवसेना व महायुतीचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. रॅलीमध्ये चौकाचौकात प्रताप सरनाईक यांचे पदाधिकारी, नागरिकांनी स्वागत करत त्यांना विजयासाठी शुभेच्छा दिल्या.

ठाणे, मिरा भाईंदर या महापालिका कार्यक्षेत्रात असलेल्या ओवळा-माजिवडा मतदारसंघात गेल्या १५ वर्षांपासून विकासकामे करत आलोय. पुन्हा एकदा या मतदारसंघाचे प्रतिनिधीत्व करण्यासाठी महायुतीचा उमेदवार म्हणून संधी मिळाली आहे. त्यांचा विश्वास सार्थ ठरवण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करणार आहे. मायबाप जनतेची साथ आणि आशीर्वाद असेच माझ्या पाठीशी राहू देत, अशा भावना प्रताप सरनाईक यांनी व्यक्त केल्या.

## दिव्यांग व्यक्ती, विद्यार्थी व पालकांनी बनविलेल्या दिवाळी वस्तूंना उत्तम प्रतिसाद



प्रतिनिधी
■ नवी मुंबई

नवी मुंबई महानगरपालिकेचे ईटीसी दिव्यांग शिक्षण, प्रशिक्षण व सेवा सुविधा केंद्र हे एकाच छताखाली सर्व प्रकारच्या दिव्यांगांना सामावून घेणारे देशातील अग्रगण्य केंद्र म्हणून नावाजले जाते आहे. केंद्रामार्फत दिव्यांग सक्षमीकरणासाठी सातत्याने विविध उपक्रम राबविण्यात येत असतात.

असाच एक अभिनव उपक्रम दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर राबविण्यात आलेला असून या अंतर्गत दिव्यांग विद्यार्थ्यांनी ईटीसी केंद्रात तसेच पालकांच्या मदतीने घरी बनविलेल्या दिवाळी सणामध्ये उपयोगी असणा-या वस्तूंचे प्रदर्शन महापालिका मुख्यालयात आणि ईटीसी केंद्रात आयोजित करण्यात आले होते. यामध्ये महापालिका अधिकारी, कर्मचारी तसेच मुख्यालयाला व केंद्राला कामानिमित्त भेट देणा-या नागरिकांनी मोठया संख्येने या प्रदर्शनाला भेट देत दिव्यांगांनी बनविलेल्या आकर्षक वस्तूंची प्रशंसा केली तसेच या वस्तूंची खरेदीही केली.

या प्रदर्शनाच्या ठिकाणी 20 नोव्हेंबर रोजी होत असलेल्या महाराष्ट्र विधानसभा निवडणूकीच्या अनुषंगाने स्वीप कार्यक्रमांतर्गत मतदार जनजागृती करणारे विविध संदेश असलेले फलक प्रदर्शित करण्यात आले होते. पालिकेच्या ईटीसी केंद्रामध्ये 15 ते 18 वयोगटातील दिव्यांग विद्यार्थ्यांनी पूर्व व्यावसायिक प्रशिक्षण दिले जात आहे. हे प्रशिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांच्या कौशल्याला वाव मिळावा व त्यांना स्वावलंबी होण्याच्या दृष्टीने प्रेरणा मिळावी या करिता प्रशिक्षण व रोजगार ही कार्यप्रणाली प्रभावीपणे राबविली जात आहे.

## रायगड किनारपट्टीवरील माशांमध्ये 35 टक्क्यांची घट

### मत्स्यप्रेमी, मच्छीमारांची चिंता वाढवणार

■ पनवेल

तुम्ही मत्स्यप्रेमी असाल तर ही बातमी तुमची चिंता वाढवणारी आहे. रायगड जिल्हा हा मासेमारीसाठी प्रसिद्ध आहे. इथल्या खाऱ्या माशांवर मत्स्यप्रेमी नेहमीच ताव मारतात. मात्र, 1990 च्या तुलनेत समुद्रातील माशांमध्ये तब्बल 35 टक्के घट झाली आहे. ही बाब कोळी-मच्छीमारांसाठी नक्कीच चिंतेची आहे. कारण मासेमारीसाठी खर्च वाढला आहे तर जाळयात कमी मासे सापडत आहेत. त्यामुळे मासेमारी करून आर्थिक गणिते साधता येत नाहीत, हे काही वर्षांपासून मच्छीमारांची मुलांच्याही लक्षात आले आहे.



त्यामुळे रायगड जिल्ह्यातील युवकांनी मत्स्यव्यवसायाकडे पाठ फिरवली आहे.

सागरी मत्स्य व्यवसाय नौका नयन व डिझेल इंजन देखभाल व परिचलन या मत्स्य व्यवसाय प्रशिक्षण केंद्रातर्फे देण्यात येणाऱ्या खलाशी प्रशिक्षणासाठी विद्यार्थी मिळणे अवघड झाले आहे. गेल्या पाच वर्षांत केवळ 110 तरुणांनी मत्स्य व्यवसाय प्रशिक्षण घेतलेले. गेल्या वर्षी तर अवघ्या 3 आणि यंदा फक्त 4 विद्यार्थ्यांनी प्रशिक्षण घेण्यात रस दाखवला आहे. यावरून मत्स्योद्योगाचे चित्र स्पष्ट होते. समुद्रातील मासेमारी हा रायगड किनारपट्टीवरील मुख्य व्यवसाय मात्र, दरवर्षी मच्छीचे प्रमाण घटत आहे. मत्स्य उत्पादनाची घटती संख्या पाहता आणखी पाच वर्षांची कोणती चित्र असेल याचा नुसता विचार केलेलाच बरा.

## मतदानाच्या जनजागृतीसाठी नवी मुंबईत सेल्फी पॉईंट

प्रतिनिधी
■ नवी मुंबई

20 नोव्हेंबर रोजी विधानसभा निवडणूकीत प्रत्येक मतदाराने भारतीय राज्यघटनेने दिलेला मतदानाचा अधिकार बजावावा याकरिता विविध माध्यमांतून जनजागृती करण्यात येत असून सध्याच्या सोशल मिडीयाप्रेमी युगात सेल्फी छायाचित्रांचे आकर्षण लक्षात घेऊन नवी मुंबई महानगरपालिकेने ठिकठिकाणी आकर्षक सेल्फी पॉईंट उभारले आहेत.





नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयातील सेल्फी पॉईंटवर आयुक्त तथा प्रशासक डॉ. कैलास शिंदे यांनी सेल्फी छायाचित्र काढून आपण मतदान करणार आहोत असे अधोरेखित करीत 20 नोव्हेंबर रोजी विधानसभा निवडणूकीत सर्वांनी मतदानाचा हक्क बजावावा असे आवाहन केले.

## डोंबिवली एमआयडीसीतील कावेरी चौकाला फेरीवाल्यांचा विळखा



प्रतिनिधी
■ डोंबिवली

येथील एमआयडीसीतील कावेरी चौकातील पदपथ, रस्ते अडवून उभारण्यात आलेल्या टपऱ्या, या चौकातील फेरीवाले आणि रस्त्याच्या दुतर्फा असलेली दुचाकी, चारचाकी वाहने यामुळे कावेरी चौक हा अपघात प्रवण क्षेत्र झाला आहे. दोन दिवसापूर्वी याच वर्दळीमुळे एका विद्यार्थ्याला या चौकात आपले प्राण गमवावे लागले. त्यामुळे कल्याण डोंबिवली पालिकने कावेरी चौकातील फेरीवाले आणि बेकायदा टपऱ्या हटविण्याची कारवाई प्राधान्याने करावी, अशी मागणी या भागातील जागरूक नागरिक, राजकीय पदाधिकाऱ्यांनी पालिका आयुक्तांसह ई प्रभागाच्या साहाय्यक आयुक्तांकडे केली आहे.

एमआयडीसीतील कावेरी चौक सर्वाधिक वर्दळीचा चौक म्हणून ओळखला जातो. या चौकाच्या परिसरात दोन शाळा आहेत. याठिकाणी विद्यार्थी, पालक, त्यांची वाहने, शाळेच्या बस यांची सतत वर्दळ असते. परिसरातील रहिवाशांना खरेदीसाठी हा चौक मध्यवर्ति ठिकाण असल्याने या चौकात सकाळपासून ते रात्री उशिरापर्यंत फेरीवाले रस्ते, पदपथ अडवून व्यवसाय करतात. अनेक नागरिक या चौकातील रस्त्याच्या दुतर्फा, पदपथालगत दुचाकी, चारचाकी वाहने उभी करून ठेवतात. अनेक टपऱ्या या भागात आहेत. या भागातून जाणाऱ्या पादचारी, वाहन चालकांना सकाळपासून ते रात्रीपर्यंत वाहतूक कोंडी, वर्दळीला तोंड देत जावे लागते. काही वर्षापासून हा त्रास स्थानिक रहिवाशांना परिसरातील शाळा व्यवस्थापनाला सहन करावा लागत आहे. दोन दिवसापूर्वी कावेरी चौकातून जात असलेल्या दोन विद्यार्थ्यांच्या दुचाकीला भरधाव वेगातील एका टेम्पो चालकाने धडक दिली.

## अमलीपदार्थांच्या व्यवसायासंदर्भात त्रिस्तरीय चौकशी समिती नेमण्याची 'धर्मराज्य'ची मागणी

प्रतिनिधी
■ ठाणे

गेल्या काही महिन्यांपासून, भारतात अमलीपदार्थांचा वापर मोठ्याप्रमाणात होताना दिसत आहे. देशभर पसरणारा व्यसनांच्या अजगराचा हा विळखा, तातडीने सोडविला गेला नाही तर, संपूर्ण तरुणपिढी आणि या देशाचं भवितव्य हा अजगर गिळंकृत करेल आणि व्यसनाधीन झालेल्या बेरोजगार तरुणांना गुलाम व गुन्हेगार बनण्यास किंवा बनविण्यास फार काळ लागणार नाही. भारताची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबई शहराची आणि उर्वरित महाराष्ट्राची परिस्थिती काही वेगळी नाही, किंबहुना अत्यंत चिंताजनक स्थिती या पुरोगामी राज्याची झालेली आहे. गेल्या आठवड्यात पुण्यात अमलीपदार्थाचे सेवन करुन, एका तरुणीवर अत्याचाराची घटना घडल्याने, अमलीपदार्थाचा मुद्दा 'उडता पंजाब'च्या धर्तीवर, पुन्हा एकदा ऐरणीवर आलेला असून, मुंबई-पुणे, नागपूर यांसारख्या मोठ्या शहरांतच नव्हे; तर, महाराष्ट्रातील छोटी शहरे व ग्रामीण भागांतदेखील अमलीपदार्थाच्या व्यवसायाने आपले जाळे भक्कमपणे विणायला सुरुवात केलेली आहे. अमलीपदार्थ सेवनाच्या माध्यमातून, मुंबई-महाराष्ट्रासह, संपूर्ण देशभरात गुन्हेगारी प्रवृत्तीत वाढ झाल्याच्या घटना सर्रास पाहायला मिळत आहेत. परिणामी, अमलीपदार्थांच्या व्यसनांचे प्रमाण, दिवसेंदिवस अधिकच उग्ररुप धारण करताना



दिसत आहे. याचा प्रतिकूल परिणाम, आगामी विधानसभा निवडणुकीवर होण्याची दाट शक्यता असल्याने, 'धर्मराज्य पक्षा'च्या वतीने, महाराष्ट्र राज्याचे मुख्य निवडणूक आयुक्त एस. चोक्कालिंघम यांना पत्र पाठवून, याप्रकरणी त्रिस्तरीय चौकशी समिती नेमण्याची करण्यात आली आहे.

दरम्यान, उपलब्ध गुन्ह्यांच्या (एफआरआय) आकडेवाडीनुसार, उत्तरप्रदेश आणि महाराष्ट्र ही राज्ये अमलीपदार्थाच्या सेवनात आघाडीवर आहेत. चिंताजनक बाब म्हणजे, मुंबई शहर हे, अमलीपदार्थाच्या सेवनात पहिल्या क्रमांकावर आहे. ही बाब प्रगत आणि पुरोगामी म्हणवून घेणाऱ्या महाराष्ट्रासाठी प्रचंड लाजिरवाणी आहे. राज्यातील तरुणपिढी अमलीपदार्थाच्या विळख्यात पुरती गुरफटून गेल्याचेच यातून अधोरेखित होत आहे. महत्त्वाची बाब म्हणजे, आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने हे प्रकरण अतिशय गंभीर आणि संवेदनशील बनलेले आहे. कारण, अमलीपदार्थाच्या पूर्णपणे आहारी गेलेल्या तरुणांना, काही गुन्हेगारी प्रवृत्तीची राजकीय मंडळी, आपल्या चुकीच्या कृत्यांसाठी या तरुणपिढीचा वापर करुन घेण्याची शक्यता नाकारता येत नाही. याचा मतदानावर विपरीत परिणाम होऊ शकतो. एकीकडे ऐन दिवाळीच्या तोंडावर, आगामी विधानसभा निवडणुकीच्या कामकाजासाठी, अन्न आणि औषध प्रशासन विभागाकडे पुरेसे मनुष्यबळ उपस्थित नसल्यामुळे, अन्नप्रक्रिया करणाऱ्या आस्थापनांची तपासणी थंडावली आहे; तर, दुसरीकडे मात्र, अमलीपदार्थविरोधी पथकाकडे पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध असतानाही, अवघ्या महाराष्ट्रभरात, अमलीपदार्थांचा बेसुमार वापर वाढीस लागून, व्यसनाधीनता मोठ्याप्रमाणात वाढलेली आहे.

## संदीप नाईकांच्या बंडामुळे महायुतीला डोकेदुखी

प्रतिनिधी
■ नवी मुंबई

बेलापूर मतदारसंघात भाजपचे जिल्हाध्यक्ष संदिप नाईक यांनी पक्षाला सोडचिठ्ठी देऊन निवडणुकीच्या रिंगणात उतरल्यामुळे महायुती अलर्ट मोडवर आली आहे. भाजपच्या आमदार मंदा म्हात्रे यांना निवडून आणण्याठी कुठल्याही प्रकारची हयगय होऊ नये, अशा सूचना महायुतीच्या नेत्यांनी दिल्या असल्याची चर्चा आहे.

बेलापूर मतदारसंघातून भाजपने विद्यमान आमदार मंदा म्हात्रे यांना पुन्हा उमेदवारी दिल्यामुळे जिल्हाध्यक्ष संदीप नाईक यांनी बंडाचे निशाण फडकावले आहे. संदीप नाईक यांनी मंगळवारी शरदपवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. नाईक आता महाआघाडीकडून निवडणूक लढणार आहेत. त्यामुळे येथे मंदा म्हात्रे विरुध्द संदीप नाईक अशी लढत होण्याची शक्यता आहे. बेलापूर विधानसभा मतदारसंघातुन शिंदेसेनेचे उपनेते विजय नहाटा यांनाही या मतदारसंघातुन तुतारी घ्यायची होती. मात्र संदीप नाईक यांनी 'तुतारी' घेतल्यामुळे सगळे राजकीय संदर्भ बदलले आहेत. त्यामुळे म्हात्रे यांना विजयी करण्यासाठी महायुतीचे नेते एकवटू लागले आहेत.

## 8 लाखाच्या हेरॉइनसह 12 लाखांचे मोबाइल हस्तगत

■ नवी मुंबई

अमली पदार्थ विक्रीसह मोबाइल चोरी करणाऱ्या टोळीतील चौघांना गुन्हे शाखा पोलिसांनी अटक केली असून त्यांच्याकडून ८ लाखाचे हेरॉइन व १२ लाखांचे मोबाइल जप्त केले आहेत. या आरोपींमध्ये तीन महिलांचा समावेश आहे. या कारवाई दरम्यान दोघे जण पळून गेले असून पोलिस त्यांचा शोध घेत आहे. अंमली पदार्थ विक्रीमध्ये सक्रिय असलेल्या टोळीबद्दल अमली पदार्थ विरोधी पथकाला माहिती मिळाली होती. त्यानुसार सहायक पोलिस आयुक्त भाऊसाहेब ढोले यांच्या सूचनेवरून वरिष्ठ निरीक्षक संदीप निगडे यांनी सहायक निरीक्षक श्रीकांत नायडू, नीलेश धुमाळ, ज्ञानेश्वर बनकर आदींचे पथक केले होते.

## दिवाळीसाठी नाशिक विभागाकडून जादा बससेवा

**नाशिक :** दिवाळीला सोमवारपासून सुरूवात होणार असून या कालावधीत प्रवाशांची होणारी गर्दी लक्षात घेता नाशिक राज्य परिवहन विभागाच्या वतीने पुणे, धुळे, नंदुरबार, छत्रपती संभाजी नगर, बोरिवली, कसारा मार्गावर अतिरिक्त फेऱ्यांचे नियोजन करण्यात आले आहे. पुण्यासाठी ३० हून अधिक, छत्रपती संभाजीनगरसाठी १० आणि धुळ्यासाठी २० हून अधिक फेऱ्या होणार आहेत.. विभागातंर्गत असलेल्या मालेगाव, सटाणा, मनमाड, नांदगाव, इगतपुरी, लासलगांव, कळवण, पेठ, पिंपळगाव या आगारांमार्फतही विविध मार्गावर अतिरिक्त फेऱ्या होणार आहेत. मालेगाव, सटाणा, येवलासाठी जादा बससेवेचे नियोजन आहे. महिला सन्मान योजनेतंर्गत महिलांसाठी राज्य परिवहन महामंडळाच्या वतीने सवलत दिली जात आहे. तसेच नाशिक-पुणे मार्गावर शिवशाही सेवा प्रकारातील अतिरिक्त फेऱ्या आरक्षणासाठी उपलब्ध केलेल्या आहेत. प्रवाशांनी या अतिरिक्त फेऱ्यांचा लाभ घ्यावा, असे आवाहन राज्य परिवहन महामंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.



# मुंबईतून पुण्यात आलेले 138 कोटींचे सोने जप्त

## पुण्यात नाकाबंदीदरम्यान पोलिसांनी केली कारवाई

**प्रतिनिधी**
**■ पुणे**

महाराष्ट्रात निवडणुकांचे बिगुल वाजला आहे. एकीकडे उमेदवारांच्या याद्या आणि प्रचार सुरु आहे. दुसरीकडे प्रशासनाकडून प्रत्येक हालाचालीवर लक्ष ठेवण्यात येत आहे. निवडणूक आयोग अन् पोलिसांची पथके सर्वत्र नाकाबंदी आणि तपासण्या करत आहेत. निवडणुकीमध्ये पैसे आणि गैरव्यवहार टाळण्यासाठी प्रशासनाकडून सुरू आहेत. दरम्यान दोन दिवसांपूर्वी पुणे शहरातील खेड-शिवापूर परिसरात एका गाडीतून जवळपास 5 कोटींची रोख रक्कम जप्त करण्यात आली होती. आता शुक्रवारी पुणे पोलिसांच्या नाकाबंदीत १३८ कोटींचे सोने पकडले गेले आहे. इतक्या मोठ्या प्रमाणावर सोने सापडल्यामुळे खळबळ माजली आहे.

पुणे शहरात नाक बंदी केली जात आहे. यावेळी सातारा रोडवर सहकार नगर येथे पोलिसांनी एमएच ०२ ईआर ८११२ टेम्पोची तपासणी केली. त्यामध्ये 138 कोटी रुपयांचे सोने सापडले. आता हे सोने कोणाचे आहे? ते सोने कोठून आले? हे सोने कुठे जात होते? त्याचा तपास पुणे पोलीस करत आहेत. पोलीस उपायुक्त स्मार्तना पाटील यांनी सांगितले की, आम्ही सध्या कागदपत्रे तपासत आहोत. सध्या आयकर विभाग आणि निवडणूक आयोग चौकशी करत आहे. चौकशी करून पुढील कारवाई केली जाईल

पोलिसांनी जप्त केलेले सोने हे खाजगी कंपनीच असल्याची माहिती मळत आहे. या सोन्याबाबत कागदपत्रे देण्यास ती कंपनी तयार आहे. हे सोने घेऊन टेम्पो मुंबईवरून पुण्यात आला होता. यावेळी निवडणुकीमुळे पुण्यात नाकाबंदी सुरु असताना त्यात सोने सापडले. आता आयकर विभाग आणि निवडणूक आयोगाला कागदपत्र कंपनीने मेले केले असल्याचे सांगण्यात येत आहे. हा टेम्पो एका खासगी लॉजिस्टिक कंपनीचा आहे.



याबाबत पुणे पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शुक्रवारी सकाळी ८ वाजण्याच्या सुमारास सातार रोडवर तपासणी सुरु होती. त्यावेळी टेम्पोमध्ये दागिणे असलेले पांढऱ्या पोत्यांमध्ये बॉक्स सापडले. पोलिसांनी सोने जप्त केले तसेच टेम्पो चालकाला ताब्यात घेतले.

निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जागोजागी पोलिसांकडून नाकाबंदी केली जाते. या नाकाबंदी दरम्यान पोलिसांना एका टेम्पोमध्ये तब्बल १३८ कोटी रुपयांचं सोनं आढळून आले. हा टेम्पो व्यापाऱ्याचा असून तो लॉजिस्टिक असल्याचं सांगितलं जात आहे. सध्या दिवाळीची लगबग सुरू आहे. या सणावेळी सोन्याला मोठी मागणी असते. त्यावेळी लॉजिस्टिक म्हणजेच गोडाऊनवरून सोनं व्यापाऱ्यांकडे नेलं जातं त्यामुळे हा टेम्पो व्यापाऱ्याचा आहे का? कोठून हा टेम्पो निघाला होता आणि कुठे जात होता याचा तपास केला जात आहे.आचारसंहिता काळात कुठलाही गैरव्यवाहार होऊ नयेत यासाठी पोलिसांकडून खबरदारी घेण्यात येत आहे.

# राजकारणातील सर्व पुतण्यांचा DNA सारखाच

## छगन भुजबळ यांची समीर भुजबळ यांच्यावर टीका

**प्रतिनिधी**
**■ नाशिक**

समीर भुजबळ यांनी नांदगाव - मनमाड विधानसभा मतदारसंघातून निवडणुकीच्या मैदानात उतरण्याची घोषणा केली आहे. यामुळे त्यांच्यावर महायुतीच्या विरोधात जाण्याचा आरोप होत असताना राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा मंत्री छगन भुजबळ यांनी त्यांच्यावर राजकारणातील सर्वच पुतण्यांचा डीएनए सारखाच असल्याची टीका केली आहे.

समीर भुजबळ यांनी गुरुवारी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेसच्या मुंबई अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. तसेच नांदगाव - मनमाड विधानसभा मतदारसंघातून अपक्ष म्हणून निवडणूक लढवण्याची घोषणा केली. या ठिकाणी महायुतीने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेचे विद्यमान आमदार सुहास कांदे यांना उमेदवारी दिली आहे. परिणामी, समीर यांच्या भूमिकेमुळे महायुतीच्या पोटात गोळा उठला आहे.

विशेष म्हणजे समीर यांच्या कृतीमागे छगन भुजबळ यांचा हात असल्याचाही आरोप केला जात आहे. पण भुजबळ यांनी शुक्रवारी हा आरोप फेटाळला. तसेच राजकारणात सक्रिय असणाऱ्या पुतण्यांचा उल्लेख करत या सर्वांचा डीएनए एकच असल्याचा दावा करत समीर यांच्यावर निशाणा साधला.

छगन भुजबळ शुक्रवारी पत्रकारांशी बोलताना म्हणाले, राजकारणात असणाऱ्या सर्वच पुतण्यांचा डीएनए एकसारखाच आहे असे मला वाटत आहे. शरद पवार यांचा पुतण्या, अजित पवारांचा पुतण्या, बाळासाहेब ठाकरे यांचा पुतण्या अशी अनेक पुतणे कंपनी आहे. हे सर्वचजण काकांचे ऐकतात असे वाटत नाही. त्यामुळे राजकारणातील सर्वच पुतण्यांचा एक वेगळाच डीएनए आहे.

# वरणगाव ऑर्डनन्स फॅक्टरीमधून पाच रायफलींची चोरी, जळगावातील घटना

**प्रतिनिधी**
**■ जळगाव**

जिल्ह्यातील वरणगाव ऑर्डनन्स फॅक्टरीमधून 5 अत्याधुनिक रायफल्स चोरीला गेल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी वरणगाव पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यामुळे जळगावात एकच खळबळ उडाली आहे.




पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, वरणगाव ऑर्डनन्स फॅक्टरीमधून देशाच्या लष्करासाठी एके 47 रायफलच्या गोळया (काडतूस) तयार केल्या जातात. या गोळया तयार झाल्यानंतर सिमेवर पाठवण्याआधी त्यांची निर्माणी परिसरातच एके 47 या रायफलद्वारे चाचणी घेतली जाते. या चाचणीसाठी वापरल्या जाणाऱ्या पाच रायफलींची निर्माणीच्या शस्त्रागाराचे कुलूप तोडून चोरी झाल्याची घटना समोर आली आहे. ही घटना 19 ऑक्टोबर ते 21 ऑक्टोबर दरम्यान घडल्याची माहिती पोलीस सूत्रांकडून मिळत आहे. अज्ञात व्यक्तीने तीन एके-47 रायफल आणि दोन 5.56 गॅलील एस रायफल अशा पाच रायफल चोरल्याची माहिती मिळत आहे. घटनेची माहिती मिळताच आयुध निर्माणी प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी परिसरात तपासणी केली.

## कारमध्ये पुन्हा सापडली ६३ लाखांची रोकड

**जळगाव ।** विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने पोलिसांकडून नाकाबंदी करत वाहनांची तपासणी केली जात आहे. या तपासणी दरम्यान दोन दिवसांपूर्वीच अमळनेर तालुक्यात कोटीची रोकड सापडली होती. यानंतर जळगाव शहरातील आकाशवाणी चौकात पोलिसांकडून सुरु असलेल्या तपासणीत कारमध्ये ६३ लाखांची रोकड सापडून आली आहे. विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता जाहीर झाल्यानंतर पोलीस प्रशासन सज्ज झाले आहे. दरम्यान पोलिसांकडून सीमावर्ती भागात नाकाबंदी करत वाहनांची कसून तपासणी केली जात आहे. याच नाकाबंदी दरम्यान जळगाव तालुक्यातील कासोदा येथे दीड कोटी रुपये तर अमळनेर तालुक्यातील चोपडाई येथे १६ लाख ३८ हजार रुपये सापडून आले होते. यानंतर पुन्हा एकदा जळगाव शहरात ६३ लाखांची रोकड सापडून आल्याने जळगावात खळबळ उडाली आहे. जळगाव शहरातील आकाशवाणी चौकात पोलिसांनी केलेल्या नाकाबंदी दरम्यान रोखण्यात आलेल्या एका कारमध्ये रोकड आढळून आली आहे. पोलिसांनी हि रोकड जप्त करून मुद्देमाल जमा करण्यात आली आहे.

# वसमत तालुक्यात पुन्हा भूकंपाचा सौम्य धक्का; लोकांमध्ये भीतीचं वातावरण

**प्रतिनिधी**
**■ हिंगोली**

वसमत तालुक्यातील पांगरा शिंदेसह काही गावांमध्ये २५ ऑक्टोबर रोजी रात्री ८:३४ वाजण्याच्या सुमारास भूकंपाचा सौम्य धक्का जाणवला. तालुक्यात मागील काही दिवसांपासून भूकंपाचे सौम्य धक्के सातत्याने जाणवत आहेत.

२२ ऑक्टोबर रोजी सकाळी वसमत, औंढा नागनाथ, कळमनुरी या तालुक्यातील अनेक गावांत भूकंपाचा धक्का जाणवला होता. त्यावेळी नांदेड जिल्ह्यातील हदगाव येथे केंद्रबिंदू नोंद झाला होता. २५ ऑक्टोबर रोजी रात्री ८:३४ वाजता भूगर्भातून आवाज येत जमीन हादरली आहे. या भुकंपाचा धक्का



तालुक्यातील पांगरा शिंदे, कुरुंदा,वापटी ,कुपटी,सिरळी,खांबाळा आदी गावांना बसला आहे. जमीन हादरताच नागरिक घराबाहेर पडले. हा धक्का तिव्रतेचा नव्हता. मात्र सतत भूकंपाचे धक्के जाणवत असल्याने नागरिकांत भीती वाढत आहे. चार दिवसांत दोन वेळेस भुकंपाचा धक्का बसला आहे.

## पिंपळनेरकरांचा मतदानावर बहिष्कार

### महामार्ग दुरुस्तीसाठी एकमताने ठराव



**प्रतिनिधी**
**■ धुळे**

साक्री तालुक्यातील पिंपळनेर शहर व परिसरातील नागरिकांनी येणाऱ्या विधानसभेच्या निवडणुकीला मतदानावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला आहे. झोपलेल्या प्रशासनास जागरुक करण्यासाठी हा ऐतिहासिक निर्णयावर पिंपळनेरकर ठाम असल्याचे ग्रामस्थांनी स्पष्ट केले आहे.

गेल्या पाच वर्षांपासून पिंपळनेर शहरातील राष्ट्रीय महामार्ग ७५५ जी या मुख्य रस्त्याचे काम प्रलंबित आहे. रस्त्यात मोठ मोठे खड्डे पडले असल्याने गेले कित्येक महिन्यांपासून या रस्त्याची दुरावस्था कायम आहे. रस्त्याच्या दुरुस्तीसाठी ग्रामस्थांतर्फे वारंवार रस्ता सुधारण्याची मागणी करण्यात येत असताना देखील प्रशासन याकडे दुर्लक्ष करत आले आहे. यामुळे पिंपळनेरकरांनी अखेर यासंदर्भात ठोस निर्णय घेण्याचे ठरविले. राष्ट्रीय महामार्ग संदर्भात वारंवार मागणी केल्यानंतर देखील प्रशासन दुरुस्तीकडे दुर्लक्ष करत आले आहे. यामुळे विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने ठोस पाऊल उचलण्याचा निर्णय शहरातील नागरिकांनी घेतला आहे. सर्वांनी एकत्र येत आगामी विधानसभा निवडणुकीच्या मतदानावर बहिष्कार टाकण्याचा ठराव एकमताने करीत हा निर्णय घेतला आहे.

## तिकिटासाठी आमदारांना फोन करणाऱ्यांना अटक

**नाशिक ।** भाजपाचे विद्यमान आमदारसह राज्यातील इतर आमदारांना विधानसभेची उमेदवारी पाहिजे असेल तर ५० लाख रुपयांची मागणी करण्यात आली होती. पैशांची मागणी करणाऱ्या दोघेही महाविद्यालयीन तरुण नाशिक पोलिसांनी ताब्यात घेतले आहेत. सध्या महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीचे बिगुल वाजले आहे. सगळ्याच पक्षातून इच्छुकांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. याचाच फायदा घेत दोघेही महाविद्यालयीन तरुणांनी सत्ताधारी पक्षाचे नाशिकचे विद्यमान आमदार यांना आम्ही पीएमओ कार्यालयातून बोलतो आहे. तुम्हाला जर उमेदवारी पाहिजे असेल तर ५० लाख रुपये द्यावे लागतील; असे दूरध्वनी वरून सांगण्यात आले. मात्र विद्यमान आमदारांना शंका आल्याने त्यांनी या संदर्भात नाशिकच्या सरकार वडा पोलीस ठाण्यात अज्ञात विरोधात तक्रार दिली होती.

# मुश्रीफ-घाटगे कार्यकर्त्यांमध्ये 'फ्री स्टाइल' हाणामारी अन् दगडफेक

**प्रतिनिधी**
**■ कोल्हापूर**

कोल्हापूर जिल्ह्यातील कागल विधानसभा मतदारसंघात वादाची पहिली ठिणगी पडली आहे. पारंपारिक कट्टर विरोधक पालकमंत्री हसन मुश्रीफ आणि समरजीत घाटगे यांचे कार्यकर्ते एकमेकांना भिडले आहेत. एका कार्यक्रमात हा प्रकार घडला. दोन्ही गटांच्या कार्यकर्त्यांकडून एकमेकांवर दगडफेक करण्यात आली आहे.

आतापासूनच कागलच राजकारण पेटले आहे. दरम्यान, घटनास्थळी उपस्थित असणाऱ्या इतर कार्यकर्त्यांनी या दोघा गटातील कार्यकर्त्यांना शांत करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे घडलेल्या प्रकारानंतर कागलमधील कैदी चौकातील वातावरण काही काळ तणावपूर्ण बनले होते.





संपूर्ण राज्याचं आणि कोल्हापूर जिल्ह्याचं लक्ष लागून राहिलेल्या कागल विधानसभा मतदारसंघातील लढत पहिल्यापासूनच हाय व्होल्टेज होत असताना पाहायला मिळत आहे. पालकमंत्री हसन मुश्रीफ हे महायुतीचे उमेदवार आहेत. तर महाविकास आघाडी कडून समरजीत घाटगे हे निवडणुकीला सामोरे जात आहेत.

पारंपारिक राजकीय कट्टर विरोधक असलेल्या या लढतीत पहिल्यापासूनच राजकीय टीकाटिप्पणी आणि आरोप प्रत्यारोपाने गाजत आहे. असेच चित्र मतदार संघात असताना आज पहिली ठिणगी याच मतदारसंघातून पडली आहे.कागल विधानसभा मतदारसंघातील निवडणूक प्रचार हा मुद्द्यांवरुन गुद्द्यांपर्यंत पोहोचल्याचं पाहायला मिळत आहे. कारण मुश्रीफ आणि घाटगे गटाच्या कार्यकर्त्यांमध्ये वाद निर्माण होऊन तो हाणामारीपर्यंत पोहोचला. इतकंच नव्हे तर दोन्ही गटांकडून दगडफेक करण्यात आली.

# विश्वासात न घेतल्याने ठाकरे गटाचे नेते नाराज

## बंडखोरी करत अपक्ष उमेदवारी

**प्रतिनिधी**
**■ धुळे**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटातर्फे तिकीट न मिळाल्याने धुळे शहराचे उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना जिल्हाप्रमुख सुशील महाजन बंडखोरीच्या तयारीत असल्याची आहेत. सोमवारी ते विधानसभा निवडणुकीसाठी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल करण्याची घोषणा त्यांनी आज केली आहे.

जोरदार तयारी सुरु आहे. राजकीय पक्ष उमेदवार निश्चित करण्यात लागले आहे. आता बहुतांश ठिकाणी उमेदवारी निश्चित करण्यात आलेली आहे. यासोबतच नाराजीनाट्य देखील समोर येत आहेत. अशाच प्रकारे धुळ्यात ठाकरे गटात नाराजी उफाळून आली आहे. उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेत अनेक कार्यकर्त्यांनी निवडणूक लढवण्याची इच्छा व्यक्त



केली होती. पण माजी आमदार अनिल गोटे यांनी पक्ष प्रवेश केल्यानंतर त्यांना उमेदवारी देण्यात आली आहे. यामुळे ठाकरे गटात नाराजी पसरली आहे. अनिल गोटे यांनी मातोश्रीवर उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश करुन एबी फॉर्म मिळवला. त्यामुळे माझ्यासह अनेक कार्यकर्त्यांमध्ये असंतोष निर्माण झाल्याची भावना जिल्हा प्रमुख सुशील महाजन यांनी व्यक्त केली आहे. हे लक्षात घेऊन आपण अपक्ष उमेदवारी करण्याचा निर्णय घेतला असल्याने देखिल महाजन यांनी स्पष्ट केले आहे.

# विधानसभेतील लीडबाबत उपमुख्यमंत्र्यांचे नरो वा कुंजरो वा!

## लोकसभेत चुकलेल्या गणितामुळे फडणवीसांचा सावध पवित्रा

**प्रतिनिधी**
**■ नागपूर**

लोकसभा निवडणुकीत भाजपचे दावे फसले होते. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी पाच लाखांचं लीड मिळेल असा दावा केला होता. मात्र, प्रत्यक्षात दीड लाखांच्या लीडचा आकडाही त्यांना गाठता आला नाही. हे बघता भाजपने विधानसभेच्या निवडणुकीत सावध पवित्रा घेतल्याचं दिसत आहे. त्यामुळे देवेंद्र फडणवीस यांनीसुद्धा या निवडणुकीत किती लीड असणार हे सांगणं टाळलं आहे.

फडणवीस म्हणाले, "लीड सांगणार नाही, मात्र जनतेचा आशीर्वाद माझ्यासोबत आहे. मी निवडून येणार याचा विश्वास आहे." फडणवीस यांनी आपल्या दक्षिण-पश्चिम नागपूर विधानसभा मतदारसंघातून गुलाबी जॅकट घालून उमेवादीर अर्ज दाखल केला. यावेळी ते म्हणाले, आमच्या सरकारच्या



काळात महाराष्ट्राची प्रचंड प्रगती झाली असल्याने पुन्हा महायुतीचेच सरकार राज्यात येणार असल्याचा दावा त्यांनी केला. तर गुलाबी जॅकेटबाबत बोलताना ते म्हणाले, "यामागे काही कुठला अजेंडा नाही. मी वेगवेगळ्या रंगाचे जॅकेट नेहमच घालतो. माझ्या मनातला रंग भगवा असला तरी मला सर्वच रंग भावतात." काँग्रेसेच प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी राहुल गांधी, पंडित नेहरू, इंदिरा गांधी यांची भूमिका ठेवणे आवश्यक आहे. ते त्यांच्या पक्षाचे प्रमुख नेते होते. म्हणूनच ते राहूल गांधी यांच्या आरक्षणाच्या भूमिकेचे समर्थन करतात. मात्र, जो पर्यंत भारताचे संविधान आहे आणि भाजप आहे. तोपर्यंत आरक्षणाला कोणी हात लावू शकत नाही. नाना पटोले यांनी राहूल गांधी यांचं अंध समर्थन करावे कारण त्यांचे भवितव्य त्यांच्यावर अवलंबून आहे. मात्र त्यांनी आपले विचार आमच्यावर लादू नये. आम्हाला आमच्या लाडक्या बहिणी भरभरून प्रेम देतात, असं म्हणत त्यांनी पटोलेंवर निशाणा साधला.

## बेपत्ता अंगणवाडी सेविकेचा नदीमध्ये आढळून आला मृतदेह

**प्रतिनिधी**
**■ अहिल्यानगर**

अहिल्यानगरमधून एक धक्कादायक बातमी समोर येत आहे. येथे एक अंगणवाडी सेविका बेपत्ता झाल्याचा प्रकार समोर आला होता. आता पोलिस तपासात हादरवणारी बातमी समोर आली आहे. यामुळे आजुबाजूच्या गावामध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. काय घडलाय नेमका प्रकार? सविस्तर जाणून घेऊया.

अहिल्या नगरच्या चिचोंडी पाटील येथील मारुतीवाडी परिसरातून एक अंगणवाडी सेविका बेपत्ता झाली होती. यासंदर्भात पोलिस स्थानकात तक्रार करण्यात आली होती. तिचे सहकर्मचारी, शेजारी यांच्याकडे विचारपूस सुरु होती. दरम्यान या बेपत्ता अंगणवाडी सेविकेचा खून झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. उमा पवार असं मृत्यू झालेल्या अंगणवाडी सेविकेचे नाव आहे.

उमा पवार या कालपासून बेपत्ता होत्या. यानंतर नातेवाईकांनी परिसरात आणि अंगणवाडीमध्ये शोध सुरु केला. त्यावेळी अंगणवाडीमध्ये कोणाच्या तरी रक्ताचे डाग आणि फरफटत नेल्याच्या खुणा आढळून आल्या होत्या. यानंतर तिचा खून झालाय का? असा पोलिसांना संशय आला. पोलिसांनी त्यापद्धतीने तपास सुरु केला.

आजुबाजूला शोध घेतला गेला. यानंतर उमा पवार यांचा मृतदेह बाजूच्याच नदीमध्ये आढळून आला.या घटनेमुळे चिचोंडी पाटील आणि परिसरात खळबळ उडाली आहे. दरम्यान नगर तालुका पोलीस घटनास्थळी पोहोचले असून या अंगणवाडी सेविकेची हत्या कोणी आणि कशासाठी केली? याचा तपास केला जात आहेत.

रमा पाटील यांचा मृतदेह शवविच्छादनासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात पाठवण्यात आला आहे. हा तपासणी अहवाल आल्यानंतर आणखी कलम वाढण्याची शक्यता आहे. याप्रकरणी पोलिसांनी एका संशयिताला ताब्यात घेतल्याची माहिती देण्यात आली आहे.

## मावळमध्ये 18 लाखांची रोकड जप्त

**■ पिंपरी**

निवडणुकीची आचारसंहिता लागू झाल्याने मावळ विधानसभा मतदारसंघात विविध ठिकाणी पथकांकडून वाहनांची तपासणी केली जात आहे. मावळ येथील शिरगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत उर्से टोल नाका परिसरात स्थिर सर्वेक्षण पथकाने कारमधून १७ लाख ७५ हजारांची रोकड जप्त केली.

कारचालक पियुष जखोडीया (वय ३४) यांना ताब्यात घेतले. मावळ येथील शिरगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत उर्से टोलनाका येथे खोपोलीकडून पुण्याकडे जात असलेल्या मोटारीची तपासणी केली. त्यावेळी मोटारीत रोकड सापडली. चालकाकडे चौकशी केली असता त्यांचा कापड व्यवसाय असून ते पुण्यात दिवाळी करता खरेदीस जात असल्याचे सांगितले.

# रत्नागिरीत डंपरने दुचाकीला उडविले

## दोघांचा जागीच मृत्यू

**प्रतिनिधी**
**■ रत्नागिरी**

रत्नागिरीतील मिऱ्या नागपूर महामार्गावरील टीआरपी पेट्रोल पंपाजवळ शुक्रवार २५ ऑक्टोबरला सकाळी नऊ वाजता भीषण अपघात झाला. डंपरने दुचाकीवरून जाणाऱ्या दोन जणांना चिरडल्याने दोघांचा जागीच मृत्यू झाला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मुक्तेश्वर सहदेव ठीक (वय ५८, रा. प्रशांतनगर रत्नागिरी) व राघो कृष्णा धुरी (वय ६७, रा. साईनगर रत्नागिरी) अशी दोघांची नावे आहेत.

रत्नागिरी ते हातखंबा मार्गावर दिवस-रात्र चौपदरीकरणाचे काम सुरू असल्याने सर्वच भागातील रस्ते



एकाच वेळी खोदल्याने रस्त्यावरील प्रवास वाहनचालकांसाठी जीवघेणा ठरत आहे. या मार्गावर वांरवार अपघात होण्याचे प्रमाण वाढतच आहे. रत्नागिरीतील एका खाजगी व्यवसायिकाचा डंपरने (क्रमांक एमएच ०८ एच २२९९) खोदलेल्या रस्त्यावर दुचाकीला धडक दिली. या अपघातात दुचाकी चालक राघो धुरी यांच्या डोक्यावरून डंपरचा टायर गेल्याने डोक्याचा पूर्णतः चेंदामेंदा झाला. तर मागे बसलेल्या मुक्तेश्वर ठीक यांच्याही डोक्याला जबर मार लागला. यात दोघांचाही जागीच दुर्दैवी मृत्यू झाला. या अपघाताची पोलिसांना माहिती मिळताच घटनास्थळी पोलीस कर्मचारी पोहचून पंचनामा केला. त्यानंतर रुग्णवाहिकेतून दोघांचेही मृतदेह रत्नागिरी शासकीय रुग्णालयात आणण्यात आले आहे.

## जागतिक कुस्ती स्पर्धेमधून भारताची माघार

**नवी दिल्ली :** भारतातील कुस्ती या खेळाशी संबंधित असलेला वाद मिटता मिटेना. भारतीय कुस्ती संघटनेच्या कामकाजात केंद्रीय क्रीडा मंत्रालयाचा हस्तक्षेप असल्याचे कारण पुढे करीत भारतीय कुस्ती संघटनेने अल्बानिया येथे २८ ऑक्टोबरपासून सुरू होत असलेल्या जागतिक अजिंक्यपद स्पर्धेमधून माघार घेतली आहे. अल्बानिया येथे २८ ऑक्टोबरपासून वरिष्ठांच्या जागतिक अजिंक्यपद स्पर्धेला सुरुवात होत आहे. या स्पर्धेमध्ये ऑलिंपिकमध्ये नसलेल्या १२ प्रकारांचा समावेश असणार आहे. भारतीय कुस्ती संघटनेकडून जागतिक अजिंक्यपद स्पर्धा व २३ वर्षांखालील स्पर्धा या दोन्हीसाठी निवड चाचणीचे आयोजन करण्यात आले होते.जागतिक कुस्ती स्पर्धेसाठी भारतीय कुस्ती संघ निवडण्यातही आला, मात्र साक्षी मलिक हिचा पती सत्यवर्त कडियन याने भारतीय कुस्ती संघटनेविरोधात न्यायालयात धाव घेतली. न्यायालयाकडून जागतिक स्पर्धेत सहभाग न घेण्याचा आदेश देण्यात आला.



### फिरकीवीर सँटनरची 'विकेट सप्तमी'

# फिरकीसमोर भारतीय वाघांचे झाले मांजर; पहिला डाव 156 धावांतच गडगडला

### न्यूझीलंडला दुसऱ्या दिवस अखेर ३०१ धावांची मोठी आघाडी



**प्रतिनिधी**
■ **पुणे**

भारताने दुसरा कसोटी सामना जिंकण्यासाठी न्यूझीलंडला फिरकीच्या जाळ्यात अडकवण्याचा प्रयत्न केला होता. पण भारताचा संघ स्वत:च या फिरकीच्या जाळ्यात अडकल्याचे सामन्याच्या दुसऱ्या दिवशी पाहायला मिळाले. कारण भारताला पहिला डाव फक्त १५६ धावांतच ऑल आऊट झाला आणि न्यूझीलंडला आघाडी मिळवता आली. त्यानंतर न्यूझीलंडने टॉम लॅथमच्या दमदार खेळीच्या जोरावर ५ बाद १९८ अशी मजल मारली आहे. त्यामुळे दुसऱ्या दिवस अखेर न्यूझीलंडच्या संघाकडे ३०१ धावांची आघाडी असून भारतावर आलेली मोठी नामुष्की आहे.सँटनरच्या फिरकीसमोर भारतीय वाघ अक्षरशः मांजर ठरले. त्यामुळे दुसऱ्या कसोटी पराभवासह मायदेशातील मालिका गमावण्याची नामुष्की बलाढ्य टीम इंडियावर येऊ शकते अशी तूर्तास परिस्थिती आहे.

भारताने १ बाद १६ या धावसंख्येवरून दुसऱ्या दिवसाची सुरुवात केली. यशस्वी जयस्वाल आणि शुभमन गिल यांनी दिवसाची चांगली सुरुवात केली. पण या दोघानांही स्थिरस्थावर झाल्यावर मोठी खेळी साकारण्यात अपयश आले. शुभमन गिल ३० धावांवर बाद झाला आणि भारताला पहिला धक्का बसला. गिल बाद झाल्यावर विराट फलंदाजीला आला. विराटने गेल्या सामन्यात चांगल्या धावा केल्या होत्या, त्यामुळे त्याच्याकडून सर्वांनाच मोठ्या अपेक्षा होत्या. पण मिचेल सँटनरच्या गोलंदाजीवर तो क्लीन बोल्ड झाला आणि पुन्हा एकदा अपयशाच्या चक्रात अडकला.

विराट बाद झाल्यावर ठराविक फरकाने यशस्वी, ऋषभ पंत आणि सर्फराझ खान हे बाद झाले. त्यामुळे भारताची ९ बाद ९५ अशी दयनीय अवस्था झाली होती. पण त्यावेळी रवींद्र जडेजा भारताच्या मदतीला धावून आला. जाडेजाने यावेळी ३८ धावा केल्या आणि त्यामुळेच भारताला दिडशे धावांचा पल्ला तरी गाठता आला. पहिल्या दिवशी वॉशिंग्टन सुंदरने सात बळी मिळवले होते, तर दुसऱ्या दिवशी न्यूझीलंडचा फिरकीपटू मिचेल सँटनरने सात विकेट्स मिळवत त्याची परतफेड केल्याचे पाहायला मिळाले.

# माझगाव डॉक लिमिटेडच्या 250व्या स्थापनादिनानिमित्त येत्या 15 डिसेंबरला मुंबईत रंगणार 'माझगाव मुंबई मॅरेथॉन'

### एकूण पाच लाखांची रोख पारितोषिके; यंदा ६ हजार धावपटूंच्या सहभागाचे लक्ष्य

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

सागरी संरक्षण क्षेत्रात देशासाठी अनेक स्वदेशी युद्धनौका आणि पाणबुड्यांची निर्मिती करणाऱ्या माझगाव डॉक शिपबिल्डर्स लिमिटेड (एमडीएल) हा सरकारी उद्योग यंदा आपला २५०वा स्थापनादिन साजरा करणार आहे. त्यानिमित्ताने एमडीएलने १५ डिसेम्बर रोजी माझगाव मुंबई १० के चॅलेंज रन मॅरॅथॉनचे आयोजन केले आहे. देशाच्या संरक्षणासोबतच देशवासीयांना फिटनेसबाबत सहकार्य करणे हा या मॅरॅथॉनचा प्रमुख उद्देश असल्याचे माझगाव डॉकचे मुख्य व्यवस्थापकीय संचालक संजीव सिंघल यांनी सांगितले.

माझगाव डॉक लिमिटेडने यंदा आपल्या २५०व्या स्थापनादिनानिमित्त भव्य माझगाव मुंबई १० के चॅलेंज रनचे आयोजन १५ डिसेंबर २०२४ रोजी मुंबईच्या आझाद मैदानापासून केले आहे. या मॅरॅथॉनमध्ये महिला आणि पुरुष गटातून विविध ५ वयोगटातून सुमारे ६ हजार धावपटू सहभागी होतील असा विश्वास माझगाव मुंबई चॅलेंज रन संयोजकांनी व्यक्त केला आहे. स्पर्धेत सहभागी होणाऱ्या विजेत्या धावपटूंना एकुण ५ लाख रुयांची रोख पारितोषिके आणि मेडल्स देण्यात येणार आहेत.

शुक्रवारी माझगाव डॉकच्या सभागृहात एमडीएलचे मुख्य व्यवस्थापकीय संचालक संजीव सिंघल,शिप बिल्डिंग विभागाचे संचालक बिजू जॉर्ज ,कॉर्पोरेट आणि पर्सोनेल विभागाचे संचालक कमांडर वासुदेव पुराणिक आणि माझगाव डॉकचे मुख्य व्हिझीलंस अधिकारी हरिनारायण जांगीड यांच्या उपस्थितीत माझगाव मुंबई १०के चॅलेंज रनसाठीची ट्रॉफी ,टी शर्ट ,जॅकेट आणि मेडल्सचे अनावरण करण्यात आले. या रनमधील १६ ते २९ वर्षे वयोगटातील पुरुष अंडी महिला विजेत्यास प्रत्येकी ५० हजार रुपयांचे पारितोषिक देण्यात येणार आहेत.



फोटो : अनिल पानस्कर


***शर्यत पूर्ण करणाऱ्या धावपटूंना आकर्षक भेट***

*माझगाव मुंबई चॅलेंज रन पूर्ण करणाऱ्या प्रत्येक धावपटूस एका गुडी बॅगसह १ आकर्षक टी शर्ट ,स्पर्धा पूर्ण केल्याबद्दल मेडल ,१० के शर्यतीत सहभागी स्पर्धकांना टाईमिंग चिप्स,स्पर्धा पूर्ण केल्यानंतर नाश्ता आणि १ इ छायाचित्र अशी आकर्षक भेट देण्यात येणार असल्याचे संयोजकांनी जाहीर केले. माझगाव मुंबई चॅलेंज रनमध्ये सहभागी होऊ इच्छिणाऱ्या स्पर्धकांनी www.mazdock10k.com या वेबसाईटवर संपर्क साधून आपला सहभाग निश्चित करावा असे आवाहन माझगाव डॉक शिपबिल्डर्स लिमिटेडने केले आहे.*

# वॉर्नरच्या कर्णधारपदावरील आजीवन बंदी उठवली

### 2018 मध्ये बॉल टॅम्परिंगमध्ये दोषी आढळला होता

**वृत्तसंस्था**
■ **मेलबर्न**



ऑस्ट्रेलियाचा सलामीवीर डेव्हिड वॉर्नरवर कर्णधारपदावरून घातलेली आजीवन बंदी उठवण्यात आली आहे. २०१८ मध्ये वॉर्नरला क्रिकेट ऑस्ट्रेलियाने ऑस्ट्रेलियातील कोणत्याही संघाचे नेतृत्व करण्यास आजीवन बंदी घातली होती. आता क्रिकेट ऑस्ट्रेलियाच्या आचार आयोगाने निर्णयाचा आढावा घेतल्यानंतर वॉर्नरवरील बंदी उठवण्याचा निर्णय घेतला आहे.

बंदी उठल्यानंतर, पुढील बीबीएल मोसमात सिडनी थंडरचे कर्णधारपद भूषवण्याची शक्यता वर्तवली जात आहे. २०१८ मध्ये दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या कसोटी सामन्यात बॉल टॅम्परिंग केल्याप्रकरणी डेव्हिड वॉर्नरवर ही बंदी घालण्यात आली होती. वॉर्नरशिवाय स्टीव्ह स्मिथ आणि कॅमेरून बॅनक्रॉफ्ट हेही बॉल टॅम्परिंग प्रकरणात दोषी आढळले होते, ज्यांना क्रिकेटमधून एक वर्षाची बंदी घालण्यात आली होती.

***क्रिकेट ऑस्ट्रेलियाने आपला निर्णय मागे घेतला***

*डेव्हिड वॉर्नरवर बंदी घातल्यानंतर सहा वर्षांनी क्रिकेट ऑस्ट्रेलियाने आपला निर्णय मागे घेतला आहे. याबाबत क्रिकेट ऑस्ट्रेलियाने एक प्रेस पत्रक जारी केले आहे,ज्यामध्ये असे सांगण्यात आले की २५ ऑक्टोबर रोजी आचार आयोगाच्या ३ सदस्यीय पॅनेलने वॉर्नरवर लादलेली आजीवन नेतृत्व बंदी उठवण्याचा निर्णय घेतला. २०२२ साली ऑस्ट्रेलियन क्रिकेटच्या आचारसंहितेत केलेल्या बदलांनुसार वॉर्नर बंदी उठवण्याच्या नियमांची पूर्तता करत असल्याचे पॅनेलला आढळले.*


# माजी हॉकी कर्णधार राणी रामपालची निवृत्ती

### २५४ सामन्यात २०५ गोल केले

**वृत्तसंस्था**
■ **नवी दिल्ली**

भारतीय महिला हॉकी संघाची माजी कर्णधार राणी रामपाल हिने गुरुवारी निवृत्ती जाहीर केली. यासह तिच्या १६ वर्षांची कारकीर्द संपुष्टात आली.

२००८ मध्ये वयाच्या १४ व्या वर्षी ऑलिम्पिक पात्रता फेरीत पदार्पण करणाऱ्या राणीने भारतासाठी २५४ सामन्यांमध्ये २०५ गोल केले. राणी हरियाणाची रहिवासी आहे. राणीने पत्रकार परिषदेत पत्रकारांना सांगितले की,



“हा एक अद्भुत प्रवास होता. मी भारतासाठी इतके दिवस खेळेन असे कधीच वाटले नव्हते. मी लहानपणापासून खूप गरिबी पाहिली आहे पण माझे लक्ष नेहमीच देशाचे प्रतिनिधित्व करण्यावर होते.

राणीच्या नेतृत्वाखाली, भारतीय महिला हॉकी संघाने टोकियो ऑलिम्पिक २०२० मध्ये ऐतिहासिक चौथे स्थान मिळवले, जे संघाचे आतापर्यंतचे सर्वोच्च ऑलिम्पिक रँकिंग आहे. याशिवाय, तिने अनेक मोठ्या विजयांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावली आहे, ज्यात २०१७ महिला आशियाई चषकातील रौप्य पदक आणि २०१८ आशियाई क्रीडा स्पर्धेत रौप्य पदक यांचा समावेश आहे.

# ऑस्ट्रेलिया दौऱ्यापूर्वी शमी एका मालिकेत खेळणार

### ऑस्ट्रेलिया दौऱ्यात सहभागी होणार

**वृत्तसंस्था**
■ **नवी दिल्ली**

पाहुण्या न्यूझीलंडविरुद्ध टीम इंडिया मोठ्या संकटात असताना भारताचा वेगवान गोलंदाज मोहम्मद शमी याच्या कमबॅकबाबत मोठी अपडेट समोर आली आहे. मोहम्मद शमीने २०२३ च्या वनडे वर्ल्ड कपनंतर एकही आंतरराष्ट्रीय सामना खेळलेला नाही.एका इंग्रजी वृत्तपत्राच्या वृत्तानुसार मोहम्मद शमीचे मैदानावर लवकरच पुनरागमन होईल. सध्या सुरु असलेल्या रणजी स्पर्धेत मोहम्मद



शमी बंगालकडून दोन मॅच खेळू शकतो. त्या मॅचमधील शमीच्या कामगिरीच्या जोरावर त्याला आगामी बॉर्डर गावस्कर ट्रॉफीच्या तयारीसाठी संधी मिळेल, अशी शक्यता वर्तवली जात आहे.

बंगालच्या टीमचे कोच लक्ष्मी रतन शुक्ला यांनी सांगितलं की "शमी केरळ विरुद्ध होणाऱ्या मॅचसाठी उपलब्ध असणार नाही. मात्र, आमच्या अपेक्षेनुसार तो कर्नाटक आणि मध्य प्रदेश विरुद्ध होणाऱ्या मॅचसाठी उपलब्ध असेल. बंगाल आणि कर्नाटक यांच्यातील मॅच ६ नोव्हेंबरपासून सुरु होणार आहे. तर, बंगाल विरुद्ध मध्य प्रदेश ही लढत १३ नोव्हेंबरपासून सुरु होईल.

# ग्रीन हायड्रोजन, सांडपाणी व्यवस्थापन, हवामानशास्त्र विषयात भारताला सहकार्य करण्यास स्लोवाकिया उत्सुक - राजदूत रॉबर्ट मॅक्सियन

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

पूर्वीच्या झेकोस्लोवाकिया मधून विलग झालेला स्लोवाकिया देश अभियांत्रिकी, वाहन निर्मिती, संरक्षण उत्पादने, धातुशास्त्र, ग्रीन हायड्रोजन, आदी क्षेत्रात आघाडीवर असून आपला देश भारताला ग्रीन हायड्रोजन, सांडपाण्याचे व्यवस्थापन, हवामान शास्त्र व सायबर सुरक्षा या क्षेत्रात सहकार्य करण्यास उत्सुक आहे, असे प्रतिपादन स्लोवाक गणराज्याचे भारतातील राजदूत रॉबर्ट मॅक्सियन यांनी आज येथे केले. रॉबर्ट मॅक्सियन यांनी शुक्रवारी (दि. २५) महाराष्ट्राचे राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांची राजभवन मुंबई येथे सदिच्छा भेट घेतली, त्यावेळी ते बोलत होते.

स्लोवाकिया जगातील सर्वात मोठा कार निर्मिती करणारा देश असून आपल्या देशात हुंदाई, फोल्क्सवॅगन, जग्वार, लँड रोव्हर आदी कारची मोठ्या प्रमाणात निर्मिती केली जाते असे सांगून स्लोवाकिया दरडोई उत्पन्नात देखील अग्रेसर आहे असे राजदूत मॅक्सियन यांनी राज्यपालांना सांगितले.

स्लोवाकिया एकट्या चीन मध्ये २०० पेक्षा अधिक ठिकाणी शहरी सांडपाण्याचे व्यवस्थापन करत असून भारतात देखील या बाबतीत सहकार्य केले जाईल,असे राजदूतांनी सांगितले. अमिताभ बच्चन यांचा अभिनय असलेला 'चेहरे' या चित्रपटाचे चित्रीकरण स्लोवाकिया येथे झाल्यामुळे तेथील पर्यटनाला चालना मिळाली असे नमूद करून आपला देश भारतीय चित्रपट निर्मात्यांना चित्रीकरणासाठी आमंत्रित करीत आहे, असे रॉबर्ट मॅक्सियन यांनी सांगितले.

स्लोवाकिया हा देश निसर्ग संपदेने नटलेला असून ऐतिहासिक किल्ले, स्कीईंग, स्पा, स्वच्छ हवा यासाठी प्रसिद्ध आहे, त्यामुळे भारतीय पर्यटकांनी आपल्या देशाला भेट द्यावी अशी अपेक्षा राजदूतांनी व्यक्त केली. स्लोवाकिया येथे चित्रपट निर्मात्यांनी जावे याकरिता आपण राजभवन येथे चित्रपट निर्मात्यांना बोलावू व त्यांचेशी चर्चा करू असे राज्यपालांनी यावेळी सांगितले.

# आदिवासी लोकनेते काळुराम धोधडे यांचे मनोरमध्ये स्मारक उभारण्यात यावे; ना. रामदास आठवले मागणी

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

आदीवासींच्या न्याय हक्कासाठी लढणारे आदीवासी लोकनेते दिवगंत काळूराम काका धोधडे यांचे कार्य सदैव संस्मरणीय आणि प्रेरणादायी आहे.त्यांचें पालघर मधील मनोर येथे भव्य स्मारक उभारावे हिच खरी काळुराम काकांना श्रध्दांजली ठरेल असे प्रतिपादन रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांनी केले.पालघर येथील पंचशील मित्र मंडळ आणि दत्तात्रय फांऊडेशनच्या वतीने दिवगंत




काळुराम काका धोधडे यांच्या जाहिर श्रध्दांजली सभेचे आयोजन मनोर येथे करण्यात आले होते. त्यावेळी ना.रामदास आठवले यांनी दिवगंत काळूराम काका धोधडे यांना भावपूर्ण श्रध्दाजली वाहीली.

यावेळी रिपब्लिकन पक्षाचे सुरेश बारसिंसग ,सुरेश जाधव,आणि सुनिल जाधव ,चेतन पाटील, रामभाऊ वाडू, संतोष जनाटे, स्वप्नाली चंपानेरकर आदि मान्यवर उपस्थित होते.

दिवगंत काळुराम काका धोधडे यांनी आदीवासींचे प्रश्न जागतिक पातळीवर युनो(संयुक्त राष्ट्रसंघ) मध्ये मांडले.पालघर जिल्हयातील आदीवासींच्या जमीनीचे रक्षण केले.पर्यावरण निसर्ग आणि आदीवासीच्या जमिनी वाचवण्यासाठी ते लढले.त्यासाठी त्यांनी भुमिसेना ही आदीवासीची संघटना स्थापन केली.मराठवाडा विद्यापीठाला डॉ.बाबासाहेबांचे नाव द्यावे यासाठी दलित पॅंथर तर्फे नामांतरासाठी काढण्यात आलेल्या अनेक मोर्च्यात काळुराम काका सहभागी झाले होते.दलित आदीवासीच्या प्रश्नावर काळुराम काकांशी माझी अनेकदा चर्चा व्हायची.दलित आदीवासीचे प्रश्न सोडवण्यासाठी काळुराम काकाना मोठी तळमळ होती असे सांगत ना.रामदास आठवले यांनी दिवगंत काळुराम काका यांच्या आठवणीना उज्जाळा दिला. दिवगंत काळुराम काका यांचे 10 ऑक्टोबर 2024 रोजी वयाच्या 88व्या वर्षी निधन झाले. त्यांनी रिपब्लिकन पक्षाच्या वतीने ना.रामदास आठवले यांनी भावपूर्ण श्रध्दांजली वाहीली.



*मुंबई : शुक्रवारी अंधेरी पूर्व येथील बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या नित्यानंद शाळेत स्वीप अंतर्गत मतदान करण्याबाबत जनजागृती करण्यात करीता पालक सभेचे आयोजन करण्यात आले होते. पालिका उपायुक्त परिमंडळ ३ चे विश्वास मोटे, उपशिक्षणाधिकारी पश्चिम उपनगरे निसार खान, प्रशासकीय अधिकारी गोरखनाथ भावारी, विशाल कोकाटे, विभाग सर्व निरीक्षक, मुख्याध्यापक, शिक्षक,पालक उपस्थित होते.*

# लवकरच विजेत्यांच्या हक्काच्या घराचे स्वप्न होणार पूर्ण

### म्हाडा विजेत्यांना सोमवारपासून तात्पुरते देकारपत्र

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

म्हाडाच्या मुंबई मंडळाच्या २,०३० घरांच्या सोडतीतील निवासी दाखला मिळालेल्या आणि स्वीकृती दिलेल्या विजेत्यांच्या हक्काच्या घराचे स्वप्न लवकरच पूर्ण होणार आहे. या विजेत्यांना सोमवारपासून तात्पुरते ई देकारपत्र वितरीत करण्यात येणार आहे. हे देकारपत्र वितरीत झाल्यानंतर विहित मुदतीत सदनिकेची विक्री किंमत अदा करून संबंधित विजेत्यांना घराचा ताबा घेता येणार आहे.

मुंबई मंडळाने ८ ऑक्टोबर रोजी मुंबईतील विविध ठिकाणच्या २,०३० घरांसाठी सोडत काढली होती. २,०३० घरांसाठी एक लाख १३ हजारांहून अधिक अर्जदार सोडतीत सहभागी झाले होते. २०३० पैकी १३ घरांना शून्य प्रतिसाद मिळाल्याने प्रत्यक्षात २,०१७ घरांसाठी सोडत काढण्यात आली होती. सोडतीनंतर २,०१७ विजेत्यांना मंडळाकडून ई स्वीकृती पत्र वितरीत करण्यात आले होते. त्यानुसार २,०२७ पैकी १,५३० विजेत्यांनी घरासाठी स्वीकृती दिली असून ४४२ विजेत्यांनी घर परत (सरेंडर) केले आहे. त्याचवेळी ४५ विजेत्यांनी स्वीकृतीही दिलेली नाही वा घर परतही केलेले नाही. सोडतीमधील निवासी दाखला मिळालेल्या घरांसाठी स्वीकृती दर्शविलेल्या विजेत्यांना आता तात्पुरते ई देकारपत्र वितरीत करण्याचा निर्णय घेण्यात आल्याची माहिती मुंबई मंडळातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली. तात्पुरते ई देकारपत्र वितरीत करण्याचे काम अंतिम टप्प्यात असून विजेत्यांना सोमवारपासून तात्पुरते ई देकारपत्र वितरित केले जाणार असल्याचेही अधिकाऱ्यांनी सांगितले.

तात्पुरते ई देकारपत्र मिळाल्यापासून विजेत्यांना ४५ दिवसांत सदनिकेच्या एकूण रक्कमेच्या २५ टक्के रक्कम भरावी लागणार आहे. ही रक्कम ४५ दिवसांत भरू न शकणाऱ्या विजेत्यांना त्यासाठी १५ दिवसांची मुदतवाढ देण्यात येणार आहे. मात्र यासाठी विजेत्याला व्याज भरावे लागणार आहे.

# सायन-पनवेल महामार्गावर महाराष्ट्र नगरजवळील टी जंक्शनवर होणारी वाहतूक कोंडी टळणार

### महिन्याभरात होणार उड्डाणपुलाचे काम सुरू

■ **मुंबई**

मुंबई महानगरपालिकेने घाटकोपर-मानखुर्द लिंक रोड आणि सायन- पनवेल महामार्गाला मिळणाऱ्या जंक्शनवर उड्डाणपूल बांधण्याचा महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. यासाठी सुमारे १ हजार २७ कोटी रुपये खर्च करण्यात येणार आहेत. त्यामुळे या जंक्शनवर होणाऱ्या वाहतूक कोंडीपासून सुटका होणार आहे पण त्यासाठी दोन वर्षे वाट पाहावी लागणार आहे.

मुंबई शहरातील वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी मुंबई महापालिकेने शहर व उपनगरात ठिकठिकाणी उड्डाणपूल उभारले आहेत. त्याशिवाय पादचारी पूलांसह स्कायवॉक नाल्यावरील पूल, भुयारी मार्गही बांधण्यात आले आहेत. आता पालिकेच्या गोवंडी एम-पूर्व विभागातील सायन पनवेल महामार्गावर महाराष्ट्र नगर जवळील टी जंक्शनवर होणारी वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी मुंबई महानगरपालिकेने तज्ञ समितीद्वारे अभ्यास केला होता. त्यात जंक्शनवर उड्डाणपूल बांधण्याचा सल्ला तज्ञांनी दिला आहे. घाटकोपर-मानखुर्द लिंक रोड हा पूर्व उपनगरांमधील वाहतुकीसाठी महत्वाचा आहे. सध्या घाटकोपर-मानखुर्द लिंक रोडवरील उड्डाणपूल सायन-पनवेल महामार्गापूर्वी संपतो. त्यामुळे घाटकोपर-मानखुर्द लिंक रोड व सायन- पनवेल महामार्गाला मिळणाऱ्या जंक्शनवर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत आहे.

सकाळी वाशीहून घाटकोपर-मानखुर्द लिंक रोडच्या दिशेने आणि संध्याकाळी घाटकोपर-मानखुर्द लिंक रोडहून वाशीच्या दिशेने जाणाऱ्या वाहतुकीमुळे टी जंक्शनवर होणाऱ्या वाहतूक कोंडीत अनेकदा एक तासापेक्षा जास्त वेळ वाहन चालकांना अडकून पडावे लागत आहे. यामुळे प्रवासाचा वेळच वाढत नाही तर इंधनाचा मोठ्या प्रमाणात वापर होऊन वायू प्रदूषणामध्ये वाढ होत आहे. त्यामुळे या भागातील वाहतूक सुरळीत करण्यासाठी योग्य उपाययोजना करण्याच्या उद्देशाने प्रकल्प सल्लागार टीपीएफ इंजिनीरिंग यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.


# आयरलँड निवडणूक आयोगाच्या शिष्टमंडळाचा मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांशी संवाद

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

आयरलँड देशाच्या निवडणूक आयोगातील उचचस्तरीय अधिकाऱ्यांच्या शिष्टमंडळाने आज मंत्रालयातील राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाला भेट दिली. यावेळी परिषद सभागृह येथे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांच्याशी त्यांनी संवाद साधला.

जगात सर्वात मोठी लोकशाही म्हणून भारत देशाची ओळख आहे. भारत निवडणूक आयोगाच्या अंतर्गत राज्य निवडणूक अधिकारी यांचे कार्यालय राज्यात विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2024 ची प्रक्रिया काटेकोरपणे, नियोजनबद्धरित्या पार पाडत आहे. राज्यातील एकूण मतदार, मतदारांसाठी केलेल्या सोयीसुविधा, मतदार जनजागृती आदींची माहिती मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी भेटी दरम्यान शिष्टमंडळाला दिली.

यावेळी आयरलॅंड निवडणूक आयोगाचे मुख्य निवडणूक अध्यक्ष न्यायमूर्ती श्रीमती मॅरी बेकर, मुख्य



कार्यकारी अधिकारी ऑर्ट ओ’लॅरी, महावाणिज्यदूत श्रीमती अनिता केली, आयरलँड दूतावासाचे अरमान श्रीवास्तव, राज्याच्या निवडणूक विभागाचे अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकारी डॉ.किरण कुलकर्णी, अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकारी पी.प्रदीप, सहमुख्य निवडणूक अधिकारी डॉ.विजय राठोड तसेच उपसचिव के.सूर्यकृष्णमुर्ती यावेळी उपस्थित होते.

मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी भारत निवडणूक आणि राज्यातील मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालय यांचे अधिकार व चालणारे कामकाज याविषयी माहिती दिली. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका राज्य निवडणूक आयोगामार्फत स्वतंत्रपणे घेण्यात येतात. राज्याची लोकसंख्या, विधानसभा मतदार संघ, एकूण मतदान केंद्र, निवडणूक प्रक्रिया, ईव्हीएम, व्हीव्हीपॅट यंत्र, बॅलेट युनिट ,कायदा व सुव्यवस्था, राजकीय पक्ष आणि आचारसंहिता, मतदान वाढवण्यासाठी राबवण्यात आलेले उपक्रम, आधुनिक तंत्रज्ञानाचा निवडणूक प्रक्रियेत उपयोग करून विविध ॲप आणि पोर्टल आयोगाने विकसित केलेले आहेत याबाबत सविस्तर माहिती यावेळी त्यांनी दिली.

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक सुरळीत पार पडावी, यासाठी आयरलँडच्या शिष्टमंडळांनी मुख्य निवडणूक अधिकारी एस.चोक्कलिंगम आणि संपूर्ण निवडणूक यंत्रणेला शुभेच्छा दिल्या.

## दिल्ली दंगलीतील आरोपी शर्जील इमामला धक्का, सर्वोच्च न्यायालयाचा जामीन देण्यास नकार

**नवी दिल्ली :** नागरिकत्व सुधारणा कायद्याविरोधात 2020 साली झालेल्या दिल्ली दंगलीतील आरोपी शर्जील इमामला जामीन देण्यास सर्वोच्च न्यायालयाने नकार दिला आहे. पण, दिल्ली उच्च न्यायालयास शर्जीलच्या याचिकेवर तात्काळ सुनावणी करण्याच्या सूचनाही एससीने केल्या आहेत. न्यायमूर्ती बेला त्रिवेदी आणि एससी शर्मा यांच्या खंडपीठाने हे प्रकरण उच्च न्यायालयात प्रलंबित असून, थेट सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करणे योग्य नसल्याचे सांगितले. दरम्यान, शर्जील इमामविरुद्ध UAPA कलम 13 आणि देशद्रोहाचा गुन्हा दाखल आहे. देशद्रोहाच्या खटल्यात शर्जील इमामला दिल्ली उच्च न्यायालयातून यापूर्वीच जामीन मिळाला आहे. शर्जीलचे वकील वरिष्ठ अधिवक्ता सिद्धार्थ दवे शर्जीलची जामीन याचिका 2022 पासून प्रलंबित असल्याचे म्हटले. तसेच, उच्च न्यायालयातील सुनावणी गेल्या दोन वर्षांत अनेकवेळा पुढे ढकलण्यात आल्याची माहितीही त्यांनी दिली.



# कर्नाटकात 101 दोषींना जन्मठेपेची शिक्षा

### कोप्पल न्यायालयाचा निर्णय

### दलितांच्या झोपड्या जाळल्या होत्या ; सुनावणीदरम्यान 16 दोषींचा मृत्यू

**वृत्तसंस्था**
**कोप्पळ**

कर्नाटकच्या कोप्पल जिल्हा न्यायालयाने गुरुवारी एकाच वेळी १०१ दोषींना जन्मठेपेची शिक्षा सुनावली. ही सामूहिक शिक्षा देशातील कोणत्याही जाती-संबंधित प्रकरणातील सर्वोच्च आहे.

या सर्वांना 28 ऑगस्ट 2014 रोजी गंगावती तालुक्यातील मारकुंबी गावात झालेल्या जातीय हिंसाचारासाठी दोषी ठरवण्यात आले होते. हिंसाचाराच्या काळात 117 लोकांनी दलितांच्या झोपड्या




पेटवल्या होत्या. तथापि, 10 वर्षे चाललेल्या खटल्यादरम्यान 16 दोषींचा मृत्यू झाला. न्यायमूर्ती चंद्रशेखर सी यांनी त्यांना 2000 ते 5000 रुपयांचा दंडही ठोठावला आहे.

खरं तर कोप्पलमध्ये दलितांना न्हावी आणि खाद्यपदार्थांच्या दुकानात जाण्यापासून रोखण्यात आलं होतं. यापूर्वी दोन जाती गटांमध्ये हाणामारी झाली होती. पुढे त्याला हिंसक वळण लागले.

2014 मध्ये, राज्य दलित हक्क समितीने हिंसाचाराच्या निषेधार्थ मार्कुंबी ते बेंगळुरू असा मोर्चा काढला होता. हिंसाचारानंतर तीन महिने संपूर्ण परिसर पोलिसांच्या निगराणीखाली होता. हिंसाचाराचा प्रभाव इतका मोठा होता की संपूर्ण परिसर तीन महिने पोलिसांच्या देखरेखीखाली ठेवावा लागला. याच पोलिस ठाण्याला अनेक दिवस घेराव घालण्यात आला. या वेळी राज्याच्या दलित हक्क समितीने याच्या निषेधार्थ मार्कुंबी ते बंगळुरू असा मोर्चा काढला होता. हिंसाचारातील सर्व आरोपी आता बल्लारी मध्यवर्ती कारागृहात आहेत.

# ट्रूडो यांनी 'कॅनडा फर्स्ट' धोरण केले जाहीर



- परदेशी कर्मचारी नियुक्त करण्यापूर्वी कळवावे लागेल
- भारतीय विद्यार्थ्यांना बसणार फटका

**वृत्तसंस्था**
**ओटावा**

कॅनडाचे पंतप्रधान जस्टिन ट्रूडो यांनी 2025 पासून परदेशी तात्पुरत्या कामगारांच्या भरतीचे नियम कडक केले आहेत. त्यांनी त्याला 'कॅनडा फर्स्ट' असे नाव दिले आहे. ट्रूडो यांनी गुरुवारी सोशल मीडियावर सांगितले की, कंपन्यांना आता नोकऱ्यांमध्ये कॅनडाच्या नागरिकांना प्राधान्य द्यावे लागेल.

कॅनेडियन कंपन्यांना आता तात्पुरत्या आधारावर परदेशी कामगारांना कामावर घेण्यापूर्वी त्यांना पात्र कॅनेडियन नागरिक सापडले नाहीत हे घोषित करावे लागेल. ट्रूडो म्हणाले की, हा निर्णय 'तात्पुरता' असून कॅनडाच्या लोकसंख्येतील वाढ रोखण्यासाठी घेण्यात आला आहे.

वृत्तानुसार, ट्रूडो सरकारच्या या निर्णयामुळे स्थलांतरित आणि तरुणांमध्ये बेरोजगारी वाढू शकते. भारतीय विद्यार्थी शॉपिंग मॉल्स, फूड स्टोअर्स आणि रेस्टॉरंटमध्ये काम करत आहेत. 2023 मध्ये कॅनडात भारतीय अस्थायी कामगारांची संख्या सर्वाधिक होती. एकूण 1.83 लाख अस्थायी कर्मचाऱ्यांपैकी 27 हजार भारतीय होते.

कोरोना महामारीनंतर कामगारांच्या कमतरतेमुळे ट्रूडो सरकारने 2022 मध्ये नवीन नियम केले होते. मग त्याला टेम्परर फॉरेन एम्प्लॉई प्रोग्राम असे नाव देण्यात आले. यामध्ये कॅनेडियन नसलेल्यांना रोजगाराशी संबंधित निर्बंधांतून दिलासा देण्यात आला आहे. याशिवाय त्यांच्या पगारातही वाढ करण्यात आली होती.

सरकारच्या या पावलाचा भारतीय विद्यार्थ्यांना मोठा फायदा झाला. तिथे गेलेले विद्यार्थी अभ्यासाव्यतिरिक्त अर्धवेळ नोकरी करू लागले. फोर्ब्सच्या अहवालानुसार, ट्रूडो सरकारच्या निर्णयानंतर अनेक भारतीय विद्यार्थ्यांनी अमेरिकन विद्यापीठांमध्ये प्रवेश घेण्याऐवजी कॅनडातील विद्यापीठांची निवड केली. परराष्ट्र मंत्रालयाच्या मते, 2024 मध्ये सुमारे 13,35,878 भारतीय विद्यार्थी परदेशात शिक्षण घेत आहेत. त्यापैकी कॅनडात सर्वाधिक ४.२७ लाख विद्यार्थी आहेत.तट्रूडो म्हणाले की, कोरोनाच्या काळात लादण्यात आलेल्या निर्बंधांमुळे झालेल्या नुकसानातून आपली अर्थव्यवस्था सावरण्यासाठी स्थलांतरितांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे, परंतु आता हे बदलण्याची वेळ आली आहे. कॅनडाने आपली लोकसंख्या स्थिर करणे आवश्यक आहे.

पान ९ वरुन

### धारावी सोशल मिशनच्या साहाय्याने सुमारे 10 लाख दिव्यांची विक्री

तितकीच महत्त्वाची आहे." अशा शब्दांत 'कुंभारवाडा पॉटर्स असोसिएशन'चे सदस्य हनीफ गलवानी यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. धारावी हे एक महत्त्वाचे व्यावसायिक केंद्र असून इथे मोठ्या प्रमाणात कुशल कारागीर देखील आहेत. स्थानिक व्यावसायिक आणि लघु उद्योजकांसाठी धारावी सोशल मिशनच्या माध्यमातून करण्यात येणाऱ्या महत्त्वाच्या उपक्रमांची ही केवळ सुरुवात आहे. या उपक्रमातून स्थानिक उद्योजकांविषयीची प्रतिबद्धता अधोरेखित करण्याचा आमचा प्रयत्न असून अशाच रीतीने भविष्यात देखील सदैव स्थानिक उद्योगांना सहकार्य करण्याचा धारावी सोशल मिशनचा मानस आहे. अशा शब्दांत डीआरपीपीएल च्या प्रवक्त्याने आपली प्रतिक्रिया दिली. धारावीतील जनतेच्या सर्वांगीण विकासाचे उद्दिष्ट ठेवून धारावी रिडेव्हलपमेंट प्रोजेक्ट प्रायव्हेट लिमिटेडच्यावतीने धारावी सोशल मिशन या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाची मुहूर्तमेढ रोवण्यात आली आहे. पायाभूत सुविधांचा दर्जा सुधारतानाच स्थानिकांच्या सामाजिक आणि आर्थिक जीवनातही सकारात्मक बदल घडवून आणण्याचा प्रयत्न यातून केला जाणार आहे. युवा, महिला, स्थानिक उद्योजक आणि कष्टकरी - कामगार वर्गाच्या उज्वल भविष्यासाठी या उपक्रमातून भरीव तरतूद केली जाणार असून रोजगाराभिमुख कौशल्य विकास, शिक्षण, आरोग्य सुविधा, समाज कल्याण यांसह अनेक मुद्यांवर सकारात्मक बदल घडविण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. स्थानिकांच्या जीवनात सामाजिक आणि आर्थिक पातळीवर सकारात्मक आमूलाग्र बदल घडवण्याचा या उपक्रमाचा मानस आहे.

# लॉरेन्स बिष्णोईच्या भावाला पकडण्यासाठी 'NIA'ने जाहीर केल 10 लाखांचं बक्षीस

**वृत्तसंस्था**
**नवी दिल्ली**

राष्ट्रीय तपास संस्थेने (एनआयए) लॉरेन्स बिष्णोईचा भाऊ अनमोल बिष्णोईला पकडण्यासाठी १० लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केलं आहे. बाबा सिद्दिकी हत्या प्रकरणात त्याचे नाव पुढे आल्यानंतर पोलिसांनी ही कारवाई केली. तसेच एनआयएने त्याच्या शोध सुरू केला आहे. महत्त्वाचे म्हणजे अनमोल बिष्णोईवर सिद्धू मूसेवाला हत्या प्रकरणातील आरोपींना शस्त्र पुरवल्याचा आरोपही आहे.

गेल्या एप्रिल महिन्यात अभिनेता सलमान खानच्या घराबाहेर झालेल्या गोळीबाळाच्या घटनेत अनमोलबिष्णोईचा समावेश



होता. त्यावेळी फेसबुकवर पोस्ट करत त्याने या हल्ल्याची जबाबदारी घेतली होती. तसेच पंजाबी गायक सिद्धू मूसेवाला हत्या प्रकरणातील आरोपींना शस्त्रे पुरवल्याचा आरोपही त्याच्यावर करण्यात आला होता. याशिवाय अनमोल बिष्णोईवर खंडणीशी संबंधित १८ गुन्हेही दाखल करण्यात आले आहेत.

दरम्यान, आता बाबा सिद्दिकी हत्या प्रकरणात त्याचे नाव पुढे आल्यानंतर एनआयएने त्याचा शोध सुरु केला आहे. मात्र, २०२२ साली तो बनावट पासपोर्टच्या आधारे देश सोडून गेल्याचा संशय व्यक्त केला जातो आहे. अनमोलबिष्णोईबाबत नागरिकांना काही माहिती मिळाल्यास ती पोलिसांना द्यावी, असं आवाहन एनआयएकडून करण्यात आलं आहे. तसेच त्याची माहिती देणाऱ्यांना १० लाख रुपयांचे बक्षीसही एनआयएने जाहीर केलं आहे. यासंदर्भाच माध्यमांशी बोलताना, "आम्ही अनमोल बिष्णोईच्या आवाजाचे नमुने गोळा करण्याचा प्रयत्न करत आहोत. तांत्रिक पुरावे गोळा केल्यानंतर त्याच्याविरुद्ध पुढील प्रक्रिया केली जाईल" अशी प्रतिक्रिया एनआयएच्या एका अधिकाऱ्याने दिली आहे.

गेल्या वर्षी केंद्रीय गृहमंत्रालयाने जाहीर केलेल्या कुख्यात गुंडांच्या यादीत त्याचा समावेश करण्यात आला होता. २०२३ मध्ये, एनआयएने लॉरेन्स बिष्णोई आणि अनमोल बिष्णोई यांच्यासह १४ जणांविरोधात आरोपपत्र दाखल केले होते. राजकीय नेते, चित्रपट अभिनेते आणि गायकांना धमकावत त्यांच्याकडे खंडणी मागितल्याचा आरोप १४ जणांवर करण्यात आला होता.

# युवराज सिंगच्या एनजीओची स्तनांच्या कर्करोगाबाबत जागृतीची जाहिरात वादात

**वृत्तसंस्था**
**नवी दिल्ली**

भारताचा माजी क्रिकेटपटू युवराज सिंग यांच्या 'यू वी कॅन' या एनजीओजने स्तनांच्या कर्करोगाबाबत जागृती निर्माण करण्यासाठी दिल्ली मेट्रोमध्ये एक जाहिरात प्रतर्शित केली होती. मात्र या जाहिरातीमध्ये महिलांच्या स्तनांसाठी संत्री हा शब्द वापरल्यामुळे सध्या या जाहिरातीवर चौफेर टिका होत आहे.




सोशल मीडियावर अनेकांनी या जाहिरातीबाबत आक्षेप घेतल्यानंतर दिल्ली मेट्रो प्रशासनाने ही जाहिरात हटविण्याचा निर्णय घेतला आहे.

दिल्ली मेट्रोमध्ये लावलेल्या जाहिराताचा फोटो काढून काही प्रवाशांनी ते सोशल मीडियावर पोस्ट केले होते आणि त्यावर आक्षेप घेतला होता.

अनेकांनी ही जाहिरात लाजिरवाणी आणि भयंकर असल्याचे म्हटले आहे. वाद उद्भवल्यानंतर दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशनने दि. २३ ऑक्टोबर रोजी सायंकाळी सदर वादग्रस्त जाहिरात हटविली. ही जाहिरात फक्त एकाच ट्रेनमध्ये लावली होती, अशीही स्पष्टोक्ती रेल्वेतर्फे देण्यात आली.

# पतीसह पिकनिकला गेलेल्या महिलेवर सामूहिक बलात्कार

### व्हिडीओही बनवले, गुन्हा नोंदवण्यासाठी पीडितांची वणवण

**भोपाळ**

एका पर्यटनस्थळावर पतीसह पिकनिकसाठी गेलेल्या महिलेवर सामूहिक बलात्कार झाल्याची धक्कादायक घटना मध्य प्रदेशमध्ये घडली आहे. मध्य प्रदेशमधील अल्ट्रा सोलर प्लँट आणि भैरवबाबासाठी प्रसिद्ध असलेला गुढमध्ये हा धक्कादायक प्रकार घडला.

एका पर्यटनस्थळावर पतीसह पिकनिकसाठी गेलेल्या महिलेवर सामूहिक बलात्कार झाल्याची धक्कादायक घटना मध्य प्रदेशमध्ये घडली आहे. मध्य प्रदेशमधील अल्ट्रा सोलर प्लँट आणि भैरवबाबासाठी प्रसिद्ध असलेला गुढमध्ये हा धक्कादायक प्रकार घडला. येथे पिकनिकसाठी आलेल्या एका दाम्पत्याला बंधक बनवून आरोपींनी हे कुकृत्य केले. यादरम्यान, आरोपींनी या संपूर्ण घटनेचा व्हिडीओही बनवला. तसेच तो व्हायरल करण्याची धमकीही दिली. आता पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा नोंदवून घेत अनेक संशयितांना ताब्यात घेतले आहे.

# हिमाचलमध्ये बनवलेल्या 23 औषधांचे नमुने फेल

### कंपन्यांना स्टॉक परत मागवण्याचे आदेश

**वृत्तसंस्था**
**शिमला**

हिमाचल प्रदेशमध्ये उत्पादित 23 औषधे सेंट्रल ड्रग्ज स्टँडर्ड कंट्रोल ऑर्गनायझेशन (CDSCO) च्या मानकांची पूर्तता करत नाहीत. त्यांचे नमुने निकामी झाले आहेत. ही औषधे हृदयविकाराचा झटका, रक्तातील साखर आणि कर्करोग यांसारख्या घातक रोगांवर उपचार करण्यासाठी वापरली जातात.

औषधांचे नमुने फेल झाल्याने हिमाचलच्या फार्मा



कंपन्यांमध्ये खळबळ उडाली आहे. औषध नियंत्रकाने कंपन्यांना देशभरातून औषधांचा साठा परत मागवण्याच्या सूचना दिल्या आहेत, कारण हिमाचलमध्ये बनवलेल्या औषधांचा पुरवठा देशभर केला जातो.

राज्य औषध नियंत्रक मनीष कपूर यांनी सांगितले की, सीडीएससीओच्या अलर्टनंतर सर्व औषध कंपन्यांना नोटीस बजावण्यात आली आहे. उत्तर मिळाल्यानंतर त्यांच्यावर कडक कारवाई केली जाईल.

सीडीएससीओच्या तपासणीत 20 औषधांचे नमुने फेल, औषध नियंत्रकाच्या चाचणीत 3 औषधांचे नमुने फेल या वर्षी सप्टेंबर महिन्यात सीडीएससीओ आणि राज्य औषध नियंत्रक यांनी राज्यातील विविध औषध उत्पादक कंपन्यांचे नमुने गोळा केले होते. त्यानंतर सीडीएससीओने लॅबमध्ये चाचणी केल्यानंतर आपला अहवाल शेअर केला आहे. त्यानुसार सीडीएससीओ चाचणीत 49 पैकी 20 नमुने आणि औषध नियंत्रक चाचणीत 18 पैकी 3 नमुने फेल झाले.

# इराण, पॅलेस्टाईन व लेबेनॉनच्या दूतांचे JNU मधील व्याख्यान रद्द

**नवी दिल्ली ।** दिल्लीतील जवाहरलाल नेहरू विद्यापीठात (जेएनयू) इराण, पॅलेस्टाईन व लेबेनॉन या देशांच्या भारतातील राजदूतांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. पश्चिम आशियातील इस्रायल, इराण, पॅलेस्टाईन व लेबेनॉन या देशांमध्ये सध्या युद्धसंघर्ष चालू आहे. त्याचे पडसाद आता जेएनयू विद्यापीठात उमटले आहेत. इराणचे भारतातील राजदूत डॉ. इराज इलाही यांचे नियोजित व्याख्यान विद्यापीठाकडून अचानक पुढे ढकलण्यात आले, तर लेबेनॉन व पॅलेस्टाईन या देशांच्या भारतातील राजदूतांचे व्याख्यान रद्द करण्यात आले आहे. 'पश्चिम आशियातील घडामोडींकडे इराण कसे पाहतो?' या विषयावर इराणचे राजदूत डॉ. इराज इलाही हे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार होते. गुरूवारी (२४ ऑक्टोबर) सकाळी ११ वाजता आयोजित व्याख्यान सकाळी आठ वाजता विद्यापीठाकडून अचानक रद्द करण्यात आले.

# फक्त वीस हजारांसाठी जन्मदात्या माऊलीचा खून...

**वृत्तसंस्था**
**गाझियाबाद**

भारतात रोजच अनेक गुन्ह्यांच्या घडत येत असतात. मात्र काही घटना या मन सुन्न करणाऱ्या असतात. उत्तर प्रदेशच्या गाझियाबादमध्ये अशीच एक धक्कादायक घटना घडली आहे. स्पीकर दुरुस्तीसाठी वीस हजार रुपये दिले नाहीत आणि वर अपमान केला म्हणून रागावलेल्या मुलाने आईचा खून करण्याचा डाव आखला. आरोपीचे नाव मोहित असून त्याने दोन मित्रांच्या मदतीने ५५ वर्षीय संगीता त्यागी यांचा खून केला. पोलिसांनी आता



आरोपीला अटक केली आहे. मोहितने ३ ऑक्टोबर रोजी रात्री ९ वाजता आई काम करत असलेल्या कंपनीत गेला आणि घरी सोडण्याच्या बहाण्याने त्याने आईला दुचाकीवर बसविले. त्यानंतर एका निर्जन स्थळी नेऊन तिचा खून केला.

संगीता त्यागी या कापड कारखान्यात काम करतात. ४ ऑक्टोबर रोजी त्यांचा मृतदेह मंडोला गावातील शेतात आढळून आला. हे ठिकाण संगीता यांच्या कारखान्यापासून ३०० मीटर अंतरावरच होते. संगीता यांना दोन मुले आहेत. मनीष आणि मोहित अशी त्यांची नावे आहेत. मनीष हा दिल्लीत सुरक्षा रक्षकाचे काम करतो. तिथे तो पत्नी आणि त्याच्या मुलांसह राहतो. तर मोहित हा डीजे ऑपरेटर आहे. संगीताचा नवरा सुनील हा प्रॉपर्टी केअरटेकर म्हणून काम करतो.

# भारत-चीन सैन्य मागे घेण्यास सुरुवात

### येत्या तीन दिवसांत टेंट, शेड अन् इमारती हटवल्या जाणार

**वृत्तसंस्था**
**लेह**

भारत-चीनचा सीमावाद मिटल्यानंतर आता पूर्व लडाखमधील परिस्थिती सामान्य होऊ लागली आहे. या महिन्याच्या अखेरीस डेमचोक आणि डेपसांगमध्ये पुन्हा गस्त सुरू होणार आहे. तत्पुर्वी, या भागातून सैन्य मागे घेण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. 28-29 ऑक्टोबरपर्यंत दोन्ही देशांचे सैनिक येथून पूर्णपणे माघार घेतील. तसेच, या परिसरात बांधलेले तात्पुरते टेंट/शेड आणि तात्पुरत्या इमारती हटवल्या जातील.



### नवा करार फक्त डेपसांग आणि डेमचोकमध्ये लागू

*नवा करार केवळ डेपसांग आणि डेमचोकसाठी लागू असेल, इतर ठिकाणांसाठी नाही. हा करार पँगॉन्ग सरोवराच्या किनाऱ्यासह बफर झोनला लागू होणार नाही. या नवीन करारामुळे दोन्ही बाजूंचे सैन्य (भारत आणि चीन) एप्रिल 2020 पूर्वीच्या स्थितीत परत येईल आणि त्यांनी एप्रिल 2020 पर्यंत ज्या भागात गस्त घातली जात होती, तेथे पुन्हा गस्त सुरू होईल.*

### या महिन्याच्या अखेरीस पेट्रोलिंग सुरू होईल

*यासोबतच ग्राऊंड कमांडरच्या बैठका नियमितपणे घेतल्या जातील. पण, या करारानुसार परिसरात ठराविक संख्येनेच सैनिक गस्त घालू शकतील. गैरसमज टाळण्यासाठी दोन्ही बाजू एकमेकांना गस्त घातल्याची माहिती देतील. दरम्यान, दोन्ही देशांमधील परिस्थिती सामान्य करण्यासाठी सर्व स्तरांवर अनेक चर्चा झाल्या आहेत. 28-29 ऑक्टोबरपर्यंत सैन्य माघार घेण्याची प्रक्रिया पूर्ण केली जाईल आणि या महिन्याच्या अखेरीस गस्त सुरू होईल.*

# ज्या मांसाच्या संशयातून हत्या, ते गोमांस नव्हतेच

**वृत्तसंस्था**
**चंदीगढ**

27 ऑगस्ट रोजी हरियाणातील चरखी दादरी जिल्ह्यातील बाढडा शहरात मुस्लिम तरुण साबीर मलिकची गोमांस खाल्ल्याच्या संशयावरून हत्या करण्यात आली होती, जे गायीचे मांस नव्हते. लॅबच्या अहवालातून ही बाब समोर आली आहे. साबीर हा पश्चिम बंगालचा रहिवासी होता. याप्रकरणी पोलिसांनी 2 अल्पवयीन मुलांसह 10 आरोपींना अटक केली आहे. त्यांनी साबीरला भंगार देण्याच्या बहाण्याने बोलावून बेदम मारहाण केली, असा आरोप आहे.

31 ऑगस्ट रोजी मारहाणीचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर हे प्रकरण उघडकीस आले. आरोपींनी साबीरसह दोन तरुणांना काठ्यांनी मारहाण केल्याचे समोर आले आहे. चौकशीदरम्यान

### लॅब रिपोर्टमधून उघड



आरोपींनी साबीर आणि त्याचे साथीदार गोमांस खातात असा दावा केला होता. हिंदू संघटनांशी संबंधित या आरोपींनी त्यांच्या भांड्यात गोमांस सापडल्याचेही सांगितले होते. पोलिसांनी हे मांस जप्त करून त्याचे नमुने तपासणीसाठी पाठवले होते.

बाढडाचे डीएसपी भारत भूषण यांनी सांगितले की, मांसाचे नमुने फरीदाबाद येथील प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवण्यात आले आहेत. त्याचा अहवाल आम्हाला तिथून मिळाला आहे. हे निषिद्ध मांस नव्हते. आम्ही 10 आरोपींना अटक केली आहे. लवकरच न्यायालयात चलन सादर करणार आहे. चलनासोबत लॅबचा अहवालही न्यायालयात सादर केला जाणार आहे. सहा आरोपींना अटक करणे बाकी आहे. पोलिस तपासानुसार, बाढडा येथील हंसवास खुर्द गावात 27 ऑगस्ट रोजी गोमांस खाण्यावरून वाद झाला होता. आसाममधील काही कुटुंबे येथे झोपडपट्टीत राहत आहेत. गोरक्षक दलाशी संबंधित कार्यकर्त्यांनी येथे पोहोचून झोपडपट्ट्यांची झडती घेतली. यावेळी काही भांड्यांमध्ये मांस आढळून आले. यानंतर तेथे उपस्थित असलेल्या सबरुद्दीन या तरुणाने तेथून पळ काढला आणि इतर झोपडपट्टीच्या दिशेने गेला.

गोरक्षकांनी सबरुद्दीनला पकडून झोपडपट्टीत आणले. चौकशी केली असता सबरुद्दीनने सांगितले की तो येथे 2 महिन्यांपासून राहत आहे. 2 महिन्यांत 2 वेळा गोमांस शिजवलेले. जेव्हा गोरक्षकांनी व्हिडिओ रेकॉर्ड करण्यास सुरुवात केली तेव्हा सबरुद्दीन म्हणाला की ते म्हशीचे मांस आहे.